
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सदाफुलीसह
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ९० | पाने १२+ ८ | किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



शाखेच्या सर्व स्वयंसेवकांच्या कुटुंबीयांशी नियमित घनिष्ठ संपर्क असणे हे शाखेच्या दृढीकरणाचे दुसरे महत्त्वपूर्ण अंग आहे. शाखेमध्ये आलेल्या नव्या-जुन्या प्रौढ, तरुण, बाल, शिशू सर्व स्वयंसेवकांची सूची तयार करून त्यांच्या कुटुंबीयांना आठवड्यातून कमीत कमी एकदा तरी भेटून आले पाहिजे. शाखेचा कार्यवाह, मुख्यशिक्षक, गटनायक आदी सर्व कार्यकर्त्यांना आपापल्या जबाबदारीनुसार स्वयंसेवकांची सूची वाटून हे काम पूर्ण करावे लागेल.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# राज्यात एकाही डान्स बारला परवाना नाही : मुख्यमंत्री





**मुंबई, दि. २४ फेब्रुवारी-**
राज्यात सद्यस्थितीत कुणालाही 'डान्स बार'चा परवाना देण्यात आलेला नाही, केवळ 'ऑर्केस्ट्रा बार'लाच परवानगी आहे. मात्र, ऑर्केस्ट्राच्या नावाखाली नियमांचे उल्लंघन होत असल्यास अशा बारचे परवाने केवळ निलंबित न करता, ते कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी सरकार कायद्यात सुधारणा करणार आहे. याच किंवा पुढच्या अधिवेशनात यासंदर्भातील तरतूद करण्याचा आमचा प्रयत्न असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (२४ फेब्रुवारी) केली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात आमदार सुभाष देशमुख यांनी राज्यातील नियमबाह्य ऑर्केस्ट्रा बार आणि डान्स बारवर कारवाई करण्याची मागणी केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री आणि गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

भोयर यांनी सांगितले की, न्यायालयाच्या नियमांनुसार ऑर्केस्ट्रा बारला परवाने दिले आहेत. जेथे नियमांची पायमल्ली केली जात असेल, अशा प्रकरणांची गंभीर दखल घेऊन, ज्या बारकडून तीन वेळा नियमांचे उल्लंघन होईल, त्यांचे परवाने कायम स्वरूपी रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. चर्चेदरम्यान आमदार भास्कर जाधव यांनी पनवेलमध्ये रात्री लेडीज बारसारखे प्रकार सुरू आहेत. दिवसा हे ढाबे आणि बार बंद दिसतात, मात्र रात्री दोन्ही बाजूंनी लेडीज बार सर्रास चालताना दिसतात, असे निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'दिवंगत आर. आर. पाटील यांनी डान्स बार बंदीचे विधेयक आणले होते, जे सर्वोच्च न्यायालयाने निरस्त केले. त्यानंतर माझ्या कार्यकाळात पुन्हा विधेयक आणले गेले, मात्र बार मालकांनी आम्ही डान्स बार नव्हे तर ऑर्केस्ट्रा बार चालवू, असा युक्तिवाद न्यायालयात केला. त्यानुसार सरकारने ऑर्केस्ट्रा बारसाठी कठोर अटीशर्ती लागू केल्या आहेत. यामध्ये जागेचे क्षेत्रफळ, पैसे उडवण्यावर बंदी आणि नियमभंग केल्यास थेट गुन्ह्याची तरतूद आहे.'

# जावयाने केला सासऱ्याचा खून; स्वतःही केला आत्महत्येचा प्रयत्न

- इंगळगी येथील घटना
- आरोपी उर्दू शिक्षक म्हणून कार्यरत

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
जावयाने सासऱ्याचा खून करुन स्वतःनेही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

खून झालेल्या सासऱ्याचे नाव सिकंदर मुलाका शेख तर सादिक सैफन दफेदार असे जखमी जावयाचे नाव आहे. मृत सिकंदर शेख यांची मुलगी पोलिस खात्यात सेवेत तर आरोपी सादिक दफेदार हा उर्दू शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे सांगण्यात येते. याबाबतची हकीकत अशी की, सादिक सैफन दफेदार (रा. पान मंगरुळ) याचे सिकंदर शेख यांच्या मुलीसोबत सहा वर्षांपुर्वी लग्न झाले. गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्यात तक्रार व भांडण सुरु होते. हे प्रकरण घटस्फोटपर्यंत आले होते. या कारणावरुन चिडलेला सादिक दफेदार हा सिकंदर शेख यांच्या इंगळगी येथील शेतात जावून त्यांच्यावर चाकुने सपासप वार केला. यात सासऱ्याचा जागीच मृत्यू झाला. जावयाने स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. जावई सादिक दफेदार हा गंभीर जखमी असून त्याच्यावर सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु आहेत. या घटनेची माहिती मिळताच वळसंग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राहुल डोंगरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी लाला शेख यांनी फिर्याद दाखल केली.



मृत सिकंदर शेख

# इंग्लंडची सेमीफायनलमध्ये धडाकेबाज एन्ट्री!

## पाकिस्तानचा केला पराभव




श्रीलंका : २०२६ टी-२० विश्वचषकाच्या सुपर-८ फेरीतील आजच्या अटीतटीच्या सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा २ गडी राखून पराभव केला आहे. या विजयासह इंग्लंडने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला संघ होण्याचा मान मिळवला आहे. इंग्लंडच्या या विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो म्हणजे कर्णधार हॅरी ब्रूक. आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना ब्रूकने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत शानदार शतक झळकावले.






CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### संत गाडगेबाबा यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात संत गाडगे बाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने व पर्यवेक्षक भगवान मुंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबिन शेख, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, तरंगिणी कोंडा, प्रफुल्ला कदम, महेश वालावलकर, सारंग आजीखाने, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, रियाज अतार, सचिन बर्मा, सौदागर वाघमारे, प्रशांत साठे, ताहीर बिराजदार, भालचंद्र साखरे, सायली ढोले, कदिर शेख आदी उपस्थित होते.



### डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी गणेश गायकवाड

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती संजय नगर कुमठा नाका सोलापूर नवीन पदाधिकारी निवड बैठक समितीचे संस्थापक प्रवीण निकाळजे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.अध्यक्ष म्हणून गणेश गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष पद हे रोहित गायकवाड यांना सोपवण्यात आले. या बैठकीस युवा नेतृत्व प्रतीक्षा निकाळजे व संजय नगर कुमठा नाका येथील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. इतर पदाधिकारी असे- अध्यक्ष गणेश गायकवाड, उपाध्यक्ष रोहित गायकवाड, सचिव रोहित म्हेत्रे, खजिनदार दत्ता गायकवाड, मिरवणूक प्रमुख संकेत चंदनशिवे, समर्थ जगधाने विनायक मासळी विरेश येवले, सल्लागार दिपक भोसले, श्रीधर काटकर,सुनील गायकवाड, शैलेश घाडगे उपस्थित होते.

### भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलच्या सभेत उलगडला सोलापूरचा इतिहास

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
भावसार व्हिजन इंडिया सोलापूर सेंट्रलची मासिक सभा पत्रकार भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेस विद्यानिकेतन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रमोद हंचाटे यांनी आपल्या ओजस्वी व प्रभावी शैलीत सोलापूर जिल्ह्याचा न ऐकलेला इतिहास श्रोत्यांसमोर उलगडून सांगितला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते सोलापूरच्या सिद्धेश्वर गड्डा यात्रेपर्यंत, अक्कलकोट संस्थान, अकलूज किल्ला आदी ऐतिहासिक घटनांचे जिवंत वर्णन त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थितांना सोलापूरच्या समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची नव्याने ओळख झाली. उपस्थित श्रोत्यांनी हा विषय मोठ्या उत्सुकतेने व तल्लीनतेने ऐकला. याप्रसंगी संस्थेच्या सदस्यांचे वाढदिवस व विवाह वाढदिवस उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुशील महिंद्रकर होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर पुकाळे, प्रभाकर जवळकर, प्रभाकर कुसुमकर, अश्विन डोईजोडे, गणेश दंतकाळे, पूनम पुकाळे, अॅड. किरण रणसुभे, दिपा उपरे, माधुरी लोकरे व आरती खमीतकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुधीर क्षीरसागर व सौ. आरती खमीतकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सुरुची भोजनाने झाली.



### संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्षपदी अंजली मोहिते; शहराध्यक्षपदी अंजली भोसले

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
संभाजी ब्रिगेड महिला आघाडी च्या वतीने मोहोळ तालुक्यातील तील नतून पदाधिकारी निवडीची बैठक संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन मार्गदर्शन केले. मोहोळ तालुक्यातील विविध पक्षाच्या महिलांनी संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेत प्रवेश केला. मोहोळ येथील नव्याने स्थापन करण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मोहोळ तालुक्यातील इतर पदाधिकाऱ्यांमध्ये अंजली मोहिते, तालुका अध्यक्ष, लक्ष्मी चव्हाण तालुका उपाध्यक्ष, अंजली भोसले (वस्त्रे) मोहोळ शहर अध्यक्ष, रेणुका चव्हाण शहर उपाध्यक्ष, नंदा गोरे तालुका कार्याध्यक्ष आदींचा समावेश आहे. तर अनिता बळवंतराव यांची शहर कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, राजेंद्र माने, हनुमंत मोटे, बालाजी जाधव, विकास पवार आदी उपस्थित होते.

# आनंदाचा शिधा बनतोय दुःखाचे कारण

**गुढीपाडव्यापूर्वी 'आनंदाचा शिधा'चा अडकला प्रश्नचिन्हात; लाभार्थ्यांची वाढती प्रतीक्षा**




**धान्य वितरणात बदल नाही**

मागील वर्षी सलग दोन महिने तांदळाऐवजी ज्वारीचे वितरण करण्यात आले होते. त्यानंतर ज्वारीचा पुरवठा थांबवण्यात आला. यंदा पुन्हा धान्य वितरणात बदल होणार का, याबाबत चर्चा सुरू होती. मक्याच्या संभाव्य वितरणामुळे ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या धान्य वितरणात कोणताही नवीन बदल प्रस्तावित नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**किटमध्ये कोणत्या वस्तू?**

१ किलो चणा डाळ, १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**
गुढीपाडवा अवघ्या वीस दिवसांवर येऊन ठेपला असताना राज्य शासनाच्या 'आनंदाचा शिधा' योजनेबाबत अद्याप कोणताही स्पष्ट निर्णय झालेला नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये संभ्रम आणि प्रतीक्षेची भावना निर्माण झाली आहे. सन २०२२ मध्ये महायुती सरकारने सुरू केलेल्या या योजनेत १०० रुपयांत जीवनावश्यक वस्तूंचे किट उपलब्ध करून देण्यात येत होते. मात्र 'लाडकी बहीण' योजनेमुळे राज्यावर वाढलेल्या आर्थिक भाराच्या पार्श्वभूमीवर 'आनंदाचा शिधा' योजना बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, लोकप्रिय योजनांचे भवितव्य अधांतरी असल्याचे चित्र दिसत आहे. राज्य सरकारची महत्वकांक्षी 'शिवभोजन थाळी' योजना जवळपास बंद पडल्यात जमा असताना, आता 'आनंदाचा शिधा' योजनेचेही तसेच भवितव्य होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सणासुदीच्या काळात गोरगरीब कुटुंबांना दिलासा देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली होती. दिवाळी आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर रेशन दुकानांमार्फत किटचे वितरण केले जात होते.

सन २०२३ मध्ये गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी-गणपती आणि दिवाळी या सणांच्या निमित्ताने किटचे वितरण झाले होते. तसेच २०२४ मध्ये अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्तही सरकारने 'आनंदाचा शिधा' वितरित केला होता. गुढीपाडवा तोंडावर आला असताना शासनाकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे. आता सरकार नेमका कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विधवा महिलेस लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने शारिरीक संबंध

**आरोपी विरुध्द गुन्हा दाखल**



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २४ फेब्रुवारी-**
एका ३० वर्षीय विधवा महिलेस लग्नाचे अमिष दाखवून पती मयत झाल्याचा गैरफायदा घेवून जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवून सदर महिलेचे सोन्याचे दागिने विकून आलेले पैसे खर्च केल्याप्रकरणी राहुल हणमंत विटेकर (रा. कारखाना रोड, मंगळवेढा) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी तथा पिडीता हिचा पती दहा वर्षापुर्वी मयत झाला होता. फिर्यादीचा भाऊ व आरोपी हे दोघे मित्र असल्याने आरोपी हा नेहमी पिडीतेच्या घरी येत होता. त्यामुळे पिडीतेची व आरोपीची ओळख झाली होती. तद्नंतर फिर्यादी ही काही दिवसानंतर ग्रामीण भागातील एका खेड्यात रहावयास गेल्यानंतर आरोपी हा त्या ठिकाणी जावून तू मला खूप आवडतेस मी तुझ्या सोबत लग्न करतो असे म्हणाल्यावर पिडीतेने आरोपीस तू माझ्या मागे लागू नको तुला बायका मुले आहेत,मी तुझ्यासोबत लग्न करणार नाही असे समजावून सांगीतले होते. तरीही आरोपीने जानेवारी २०२६ मध्ये पिडीता ही घरी एकटी असताना तो तेथे गेला. यावेळी त्याला घराबाहेर निघून जा असे म्हणाल्यावर आरोपीने जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले, तसेच दि. ७ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता पिडीता घरी एकटी असताना पिडीतेच्या इच्छेविरुध्द शारिरीक संबंध केले. त्यावेळी पिडीतेने त्याला लग्न कधी करणार आहेस असे विचारले असता हा करुया म्हणत त्याने खर्चासाठी पैसे पाहिजेत असे म्हणून पिडीतेकडील सोन्याचे गंठण विक्रीसाठी घेवून गेला. त्यानंतर आरोपीस वारंवार माझ्यासोबत लग्न कधी करणार आहे? असे विचारले असता मी तुझ्यासोबत लग्न करणार नाही तुला काय करायचे ते कर असे म्हणून शिवीगाळी करत घडला प्रकार कोणास सांगीतल्यास तुला जीवंत सोडणार नसल्याची धमकी दिली.



### संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम व अन्नदान

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
आस्था रोटी बँकेतर्फे संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५०व्या जयंती निमित्तप्रथम दत्त चौकामधील संत गाडगेबाबा महाराज यांच्या मूर्तीस पूजा करण्यात आली. तसेच सिव्हिल हॉस्पिटलमध्ये स्वच्छता मोहीम करण्यात आली गोरगरीब गरजू लोकांना व तसेच पेशंट व पेशंटच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. याचा शुभारंभ पंकज जाधव, सिद्धेश्वर कळकेरी व ब्लड बँकेचे विनायक कुलकर्णी, आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष विजय छंचुरे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी आस्था रोटी बँकेचे कार्यकर्ते विनोद भोसले दत्तात्रय दळवी अनिता तालीकोटी गीता दळवी विजय छचुरे इतर कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# आणीबाणीला सज्ज सोलापूर

## ५०० 'अपदा मित्र' सिध्देश्वर तलावात प्रशिक्षणात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**
पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने सोलापुरात सुमारे ५०० 'अपदा मित्र' व 'अपदा सखी' यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू केले आहे. मागील आठ दिवसांपासून सिद्धेश्वर तलाव येथे बोट चालविणे, बचावकार्य व समन्वय यांचा सराव घेतला जात आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना शासनाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

दरवर्षी पावसाळ्यात जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशिक्षित स्वयंसेवकांची फळी उभी करण्याचा हा उपक्रम आहे. पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलविणे, प्राथमिक मदत देणे, प्रशासनाशी समन्वय साधणे अशा कामांसाठी या स्वयंसेवकांना तयार केले जात आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिसागर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षक बजरंग व्हटकर, अरुणा राठोड व सागर धप्पाधुळे हे प्रत्यक्ष प्रशिक्षण देत आहेत. प्रशिक्षणासाठी शासनाकडून काही प्रमाणात इंधन उपलब्ध होते; मात्र अधिक सरावासाठी अतिरिक्त इंधनाची गरज भासते. यासाठी काही दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेत मदत केली आहे. नवल पेट्रोलपंपाच्या वतीनेही इंधन उपलब्ध करून देण्यात आले असून इतरांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**कोण आहेत 'अपदा मित्र'?**

या उपक्रमात तहसीलदार, तलाठी, ग्रामसेवक यांसारखे महसूल कर्मचारी, विविध महाविद्यालयांतील एनसीसी व एनएसएस विद्यार्थी, सामाजिक बांधिलकी जपणारे तरुण, तसेच काही पोलिस पाटील यांचा समावेश आहे. मंदिर समितीच्या परवानगीने तलावात बोट चालविण्याचा सराव केला जात असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त स्वयंसेवक प्रशिक्षित व्हावेत, यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत.

# श्री सिध्देश्वर तलावातील माशांच्या मृत्यू प्रकरणी युद्धपातळीवर उपाययोजना सुरू

**महापौर कोंड्याल, आयुक्त डॉ. ओम्बासे, देवस्थानचे चेअरमन काडादी यांनी केली प्रत्यक्ष पाहणी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
श्री सिद्धेश्वर मंदिर तलावामध्ये अलीकडेच मोठ्या प्रमाणात मासे मृत पावल्याच्या घटनेची गांभीर्याने दखल घेत महापालिका प्रशासनाने तातडीने कारवाई सुरू केली आहे. महापौर विनायक कोंड्याल, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे तसेच श्री सिद्धेश्वर देवस्थानचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह तलाव परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणीवेळी सहायक आयुक्त मनिषा मगर, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विद्युत विभाग प्रमुख राजेश परदेशी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, उद्यान विभाग अधीक्षक स्वप्नील सोलंकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, वॉटर सेफ्टी सल्लागार भूषण देशपांडे आदी उपस्थित होते.

प्राथमिक तपासणीत तलावातील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटल्यामुळे माशांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. तलावातील विविध ठिकाणांहून पाण्याचे नमुने संकलित करून अधिकृत प्रयोगशाळेत सखोल रासायनिक व तांत्रिक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

**भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना**

महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, सिद्धेश्वर तलाव हे सोलापूर शहराचे श्रद्धास्थान व नैसर्गिक वैभव आहे. तलावातील जलचरांचे संरक्षण आणि पर्यावरणीय संतुलन राखणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जातील.



### सावळेश्वर येथे लोकमंगल ग्रामस्वच्छता अभियानात ग्रामस्थांचा सहभाग

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
लोकमंगल समृद्ध गाव अभियान अंतर्गत सावळेश्वर येथील ब्रम्हनाथ मंदिर येथे संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आयोजित लोकमंगल ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी सावळेश्वर ग्राम पंचायत सरपंच पार्वती गावडे, यांचे पती कालिदास गावडे व माजी सरपंच सखाराम साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल समृद्ध गाव अभियान करण्यात आले. सावळेश्वर येथील ब्रह्मनाथ मंदिर परिसरातील कचरा गोळा करून स्वच्छ करण्यात आला. यावेळी कालिदास गावडे, सखाराम साठे, शौकत शेख, दीपक गावडे, अंकुश गावडे, अहमद पठाण, रोहित पवार, शंकर टेकाळे, रोहन सारोवळे शांतप्पा कुंभार ,दिनकर नागणे अंकुश सावळे ,महादेव साबळे, जगन्नाथ पुजारी, कालिदास मसळकर आदी उपस्थित होते. श्यामकुमार भंडारे व दीपक गावडे यांनी प्रास्ताविक केले. सखाराम साठे यांनी आभार मानले.

# असंख्य दिव्यांगांच्या आयुष्यात नवी पहाट




**मंत्री चंद्रकांत पाटील यांची अशीही संवेदनशीलता**

**दिव्यांगत्व आलेली तृप्ती धावू लागली**

पुण्यातील कासारसाई मध्ये राहणारी तृप्ती स्वामी (वय ९) हिला १८ मे २०२५ रोजी विजेचा तीव्र धक्का लागून अपघात झाला होता. या अपघातात तिला आपला पाय गमवावा लागला होता. तिचे वडील बांधकाम कामगार आहेत. त्यामुळे कुटुंबावर देखील मोठा आघात झाला होता. अपघाताने दिव्यांगत्व आल्याने तृप्तीच्या भविष्याबाबत चिंता निर्माण झाली होती. पाटील यांच्या फिटमेंट कॅम्पमुळे आज तृप्ती पुन्हा आपल्या पायावर उभी राहू शकली आहे. कृत्रिम पाय बसवल्यानंतर चक्क ती धावू लागली.

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २४ फेब्रुवारी-**
समाजातील गरजू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि विशेषतः दिव्यांग बांधवांच्या जीवनातील अंधकार दूर करून तिथे उमेद निर्माण करण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील नेहमीच ढाल बनून उभे राहतात. त्यांच्या याच माणुसकीच्या ओलाव्यामुळे कोथरुडमधील असंख्य नागरिक त्यांच्याकडे एका हक्काच्या पालकाप्रमाणे पाहतात. आज त्यांच्या पुढाकाराने पुण्यातील अनेक दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.

दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी ना. पाटील यांच्या पुढाकारातून आणि तर्क फाऊंडेशन, भारत विकास परिषद, फ्युप्रो, मिशेलिन आणि समुत्कर्ष सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या नोव्हेंबर महिन्यात एक विशेष तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो दिव्यांग बांधवांची तपासणी करण्यात आली. यातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना आज फूट आणि आधुनिक कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आले. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला महापालिका आयुक्त नवलकिशोर राम फ्यूप्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी निमिष मेहरा, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष दत्तात्रय चितळे, राजेंद्र जोग, विश्वस्त आणि दिव्यांग केंद्र प्रमुख विनय खटावकर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पत्नी मोनिका मोहोळ उपस्थित होते.




### मतदारांनी दिलेल्या संधीचं कामाद्वारे सोनं करेन

**नूतन सदस्या चेताली मुळे यांच्या भावना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
नान्नज जिल्हा परिषद मतदार संघातील मतदारांनी माझ्यावर टाकलेला विश्वास ही जबाबदारी समजून या संधीचं कामाच्या माध्यमातून निश्चित सोनं करून दाखवेन अशी भावना नूतन सदस्या चेताली मुळे यांनी व्यक्त केली.

नान्नज जिल्हा परिषद गटात समाविष्ट असलेल्या गावातील मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी भागाईवाडी-शेरेवाडी येथील गाव भेट दौऱ्यात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षा माजी सरपंच कविता घोडके-पाटील होत्या. यावेळी श्रीकांत मुळे, अमृता पाटील, प्रताप पाटील, अंकुश घोडके, बालाजी घोडके, विजय घोडके, जयसिंह चौधरी, शिवाजी सिताराम घोडके, वैभव घोडके, अमर क्षिरसागर उपस्थित होते.

माजी आमदार दिलीप माने यांनी मला भाजपची उमेदवारी देऊन राजकीय आशीर्वाद दिले तर मतदारांनी देखील विश्वासाने संधी दिली असल्याच्या त्या म्हणाल्या.



भाजप हा कार्यकर्त्यावर कधीही अन्याय न करणारा पक्ष आहे. पूर्वी म्हणालो होतो की, कृष्णराज हा उगवता सूर्य आहे आणि त्याला कोणीही झाकू शकणार नाही. आज खऱ्या अर्थाने त्या वाक्याची पहाट झाली आहे.
**-धनंजय महाडिक**, खासदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ 

राज्याची ७७ हजार कोटींची कंत्राटदारांची देणी थकलेली असताना नवीन टेंडर कोणासाठी काढले जात आहेत. योजनांची फक्त सरसकट घोषणा करण्यात आली त्यासंदर्भात काहीही विचार करण्यात आला नाही.
**-सचिन अहिर**, आमदार



# इराणी लष्कराचे हेलिकॉप्टर कोसळले

● युद्धसरावादरम्यान बाजारपेठेतच घडली घटना
● वैमानिकासह चार जणांचा मृत्यू



◆ **तेहरान, २४ फेब्रुवारी**

अमेरिकेच्या सैन्य कारवाईच्या भीतीने इराणी लष्कर आणि नौदलाकडून सातत्याने युद्धसराव सुरू आहे. अशातच मंगळवारी सकाळी सराव सुरू असताला लष्कराचे एक हेलिकॉप्टर अनियंत्रित होवून इस्फहान प्रांतात असलेल्या दोरचेह भागातील एका भाजीपाला बाजारपेठेत कोसळले. या घटनेत वैमानिक, सहाय्यक वैमानिकासह चार जण जागीच ठार झाले. यात दोन लष्करी जवानांचाही समावेश आहे. हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर झालेल्या स्फोटात ३५ लोक होरपळले.

उड्डाणावेळी तांत्रिक बिघाड आल्याने हेलिकॉप्टर कोसळल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने प्रसारित केलेल्या व्हिडीओंमध्ये बाजारपेठ परिसरात धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा निघताना दिसल्या. अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. इस्फहान प्रांतात अनेक लष्करी तळ आणि अणूप्रकल्प आहेत. त्यामुळे या परिसरात लष्करी हेलिकॉप्टर कोसळल्याने खळबळ उडाली आहे. याआधीही इराणमध्ये जुन्या विमानांच्या सुट्या भागांच्या कमतरतेमुळे असे अपघात घडले आहेत. (वृत्तसंस्था)

### कधीही भडकू शकते युद्ध

मध्य पूर्वेतील भूराजकीय परिस्थिती अत्यंत स्फोटक बनली असून, अमेरिका आणि इराणमधील संघर्ष आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिलेल्या लष्करी कारवाईच्या इशाऱ्यानंतर अमेरिकेने लेबनॉनची राजधानी बेरुत येथील दूतावासातील ५० कर्मचाऱ्यांना तातडीने माघारी बोलावले आहे. याशिवाय परराष्ट्र मंत्री मार्को रूबिओ यांचा नियोजित इस्रायल दौराही अचानक रद्द करण्यात आला असून, यामुळे युद्धाची चिन्हे अधिक गडद झाली आहेत.

### ट्रम्प यांचा पुन्हा कारवाईचा इशारा

ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, अण्वस्त्र करार करण्यासाठी इराणकडे तीन दिवस उरलेले आहेत. त्यांना अमेरिकेच्या अटींकडे दुर्लक्ष करण्याची किंमत मोजावी लागेल. इराणने अण्वस्त्र निर्मितीचा अट्टाहास सोडला नाही, तर अमेरिका लष्करी कारवाईसाठी सज्ज आहे. त्यांना जगातील कोणतीही ताकद वाचवू शकणार नाही.

### हिजबुल्लाह आणि जुन्या जखमा

**लेबनॉनमधील दहशतवादी संघटना हिजबुल्लाहने इराणला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. युद्धाची परिस्थिती उद्‌भवल्यास हिजबुल्लाह लेबनॉनमधील अमेरिकन तळ आणि दूतावासावर हल्ला करण्याची शक्यता आहे आणि यामुळेच अमेरिकेने बेरुत येथील दूतावासातून कर्मचाऱ्यांना माघारी बोलावण्याचा निर्णय घेतला. १९८३ मध्ये बेरुतमध्ये अमेरिकन मरीन बॅरेक्स आणि दूतावासावर झालेल्या हल्ल्यात शेकडो अमेरिकन नागरिक मारले गेले होते. या हल्ल्यात हिजबुल्लाहचा हात होता. त्यामुळेच, कोणतीही कारवाई करण्यापूर्वी अमेरिका आपल्या नागरिकांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करत आहे.**

# हरयाणातील समलखा येथे होणार अ. भा. प्रतिनिधी सभा

## अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा यावर्षी युगाब्द ५१२७, विक्रम संवत २०८२, चैत्र कृष्ण दशमी (दोन दिवस), एकादशी म्हणजेच १३, १४ आणि १५ मार्च रोजी हरयाणातील समलखा येथे आयोजित केली आहे, अशी माहिती अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिली.

संघाच्या दृष्टिकोनातून ही सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या संस्थेची बैठक आहे. ही वार्षिक बैठक यावर्षी समलखा येथील ग्राम विकास आणि सेवा साधना केंद्र, पट्टी कल्याण येथे आयोजित करण्यात आली आहे.

या वर्षी संघ शताब्दी असल्याने विजयादशमी उत्सव, गृहसंपर्क, हिंदू संमेलन, युवा संमेलन, प्रमुख नागरिक चर्चासत्र, सामाजिक सलोखा बैठका इत्यादी कार्यक्रम आणि मोहिमांचा लेखाजोखा घेऊन



अनुभवांवर बैठकीत विशेष चर्चा होईल. प्रतिनिधी सभेत मागील वर्षातील म्हणजे २०२५-२६ च्या संघाच्या कार्याचा आढावा घेतला जाईल आणि प्रांतांमध्ये केलेल्या विशेष कामांची माहिती दिली जाईल. या बैठकीत सध्याच्या राष्ट्रीय परिस्थितीवर चर्चा होईल आणि महत्त्वाच्या विषयांवर ठराव मंजूर केले जातील. संघ शाखांकडून हाती घेतलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांवर, विशेषतः पंच परिवर्तन प्रयत्नांवर चर्चा अपेक्षित आहे. संघ शिक्षा वर्ग आणि कार्यकर्ता विकास वर्गासह इतर प्रशिक्षण वर्गांच्या योजनांवर चर्चा केली जाईल आणि येत्या वर्षासाठी संघाची कार्ययोजना निश्चित केले जाईल.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, सर्व सह-सरकार्यवाह आणि इतर पदाधिकारी तसेच कार्यकारिणी सदस्य या बैठकीला उपस्थित राहतील. प्रामुख्याने निवडून आलेले प्रतिनिधी, राज्य आणि प्रदेश पातळीवरील प्रमुख पदाधिकारी आणि १४८९ स्वयंसेवक या बैठकीत सहभागी होण्याची अपेक्षा आहे. संघाने प्रेरित ३२ वेगेवेळ्या संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, सरचिटणीस आणि संघटन मंत्रीदेखील बैठकीत सहभागी होतील. (वृत्तसंस्था)

# कालव्यात कार कोसळली; तिघे बेपत्ता

◆ **छ.संभाजीनगर, २४ फेब्रुवारी**

पैठण शहराजवळ जायकवाडी धरणाच्या कालव्यात कार कोसळल्याने तीन जण बेपत्ता झाले आहेत. ही घटना सोमवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास पैठणच्या चांगतपुरी गावातील एका महाविद्यालयाजवळ घडली. अपघातग्रस्त कार अहिल्यानगर जिल्ह्यातील कोरडगावहून पैठणला जात होती.

कारचालक अल्ताफ पठाणला जायकवाडी धरणाच्या कालव्यावर चुकीच्या मार्गाने जात असल्याचे लक्षात आले. त्याने गाडी वळवण्याचा प्रयत्न केला. त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार पुलावरून उजव्या कालव्यात पडली. ही घटना बघून स्थानिक रहिवासी रावसाहेब खेडकर मदतीला धावून गेले. कारमधील प्रवासी मुकीद शेख आणि निलोफर शेख यांच्यासह रावसाहेब खेडकर पाण्यात वाहून गेले. कारचालक अल्ताफ पठाण सुरक्षित बाहेर पडण्यात यशस्वी झाला. (वृत्तसंस्था)

# अंदमानच्या समुद्रात हेलिकॉप्टर कोसळले

### सर्व प्रवासी सुखरूप बचावले

◆ **श्री विजय पुरम्, २४ फेब्रुवारी**

उत्तर आणि मध्य अंदमान जिल्ह्यातील रंगत येथून उड्डाण केल्यानंतर पवन हंस हेलिकॉप्टर मंगळवारी सकाळी चालक दलाचे दोन सदस्य आणि पाच प्रवाशांसह समुद्रात कोसळले. सर्वांना वाचविण्यात यश आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील मायाबंदर येथील नियोजित लॅण्डिंगपूर्वी सकाळी साडेनऊ वाजता हा अपघात झाला. चालक दलाचे दोन सदस्य तसेच पाच प्रवाशांना वाचविण्यात यश आले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तांत्रिक समस्या उद्‌भवल्यावर वैमानिकाने समुद्रात 'क्रॅश लॅण्डिंग' केल्याचे प्राथमिक चौकशीतून निष्पन्न झाले आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. सकाळी ९.१० मिनिटांनी हेलिकॉप्टरने मायाबंदर येथे जाण्यासाठी उड्डाण केले आणि सकाळी साडेनऊ वाजता ते उतरणार होते. तथापि, ते धावपट्टीपासून ३०० मीटर अंतरावर समुद्रात कोसळले, असे पवन हंसच्या प्रवक्त्याने वृत्तसंस्थेला सांगितले.

पवन हंस ही नोएडा येथील एक केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. पोर्ट ब्लेअर येथून एक मदत हेलिकॉप्टर पाठवण्यात आले. सर्व जखमींवर मायाबंदर येथील डॉ. राजेंद्र प्रसाद रुग्णालयात उपचार सुरू आहेत. (वृत्तसंस्था)


## चित्रपट वार्ता

### वेबसिरीज 'संगमरमर'चा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई** : जिओ हॉटस्टारने त्यांच्या बहुप्रतीक्षित 'संगमरमर' या मालिकेचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि राजश्री प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली तयार झालेल्या या मालिकेचे दिग्दर्शन विक्रम घई यांनी केले आहे. ट्रेलरवरून ही कथा नात्यांचे नाजूक पदर, कौटुंबिक संघर्ष आणि भावनांचा संगम मोठ्या खुबीने सादर करेल हे स्पष्ट होते. ही वेबसिरीज २६ फेब्रुवारीपासून स्ट्रीम होईल आणि विशेष म्हणजे दर गुरुवारी त्याचे नवीन भाग प्रदर्शित केले जातील. या मालिकेत सूरज बडजात्याच्या सिग्नेचर भावनिक कथाकथनाची झलक पाहायला मिळेल. हे एक मल्टी-जनरेशनल कौटुंबिक नाटक आहे.

### अरावलीच्या निसर्गात रश्मिका-विजयचे लग्न



**उदयपूर** : दक्षिणात्य चित्रपटांचे अभिनेता विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्या लग्नाच्या कार्यक्रमांना सुरूवात होते आहे. दोघांनी लग्नासाठी उदयपूर शहर निवडले आहे. वर-वधू कुटुंबासोबत लग्नाच्या ठिकाणी म्हणजेच लक्झरी हॉटेल 'मोमेंटोस एकाया' येथे पोहोचले आहेत. २६ फेब्रुवारीला हे जोडपे सप्तपदी घेत विवाहबंधनात अडकणार आहेत. हे हॉटेल एकलिंगजीजवळ अरवलीच्या दऱ्यांमध्ये आहे. हे ठिकाण शहराच्या गजबजाटापासून दूर आहे. लेक सिटीचे हे सौंदर्य विजय आणि रश्मिकालाही खूप आवडले आणि ते साऊथवरून येथे लग्नासाठी आले आहेत.

### अनिल कपूर आजही पत्नीकडे मागतात पैसे

**मुंबई** : नुकताच 'सुभेदार' चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात झाला. यावेळी अनिल कपूर यांनी चित्रीकरणाचे काही अनुभव शेअर केले आणि घरात कोणीही त्यांचा चाहता नाही, असे ते मस्करीत म्हणाले. घरातून कार्यक्रमासाठी निघताना त्यांच्या पत्नी सुनीता कपूर यांनी त्यांना विचारले की ते कुठे जात आहेत? त्यांनी ट्रेलर लॉन्चबद्दल सांगितले. सुनीता यांनी पुन्हा विचारले की कोणता चित्रपट आणि कार्यक्रम कुठे आहे? आजही चित्रीकरणाला जाण्यापूर्वी पत्नीकडून १० ते १५ हजार रुपये पॉकेट मनी घ्यावी लागते, असे ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात अनिल कपूर यांनी सांगितले.



# पश्चिम बंगालच्या जनतेला मोदींचे पत्र

### म्हणाले, राज्याला विकसित आणि समृद्ध करण्याचा संकल्प

◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालच्या नागरिकांना हिंदी आणि बंगाली भाषेत एक खुले पत्र लिहिले आहे. त्यांनी सीएएचा उल्लेख करत घुसखोरी रोखणे, राज्याचा विकास, कायदा आणि सुव्यवस्था, कल्याणकारी योजना यासारख्या मुद्यांना हात घातला आहे. पंतप्रधानांनी पत्राची सुरुवात 'जय माँ काली', अशी केली आहे. त्यांनी पत्रात लिहिले, आता, काही महिन्यांतच पश्चिम बंगालचे भवितव्य निश्चित होईल. येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य कोणत्या दिशेने जाईल, हे तुमच्या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयांवर अवलंबून असेल.

त्यांनी पुढे लिहिले की, सोनेरी बंगालचे स्वप्न पाहणारा प्रत्येक तरुण, वृद्ध आणि महिला आज खूप वेदना सहन करत आहे. त्यांचे दुःख माझ्या हृदयालाही वेदना देत आहे. म्हणून, मी एक संकल्प केला आहे. पश्चिम बंगालला विकसित आणि समृद्ध करण्याचा माझा संकल्प आहे. गेल्या ११ वर्षांत देशवासीयांच्या आशीर्वादाने माझ्या सरकारने सार्वजनिक कल्याण आणि सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत आमच्या धोरणांचे सकारात्मक परिणाम आज दिसून येत आहेत. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेवर 'बॉम्ब'चा हल्ला!

● १० हजारे उड्डाणे रद्द ● अनेक राज्यांमध्ये आणिबाणी जाहीर



◆ **न्यू यॉर्क, २४ फेब्रुवारी**

ईशान्य अमेरिकेत तीव्र हिमवादळामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, दहा हजारपेक्षा अधिका विमानांचे उड्डाणे स्थगित करण्यात आली आहेत. न्यू यॉर्क, बोस्टन आणि फिलाडेल्फियासारख्या शहरांमध्ये आणिबाणी जाहीर करण्यात आली. अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाला असून, रस्ते आणि रेल्वे वाहतूक खंडित झाली आहे. मुसळधार पाऊस, बर्फवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. प्रशासनाने लोकांना घरातच राहण्याचे आवाहन केले आहे.

ईशान्य अमेरिकेत हिमवादळाने कहर केला आहे. मेरीलँड ते मेन पर्यंतच्या भागात बर्फाची मोठी चादर पसरली आहे. या तीव्र हवामानामुळे मंगळवारपर्यंत दहा हजारांहून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली. सोमवारी पाच हजारांपेक्षा अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली. हजारो प्रवासी विमानतळावरच अडकल्याने प्रशासनासमोर त्यांना सुविधा पुरवण्याचे मोठे आव्हान आहे. न्यू यॉर्कचे जेएफके, लागार्डिया आणि बोस्टनचे लोगान विमानतळावरील विमानसेवा पूर्णपणे स्थगित करण्यात आली. महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा असून, वाहतूक ठप्प आहे, तर दुसरीकडे रेल्वे सेवादेखील विस्कळीत झाली आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक भागातील वीजपुरवठा २४ तासांपेक्षा अधिक काळापासून खंडित असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने दिली. (वृत्तसंस्था)

### बचावकार्यासाठी राष्ट्रीय रक्षक तैनात

वादळाचा परिणाम इतका तीव्र होता की संयुक्त राष्ट्रांना त्यांची सुरक्षा परिषदेची बैठक पुढे ढकलावी लागली आणि त्यांचे मुख्यालय बंद करावे लागले. रेल्वे आणि बस सेवा बंद आहेत. डोअरडॅश सारख्या डिलिव्हरी सेवांनीही कामकाज थांबवले आहे. जोरदार वाऱ्यांमुळे, वीज पुनर्संचयित करण्यात कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणी येत असल्याची माहिती न्यू यॉर्कचे महापौर जोहरान ममदानी यांनी दिली. अनेक शहरात बचावकार्यासाठी राष्ट्रीय रक्षक तैनात केले आहेत.

### शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर

हवामान शास्त्रज्ञांनी हिमवादळाचे गेल्या दशकातील सर्वात शक्तिशाली वादळ म्हणून वर्णन केले आहे आणि त्याला 'बॉम्ब चक्रीवादळ' असे नाव देण्यात आहे. अनेक भागात दोन फूट (६० सेंटीमीटर) पेक्षा जास्त बर्फ पडला. वॉरविक, रोड आयलंड येथील रस्त्यांवर तीन फुटांपेक्षा जास्त बर्फाची चादर पसरली आहे. त्यामुळे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली.



# मंदिरांच्या भागांचा वापर करून बांधली भोजशाळेतील मशीद

## भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अहवालातील माहिती

◆ **इंदूर, २४ फेब्रुवारी**

मध्यप्रदेशच्या धार येथील भोजशाळा संकुलातील मशीद ही प्रचीन मंदिरांच्या अवशेषांसूनच तयार करण्यात आली आहे, असा निष्कर्ष भारतीय पुरातत्त्व विभागाने (एएसआय) काढला आहे. हा निष्कर्ष काढण्यासाठी पुरातत्त्व विभागाने वैज्ञानिक तपासणी, उत्खनन, तेथील जुने दगड, शिलालेख आणि शिल्पांचा सखोल अभ्यास केला आहे. पुरातत्त्व विभागाने इंदूर उच्च न्यायालयात अहवाल सादर केला आहे.

धार येथील भोजशाळेत सरस्वती देवीची मूर्ती बसविण्याची आणि संपूर्ण संकुलाची व्हिडीओग्राफी करण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. येथील नमाज बंद करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली होती. १५ जुलै २०२४ रोजी पुरातत्त्व विभागाने उच्च न्यायालयात एक अहवाल सादर केला आहे. धार येथील भोजशाळा संकुलातील सध्याचे बांधकाम हे शतकानुशतके होत गेले असून, ते करताना रचनेतील एकसारखेपणाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.

या प्रकरणावर नुकत्याच झालेल्या सुनावणीत न्यायालयाने हा अहवाल सर्व संबंधित पक्षांना देण्याचा आदेश दिला. न्या. विजय कुमार शुक्ला आणि न्या. आलोक अवस्थी यांनी सर्व पक्षांना या अहवालावर आपली मते किंवा आक्षेप नोंदवण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ दिला असून, या प्रकरणाची पुढची सुनावणी १६ मार्च रोजी होणार आहे.

ही संपूर्ण रचना परमार राजवंशाची आहे. ती राजा भोज आणि त्यांच्या पूर्वजांनी मांडली होती, हे भोजशाळा सर्वेक्षण आणि अहवालातून समोर आले आहे. भोजशाळेचे धार्मिक स्वरूप काय असेल, हे महत्त्वाचे आहे, असे याचिकाकर्ते एएसआय इंदूर फॉर जस्टिसचे राज्य उपाध्यक्ष आशिष गोयल यांनी स्पष्ट केले.

**अहवालात नेमके काय?**

उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेला अहवाल हा १० खंडात दोन हजार पानांचा आहे. पुरातत्त्व विभागाच्या आलोक त्रिपाठी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ९८ दिवसांच्या सखोल अभ्यासातून तो तयार केला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केलेल्या या सर्वेक्षणात ही वास्तू देवी सरस्वतीचे मंदिर असल्याचे संकेत मिळाले आहेत.

**पथकाला सापडली १४ शिल्पे**

संशोधनात पथकाला ९४ शिल्पे व त्यांचे अवशेष सापडले असून, त्यातील बऱ्याच मूर्तींची तोडफोड झालेली दिसते. येथील खांब, खिडक्या आणि तुळ्यांवर गणेश, ब्रह्मा, नरसिंह, भैरव यासारख्या अनेक देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. या ठिकाणी सिंह, हत्ती, घोडा यांसारखे विविध प्राणी आणि कीर्तिमुख किंवा व्याला यासारख्या पौराणिक कलाकृतींचे नक्षीकाम मोठ्या प्रमाणावर आढळले आहे. (वृत्तसंस्था)

### अहवालातील प्रमुख निष्कर्ष

- **सध्याची ही वास्तू आधीपासून अस्तित्वात असलेल्या एका बेसाल्ट रचनेवर बांधलेली. खालचा भाग आता पाया म्हणून वापरला गेला आहे.**
- **बांधकामाचे तीन टप्पे आढळले असून, त्यातील सर्वात जुना टप्पा दहाव्या ते अकराव्या शतकातील परमार काळातील आहे. बांधकामाच्या सर्वांत जुना टप्प्याचे अवशेष बेसाल्टच्या शिळांनी झाकलेले आहेत.**
- **सर्वेक्षणात आढळलेले १०६ खांब आणि ८२ अर्ध-खांब हे मूळतः मंदिरांचे भाग असावेत असे दिसते. त्यावर देवता आणि मानवी आकृत्यांची तोडफोड केल्याच्या खुणा आहेत.**
- **९४ शिल्पे आणि त्यांच्या तुकड्यांवर विविध देवतांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत.**

# बांगलादेशात उफाळला हिंसाचार

## ड्रग्जविरोधी कारवाईमुळे विद्यार्थी संघटना संतप्त

### संघर्षात ६० जखमी



◆ **ढाका, २४ फेब्रुवारी**

पोलिसांनी देशातील विविध भागांत मादकपदार्थविरोधातील कारवाईमुळे विद्यार्थी संघटना संतप्त झाल्या. त्यांनी राजधानी ढाका आणि प्रमुख शहरात कारवाईच्याविरोधात केलेल्या निदर्शनाला हिंसक वळण लागले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शासकीय वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ केली. पोलिसांसोबत झालेल्या संघर्षात २५ पोलिसांसह ६० लोक जखमी झाले.

बांगलादेशात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर हिंसाचाराची धग सुरूच आहे. राजधानी ढाका येथे पोलिसांच्या मादकपदार्थविरोधी कारवाईदरम्यान हिंसाचार उफाळला, ज्यामध्ये विद्यार्थी, पत्रकार आणि पोलिस कर्मचारी जखमी झाले. ढाका येथील सुहरावर्दी उद्यानात सोमवारी रात्री पोलिसांनी मादक पदार्थ तस्करांवर कारवाई करीत आठ जणांना अटक केली. (वृत्तसंस्था)

### तस्करीत ढाका विद्यापीठातील विद्यार्थी

मसूद म्हणाले की, पोलिसांना विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा एक गट आढळला जो गांजा तस्करीत सहभागी होता. अटक केलेल्यांमध्ये ढाका विद्यापीठातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. पोलिसांवर हल्ला झाल्यामुळे बळाचा वापर करावा लागला. पत्रकारांवरील आरोपांचा संदर्भ देताना मसूद त्यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांना माहिती नव्हते की, त्यातील कोणीही पत्रकार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# दहशतवादाविरुद्ध नवा ‘प्रहार’

भारत हा शांतताप्रिय देश असला आणि त्याने कधीही कुणावर आक्रमण केल्याचा इतिहास नसला, तरी भारताचे शत्रू कमी नाहीत. विशेषतः इस्लामचे कट्टरपंथी, नक्षलवादी, ईशान्य भारतातील विभाजनवादी, शेजारच्या देशांतून येणारे घुसखोर अशा अनेक घटकांनी भारताला दशकानुदशके त्रास दिला. त्यामुळे त्यांच्याशी लढणे भारताला भाग होते. ती लढाई भारत सतत लढत आला. ज्यांच्या धर्माचे नाव हे ‘शांतते’चे प्रतीक असल्याचे सांगतात, त्यांच्याच हिंसाचाराला आणि जिहादी मानसिकतेला भारताला प्रत्युत्तर देत राहावे लागले. आजही तो प्रतिकार संपलेला नाही. एक मात्र खरे की, दीर्घ काळापर्यंत भारताचा हा दहशतवादविरोधी लढा हा प्रतिक्रियात्मक स्वरूपाचा होता. दहशतवादी घटना घडली की यंत्रणा हलायची, निषेध व्हायचा, चौकशी व्हायची आणि काही काळाने पुन्हा तेच चक्र सुरू व्हायचे. गेल्या दशकभरात हे चित्र बदलले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यापासून सर्व प्रकारचे दहशतवादी, विभाजनवादी यांची पाचावर धारण बसली आहे. आता केंद्र सरकारने पहिल्यांदाच दहशतवादाविरुद्ध एक सर्वंकष, सुस्पष्ट आणि बहुआयामी धोरण जाहीर केले आहे आणि त्याचे नाव आहे- प्रहार. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या विचारप्रणालीतील मूलभूत बदलाचे प्रतीक म्हणून या धोरणाचा विचार केला पाहिजे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रालयाने जारी केलेले प्रहार हे भारताचे पहिले सर्वसमावेशक दहशतवादविरोधी धोरण आहे. दहशतवाद हा केवळ सीमेपार घुसखोरीपुरता मर्यादित नसतो; तो सायबर विश्वात, अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रांत, सामाजिक माध्यमांत, अगदी कारागृहांच्या भिंतींआडही पसरत असल्याची जाणीव या धोरणातून स्पष्ट होते. जल, थल आणि नभ या तिन्ही आघाड्यांवर भारताला धोका आहे, असे स्पष्ट नमूद करताना ऊर्जा, रेल्वे, विमानतळ, बंदरे, संरक्षण, अवकाश, अणुऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र क्षमता विकसित केली जात असल्याचा उल्लेख या धोरणात आहे. हे धोरण प्रतिक्रियात्मक नाही; ते पूर्वतयारीबाबतचे आणि त्यानंतर करावयाच्या कृतीबद्दलचे आहे. दहशतवादाला उत्तर देण्यापुरते नव्हे जन्मण्यापूर्वीच त्याचा निःपात करणे हा या धोरणाचा आत्मा आहे. दहशतवादाच्या प्रश्नावर भारताची भूमिका दीर्घकाळ ‘सहनशीलतेची’ म्हणून ओळखली गेली. १९९० च्या दशकातला काश्मीर खोऱ्यातील रक्तरंजित काळ, २००१ मधील संसदेवरचा हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ हल्ला इत्यादी अनेक घटनांनी देश हादरला होता. मात्र, आंतरराष्ट्रीय दबाव, राजनैतिक इच्छाशक्तीचा अभाव आणि अंतर्गत राजकारण यामुळे ठोस, आक्रमक आणि दीर्घकालीन रणनीतीची कमतरता जाणवत राहिली. २०१४ नंतरच्या काळात मात्र चित्र बदलले. दहशतवादाला ‘कायद्याची समस्या’ म्हणून नव्हे, तर ‘राष्ट्रीय सुरक्षेचे युद्ध’ म्हणून पाहिले जाऊ लागले. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, आर्थिक पुरवठ्यावर घाव, एनआयएला बळकटी, यूएपीए कायद्यात सुधारणा या सर्व पावलांनी धोरणात्मक आक्रमकता दाखवली. आता प्रहारने त्या आक्रमकतेला संस्थात्मक चौकट दिली आहे. त्यामुळे दहशतवादाविरुद्धचा ‘प्रहार’ हा नवा ‘प्रहर’ आहे.

या धोरणात ही बाब स्पष्ट केलेली आहे की, कोणत्याही धर्माशी जोडून दहशतवादाकडे पाहिले जात नाही. परंतु सीमेपलीकडून प्रायोजित केल्या जात असलेल्या जिहादी संघटना आणि त्यांचे आघाड्यांचे नेटवर्क भारतात हल्ल्यांचे नियोजन करीत असल्याची बाब दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही. अल-कायदा आणि इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया (इसिस) यांसारख्या जागतिक संघटनांनी भारतात स्लीपर सेल निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद या धोरणात घेण्यात आलेली आहे. पूर्वी अशा संघटनांचा उल्लेख टाळला जायचा; आता मात्र वास्तवाला तोंड देण्याचे आणि जे जसे आहे, तसे दाखविण्याचे धैर्य केंद्र सरकारने दाखविले आहे. वास्तवाचा स्वीकार केला आणि त्याला नाव दिले की त्यावर उपाययोजना आखणे सोपे होते, हा साधा नियम आहे.

साधारण दशकभरापूर्वी जाहीर झालेल्या लेफ्ट विंग एक्स्ट्रिमिज्म (एलडब्ल्यूई) राष्ट्रीय कृती आराखड्याने नक्षलवादाच्या मुळांवर प्रहार सुरू केला. सुरक्षा कारवायांसोबत विकासाच्या प्रकल्पांना गती देण्यात आली. रस्ते, मोबाईल टॉवर, बँकिंग सेवा, शिक्षण, आरोग्य या सुविधा नक्षलग्रस्त भागांत पोहोचल्या. एकेकाळी ‘रेड कॉरिडॉर’ म्हणून ओळखला जाणारा पट्टा आकुंचित पावू लागल्याने नक्षलवादी घाबरले. त्यांचे एकाहून एक असे दिग्गज अतिरेकी नेते आत्मसमर्पण करीत आहेत, हा त्याचा पुरावा. नक्षलवाद हा केवळ बंदुकीने संपत नाही; तो विकासाने संपतो, ही समजूत या धोरणामुळे प्रत्यक्षात उतरविली गेली. जम्मू-काश्मीर भागात गेल्या दशकात मोठे परिवर्तन दिसले. कलम ३७० रद्द केल्यानंतर सुरक्षा आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर काम झाले. दगडफेक, बंद, वारंवार होणारे दहशतवादी हल्ले यांची तीव्रता कमी झाली. स्थानिक तरुणांच्या भरतीवर अंकुश ठेवण्यासाठी डि-रॅडिकलायझेशन कार्यक्रम राबविले गेले. समुदाय आणि धार्मिक नेत्यांचा सहभाग वाढविण्यात आला. सीमेपलीकडून ड्रोनद्वारे शस्त्रे टाकण्याच्या घटनांना उत्तर म्हणून तंत्रज्ञानाधारित यंत्रणा उभारली गेली.

प्रहार या नव्या धोरणात सायबर हल्ल्यांचादेखील उल्लेख आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे हॅकर्स आणि शत्रू राष्ट्रांकडून प्रायोजित गट भारतावर हल्ले करीत आहेत. एन्क्रिप्शन, डार्क वेब, क्रिप्टो वॉलेट या माध्यमांतून निधी पुरवठा आणि संवाद साधला जातो. दहशतवाद आता ‘कीबोर्ड’वरूनही चालतो. यासाठी सायबर फॉरेन्सिक क्षमता, डिजिटल ट्रॅकिंग, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि कायदेशीर तज्ज्ञांचा प्रारंभापासून सहभाग या उपायांची रूपरेषा आखली गेली आहे. सीबीआरएनईडी अर्थात रासायनिक, जैविक, किरणोत्सारी, आण्विक, स्फोटक आणि डिजिटल (केमिकल, बायोलॉजिकल, रेडिऑलॉजिकल, न्यूक्लिअर, एक्स्प्लोजिव्ह अँड डिजिटल) धोक्यांवर लक्ष केंद्रित करणे ही या धोरणाची भविष्योन्मुख भूमिका आहे. नव्या काळातील धोके नव्या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे सायबर विश्वाची तसेच इतर धोक्यांची अशी दखल महत्त्वाची ठरते. प्रहार धोरणातून देशभरात एकसमान रचना उभारण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. प्रक्रियांचे मानकीकरण, माहितीची देवाणघेवाण, संयुक्त सराव यामुळे प्रतिसाद अधिक जलद आणि परिणामकारक होईल, ही त्यामागील भूमिका. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजंसी (एनआयए) सारख्या संस्थेला अधिक बळ देण्यात आले आहे. पहलगामसारख्या घटनांनंतर राज्यांच्या दहशतवादविरोधी पथकांशी समन्वय वाढविण्यात आला आहे. या नव्या धोरणाचा उद्देश स्पष्ट आहे. तो असा की, दहशतवादी, त्यांचे वित्त पुरवठादार आणि समर्थक यांना निधी, शस्त्रे आणि सुरक्षित आश्रय मिळू नये याची तजवीज करणे. बँकिंग व्यवहारांवर नजर, हवाला

नेटवर्कवर कारवाई, मालमत्ता जप्ती या उपायांनी देशविरोधी नेटवर्क्सचा आर्थिक कणा मोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. पूर्वी हल्ल्यानंतर आरोपी पकडणे हा उद्देश असे; आता हल्ला होऊच न देणे आणि त्यामागील अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करणे ही भूमिका आहे. आगामी काळात दहशतवाद अधिक तंत्रज्ञानाधारित होईल. ड्रोन, रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डीपफेक या माध्यमांतून अस्थिरता निर्माण केली जाईल. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांना सातत्याने अद्ययावत राहावे लागेल. अशा स्थितीत आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक सहकार्य वाढविणे अपरिहार्य आहे. त्याची व्यवस्था या धोरणात आहे. भारताने दहशतवादाबद्दल ‘शून्य सहिष्णुता’ (झिरो टॉलरन्स) ही भूमिका स्पष्ट केली आहे. दहशतवादाला धर्म, जात, प्रदेश यांचे लेबल लावून गोंधळ निर्माण करण्याऐवजी त्याला राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न म्हणून हाताळणे, ही अतिशय परिपक्व भूमिका आहे. त्यामुळे हे नवे धोरण म्हणजे भारताच्या आत्मविश्वासाचा दस्तऐवज आहे. दहशतवादाविरुद्धचा लढा अजून संपलेला नाही; पण दिशा स्पष्ट आहे, इच्छाशक्ती ठाम आहे आणि यंत्रणा सज्ज आहे. राष्ट्राच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नाही, हा संदेश जगाला आणि देशांतर्गत घटकांनाही दिला गेला आहे, हे प्रहारचे वैशिष्ट्य. ‘घर में घुस के मारने वाला’ भारत म्हणतात तो हाच! ▌


## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# ‘ग्रेट निकोबार’च्या विकासाचा मार्ग मोकळा

ग्रेट निकोबार बेटाच्या मेगा प्रकल्पात आंतरराष्ट्रीय ट्रान्स-शिपमेंट बंदर, ग्रीनफिल्ड विमानतळ, ऊर्जा प्रकल्प व आधुनिक टाऊनशिपचा समावेश आहे. हा केवळ विकासाचा प्रकल्प नाही, तर भारताच्या भावी आर्थिक, सामरिक आणि पर्यावरणीय दिशेचा कसोटीपट आहे. या प्रकल्पाचा सर्वात मोठा लाभ म्हणजे आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात भारताची भूमिका मजबूत होणे. मलाक्का सामुद्रधुनीजवळील स्थानामुळे ग्रेट निकोबार जागतिक व्यापारमार्गाच्या केंद्रस्थानी आहे. सध्या भारतातील मोठ्या प्रमाणातील कंटेनर ट्रान्स-शिपमेंट कोलंबो, सिंगापूर किंवा इतर विदेशी बंदरांमार्फत होते. नवीन बंदर उभारल्यास हा खर्च आणि अवलंबित्व कमी होऊ शकते. या प्रकल्पामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढू शकते. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होऊ शकते. अंदमान-निकोबार बेटसमूहाचा पायाभूत विकास वेगाने होऊ शकतो. विमानतळ आणि टाऊनशिपमुळे पर्यटनालाही चालना मिळू शकते. दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या या प्रदेशाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. ‘ग्रेट निकोबार’चे स्थान भारताला हिंद महासागरातील सामरिक वर्चस्वासाठी मोठी संधी देते. मलक्का सामुद्रधुनी ही जगातील सर्वाधिक व्यापारी जहाजे वापरत असलेली जल वाहतूक मार्गिका आहे.

भू-राजकारणाच्या पटावर हा प्रकल्प केवळ आर्थिक नसून राष्ट्रीय सुरक्षेचा भाग ठरतो; मात्र विकासाच्या या चमकदार आराखड्यामागे गंभीर प्रश्नही आहेत. ग्रेट निकोबार हे समृद्ध वर्षावन, प्रवाळी भत्ती आणि दुर्मिळ प्रजातींचे आश्रयस्थान आहे. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड आणि जमिनीचे रूपांतर यामुळे परिसंस्थेचे संतुलन बिघडण्याची भीती व्यक्त केली जाते. शोम्पेन आणि निकोबारी या आदिवासी जमातींचे पारंपरिक जीवन या भूमीशी घट्ट जोडलेले आहे. त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अस्तित्वावर होणारा परिणाम हा केवळ विकासाचा ‘साईड इफेक्ट’ म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. प्रकल्प शास्त्रीय अभ्यास, पारदर्शक पर्यावरणीय मूल्यांकन आणि स्थानिक समुदायांच्या सहभागासह राबविला गेल्यास शाश्वततेचा आदर्श ठरू शकतो, पण पर्यावरणीय अटी केवळ कागदोपत्री राहिल्यास दीर्घकालीन नुकसान अटळ ठरेल. हवामान बदल, समुद्रपातळीतील वाढ आणि भूकंपीय संवेदनशीलता लक्षात घेता या बेटावरील वसाहती अत्यंत काळजीपूर्ण नियोजनाची मागणी करतात. ‘ग्रेट निकोबार मेगा प्रकल्प’ हा भारताच्या विकासाच्या मॉडेलची परीक्षा आहे. आर्थिक आणि सामरिक लाभ नाकारता येणार नाहीत; परंतु त्यासाठी पर्यावरणीय व सामाजिक किंमत किती मोजावी लागेल, हा प्रश्न आहेच.



विकास आवश्यक आहे, परंतु तो विवेक, विज्ञान आणि न्याय या तिन्हींच्या आधारावरच टिकाऊ ठरतो. ‘ग्रेट निकोबार’चा निर्णय केवळ एका बेटाचा प्रश्न नाही, तर भारताने कोणत्या प्रकारच्या विकासाचा मार्ग स्वीकारायचा आहे, याचे द्योतक आहे. भविष्यकाळात इतिहास या प्रकल्पाकडे कशा नजरेने पाहील, हे आज घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर अवलंबून आहे. या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय हरित लवादाने केंद्र सरकारच्या ९० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या ‘ग्रेट निकोबार बेटा’वरील मेगा प्रकल्पाला मंजुरी दिली आणि पर्यावरणीय परवानग्यांमध्ये पुरेशा संरक्षणात्मक उपाययोजना असल्याचे नमूद केले. न्यायाधिकरणाने २०२२ मध्ये दिलेल्या पर्यावरणीय मंजुरीला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावताना सांगितले की, लादलेल्या अटी आणि सुरक्षात्मक उपाय प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांना सामोरे जाण्यास पुरेसे आहेत. सहा सदस्यीय विशेष खंडपीठाने नमूद केले की, पर्यावरणीय मंजुरी देताना संबंधित सर्व मुद्यांचा सखोल विचार करण्यात आला होता आणि या प्रक्रियेत कोणतीही गंभीर त्रुटी आढळत नाही. हा प्रकल्प सुमारे १६६ चौरस किलोमीटर क्षेत्रात विकसित केला जाणार असून त्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ट्रान्सशिपमेंट बंदर, द्वै-उपयोगी (नागरिक आणि संरक्षणासाठी) विमानतळ, वीज निर्मिती प्रकल्प आणि नियोजित टाऊनशिपचा समावेश आहे.

न्यायाधिकरणाने असेही स्पष्ट केले की, या प्रकल्पामुळे विशेषतः मलाक्का सामुद्रधुनीजवळील भारताची सामरिक क्षमता वाढेल. त्याच्या भौगोलिक स्थानामुळे हिंद महासागर क्षेत्रात भारताचे स्थान अधिक मजबूत होईल. पर्यावरणीय दृष्टीने संवेदनशील भाग असल्यामुळे प्रकल्पासाठी काही कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. त्यात संकटग्रस्त प्रजातींचे संरक्षण, किनारपट्टी संवर्धन तसेच परिसंस्थेचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा समावेश आहे. या प्रकल्पाविरोधात मुद्दे उपस्थित करणाऱ्या दाव्यात याचिकाकर्त्यांनी पर्यावरणीय तसेच आदिवासी समुदायांवरील संभाव्य परिणामांचा मुद्दा उपस्थित केला होता; मात्र उच्चस्तरीय समितीने या मुद्यांचा विचार करून योग्य अटींसह मंजुरी दिली असल्याचे न्यायाधिकरणाने नमूद केले. या निर्णयानंतर राजकीय प्रतिक्रिया उमटल्या असून काही पक्षांनी हा निर्णय पर्यावरणविरोधी असल्याची टीका केली, तर सरकारने याला भारताच्या आर्थिक आणि सामरिक प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल संबोधले. एकूणच राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयामुळे ग्रेट निकोबार मेगा प्रकल्पाला पुढे जाण्यास मार्ग मोकळा झाला आहे, परंतु पर्यावरणीय अटींचे काटेकोर पालन करणे ही प्रकल्प राबविणाऱ्यांसाठी अत्यावश्यक जबाबदारी राहणार आहे.

हा प्रकल्प केवळ पायाभूत सुविधांची उभारणी नसून हिंद महासागरातील भारताच्या सामरिक उपस्थितीचा दीर्घकालीन आराखडा मानला जातो; परंतु विकासाच्या या ध्यासामागे पर्यावरणीय संवर्धन, स्थानिक आदिवासींचे हक्क आणि जैवविविधतेचे रक्षण या प्रश्नांची छाया कायम आहे. ग्रेट निकोबार बेट हे ‘युनेस्को बायोस्फिअर रिझर्व्ह’चा भाग आहे. येथे हजारो हेक्टर प्राथमिक वर्षावने आहेत. प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड अपेक्षित आहे. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, बेटावरील परिसंस्था अत्यंत नाजूक आहे. २००४ च्या त्सुनामीने या प्रदेशाला दिलेला तडाखा अजूनही स्मरणात आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर मानवी वसाहत आणि औद्योगिक प्रकल्प उभारणे पर्यावरणीय जोखमीचे ठरू शकते. शोम्पेन आणि निकोबारी या आदिवासी या समुदायांचे जीवन जंगलाशी आणि समुद्राशी निगडित आहे. प्रकल्पामुळे त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर परिणाम होणार नाही का, हा गंभीर प्रश्न उपस्थित होतो. भारताचे संविधान आणि विविध कायदे आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करतात. विकासाच्या नावाखाली त्यांच्या भूमीवर अतिक्रमण होणे किंवा त्यांचे सांस्कृतिक अस्तित्व धोक्यात येणे, हे लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना बाधा आणणारे ठरते. हिंद महासागर क्षेत्रातील स्पर्धा तीव्र होत असताना, भारताने आपली पायाभूत क्षमता वाढविणे आवश्यक आहे, हे नाकारता येणार नाही; परंतु शाश्वत विकासाचा सिद्धांत केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत उतरायला हवा. प्रकल्प राबवायचाच असेल तर त्यासाठी पारदर्शक पर्यावरणीय मूल्यांकन, स्थानिक समुदायांशी सखोल सल्लामसलत आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. केवळ आर्थिक फायद्याच्या आकड्यांनी विकासाचे समर्थन करणे पुरेसे नाही. ‘ग्रेट निकोबार मेगा प्रकल्प’ हा भारताच्या भविष्यातील विकासाच्या मॉडेलची कसोटी ठरणार आहे. हा प्रकल्प पर्यावरणीय संतुलन, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय हीत यांचा समतोल साधत राबविला गेल्यास आदर्श उदाहरण ठरू शकतो. अन्यथा, तो निसर्ग आणि स्थानिक संस्कृतीवर उमटलेली अपरिवर्तनीय जखम ठरेल. विकास आवश्यक आहे; परंतु तो विवेकाने, विज्ञानाधारित दृष्टिकोनातून आणि मानवी मूल्यांचा सन्मान राखूनच साध्य व्हायला हवा. ‘ग्रेट निकोबार’चा प्रश्न केवळ एका बेटाचा नाही. तो भारताच्या विकास दृष्टीचा आरसा आहे. ▌


(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# नागपूर-अमरावती रस्ता मेफेड्रॉनचा कॉरिडॉर

मेफेड्रॉन (एमडी) हे नशा करणाऱ्या अमली पदार्थाचे नाव आता घरोघरी पोहोचले आहे. एमडीच्या विक्रीचा धंदा चांगलाच फोफावला आहे. त्यासाठी नागपूर-अमरावती हा रस्ता कॉरिडॉर म्हणून वापरला जात आहे. याच मार्गावरच्या कारंजा घाडगे येथे काही दिवसांपूर्वी महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाला एमडी तयार करण्याचा कारखानाच सापडला होता. येथे १२८ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले होते. या कारखान्यातला माल नागपूर व अमरावती मार्गे राज्याच्या अन्य भागात पोहोचविला जात होता. सदर दोन्ही शहरे एमडी तस्करीची प्रमुख केंद्र झाली आहेत. येथूनच अन्य जिल्ह्यांमध्ये एमडी पोहोचविली जाते. अन्य राज्यातही या तस्करांचे नेटवर्क आहे. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महसूल गुप्तचर संचालनालयाने अमरावती शहरातही छापा टाकला होता. ५ किलो एमडी सदर पथकाने जप्त करून काही जणांना ताब्यात घेतले होते. या कारवाईसाठीची आवश्यक माहिती कारंजा प्रकरणातील तपासातून मिळाली होती. कारंजातून कुठे आणि



कोणाकडे माल जात होता, याची संपूर्ण माहिती यंत्रणेला मिळाली आहे. त्या आधारावरच त्याचा तपास सुरू आहे. कारंजा व अमरावतीच्या या दोन मोठ्या कारवायांमुळे एमडी तस्करांच्या मनसुब्यांना धक्का बसला; पण जाळे मात्र उद्ध्वस्त झालेले नाही. अमरावती शहरासह अन्य शहरांमध्येही सलग एमडी जप्त करण्याच्या होत असलेल्या कारवाई, त्याचे द्योतकच मानावे लागेल. नागपूर-अमरावती मार्गावरून अतिशय बेमालूमपणे एमडीची वाहतूक होते. पण, एकदाही या मार्गावर कारवाई झालेली नाही. राज्यातल्या मुंबई, पुणे या मोठ्या शहरांमध्ये पसरलेले एमडीसह अन्य प्रकारच्या मादक ड्रग्सचे लोण आता छोट्या शहरांमध्येही पसरायला लागले आहे. ड्रग्सच्या या विळख्यात तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात अडकत असल्याचे वास्तव आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये झालेल्या अनेक कारवायांमधून ते स्पष्ट झाले आहे. एमडीचे सेवन करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. दोन वर्षांपूर्वी अमरावतीत एक कारवाई झाली होती; त्यावेळी झालेल्या तपासात अमरावतीत येणारे ड्रग्स हे मुंबईतून येत असल्याचे समोर आले होते. या धंद्यात एक मोठे रॅकेट सक्रिय आहे. मुंबई त्याचे मुख्यालय असले, तरी धंद्याच्या दृष्टीने आणि धोके टाळण्यासाठी विदर्भातले नागपूर व अमरावती हे त्याचे विभागीय केंद्र झाले आहे. एमडीच्या धंद्यात दोन साखळ्या तयार झाल्या आहेत. एक व्यवसाय करणाऱ्यांची तर दुसरी साखळी शौकिनांची आहे. प्रत्येक शहरात अशा दोन साखळ्या आहेत. असंख्य तरुण या दोन्ही साखळीच्या कड्या होत आहेत. त्यात महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांचे (यात मुलींचाही समावेश आहे) प्रमाण सर्वाधिक आहे. मोठ्या शहरांमधला हा शौक आता छोट्या शहरांमध्ये फोफावल्यामुळे तो सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण होत असून गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. नशेचे अनेक प्रकार आहेत. अफू व त्यापासून तयार केलेले मॉर्फिन, हेरॉईन इत्यादी तर कोकेन, भांग, गांजा, चरस, ब्राऊन शुगर तसेच स्पिरीटचाही नशेसाठी उपयोग होतो. अतिशौकीन लोक सिंथेटिक अमली पदार्थ आणि आता घातक जीवघेणा एमडीचा (मेफेड्रॉन) वापर करतात. मॉर्फिन, हेरॉईन, कोकेन, चरस, ब्राऊन शुगर याची नशा महागडी असून त्या खालोखाल एमडीचा नंबर लागतो. त्याकडे तरुणांचा कल वाढत आहे. एमडीची खरेदी-विक्री सांकेतिक भाषेत होते, हे विशेष!

एमडीसह अन्य नशेली ड्रग्सच्या व्यसनामुळे अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आणि काहींचे होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सुरुवातीला आवाक्यात असणारी ही नशा केव्हा अनियंत्रित होते, हे घेणाऱ्यालाही कळत नाही. हा शौक जीवघेणा आहे. एमडीची ही समस्या हळूहळू व्यापक स्वरूप घेत आहे. सरकार, पोलिस यंत्रणेला त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. प्रत्येक शहरातले ड्रग्सचे शौकीन आणि त्यांना ड्रग्स पोहोचविणाऱ्यांची साखळी शोधून ती खंडीत करावी लागेल. मोठ्या शहरांमध्ये बसलेले तस्करही शोधावे लागतील. त्यांचे तस्करीच्या अनुषंगाने असलेले अन्य कनेक्शन ब्रेक करावे लागतील. हजारो कोटींच्या उलाढालीच्या या धंद्याची पाळेमुळे खूप खोलवर रुजली आहेत. पोलिसांच्या मर्यादा लक्षात घेऊन महसूल गुप्तचर संचालनालयाने त्यात डोके घातले आहे. त्यांनाही एका क्षणात सर्व शोधून नष्ट करणे शक्य नाही. एक मोठे अभियान त्यासाठी हाती घ्यावे लागणार आहे. प्रबळ इच्छाशक्तीशिवाय ते शक्य नाही. सरकार आणि प्रशासकीय यंत्रणेकडूनच सर्वांना अपेक्षा आहे. ▌

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# श्रीलिंगपुराण

लिंगपुराण भगवान शिवशक्ती ऐक्याचे प्रतीक आहे. पुराण भगवंताच्या अठरा पुराणमय शरीराचा विग्रह तयार केला तर लिंगपुराण त्या विग्रह म्हणजे मूर्तीचा गुल्फ प्रदेश आहे. त्यासाठी ‘लैंगं तू गुल्फकमब’ असा उल्लेख आहे. लिंग हे प्रतीक असून वैशेषिक ग्रंथात याबाबत निवेदन आहे. ते प्रकृती पुरुषात्मक शिव पार्वती स्वरूप आहे. ‘लिंगं वेदी महादेवी लिंगं साक्षन्महेश्वर’ म्हणजे शिवलिंगाची वेदी, जिला काही ठिकाणी शाळुंका म्हणतात, ती पार्वती स्वरूपा आहे. म्हणूनच तेथे वेदीवर हळदी-कुंकू लावून पार्वती पूजन केले जाते. उभे लिंग हे भगवान शिव स्वरूप असून तेथे जलाभिषेक केला जातो. लिंगपुराणानुसार-

‘अलिंगो लिंगमुलं तू अव्यक्तं लिंगमुच्यते ।
अलिंग: शिव इत्युक्तो लिंगं शैवमिती स्मृतं ॥’

अलिंग म्हणजे निर्गुण शिव आणि प्रकृती म्हणजे सगुण शिवलिंग आहे. थोडक्यात शिवाचे एक लिंग स्वरूप आहे, दुसरे अलिंग स्वरूप आहे आणि तिसरे या दोघांच्याही अतीत असे लिंगालिंग स्वरूप म्हणजे ते परमतत्त्व. अजून सोप्या भाषेत सांगायचे तर एक शिवतत्त्व जे निर्गुण निराकार आहे. ज्योतिर्लिंग म्हणजे निर्गुण साकार आणि महादेवाच्या मूर्ती विग्रह म्हणजे सगुण साकार शिवतत्त्व होय. ब्रह्मांड व्याप्त शिवतत्त्व हे साकार लिंगरूपात नटलेले आहे. हेच लिंगपुराण पटवून देते. लिंग पुराण दोन भागात विभागले आहे. पूर्व भागात १०८ अध्याय तर उत्तर भागात ५५ असे एकूण १६३ अध्याय सध्या उपलब्ध आहेत. लिंगपुराणाचे विशाल स्वरूप प्रारंभीच दिले आहे.

एकदा देवर्षी नारद नैमिषारण्यात पोहोचले असता तेथे त्यांनी सुत महामुनींना पाहिले. सुत महाशयांनी देवर्षी नारदांच्या उपस्थितीत सर्व शौनकादी ऋषिमुनींना लिंगपुराण सांगितले. प्रथम त्यांनी लिंगपुराणाची व्याप्ती सांगताना पहिले लिंग पुराणाचे एक कोटी श्लोक होते. त्यानंतर ते चार लाख संख्येत उपलब्ध राहिलेत. पुढे ते केवळ ११ हजार संख्येत राहिलेत; जे आजही उपलब्ध आहेत. लिंगपुराणात सृष्टीची निर्मिती, मनु आणि शतरुपा उत्पत्ती, मैथुनी सृष्टी वर्णन दिले आहे. शिवलिंग प्राकट्याची अद्‍भुत कथा सुतांनी विशद केली. अलिंग तथा लिंगतत्त्व स्वरूप आणि महेश्वर शिव महिमा त्यांनी सांगितला. महेश्वर योगावतार वर्णन, आपल्या शरीरातील योग स्थाने, विविध चक्रे, सदाशिव ध्यान, पाशुपत योग, शिव साक्षात्कार, शिवस्वरूप सद्योजातं महिमा, भगवान वामदेव स्वरूप, तत्पुरुष, अघोर रूप ,ईशान स्वरूप इत्यादी रुद्राध्यायीतील स्वरूप वर्णन लिंग पुराणात आहे. ज्योतिर्मय महालिंग प्राकट्य, महालिंगाच्या मूळस्थानाचे शोधन, लिंगमध्यात उमामहेश्वर तथा उपरोक्त ईशानादी शिवरूप उत्पत्ती या पुराणात आहे. लिंगपूजनाची परंपरा प्रारंभ, शिवयोगी वर्णन, लिंगपूजा विधी इथे दिली आहे. सुदर्शन मुनी, श्वेतमुनी यांच्याद्वारा शिवभक्ती उपदेश, महर्षी दधीची द्वारा महामृत्युंजय मंत्र महात्म्य, नंदीचा जन्म, नंदिकेश्वर शिव इत्यादी वर्णन.

ब्रह्मर्षी वशिष्ठ पुत्र शक्ती, महर्षी पाराशर, शिवभक्त तंडीप्रोक्त, ययाती, ययातीपुत्र यदू, यदूचा वंश, चंद्रवंश, भगवान श्रीकृष्ण अवतार अशा विविध कथा इथे आलेल्या आहेत. तारकासुर, त्याचे पुत्र विद्युन्माली, तारकाक्ष, कमलाक्ष यांचे वर्णन त्यानंतर त्रिपुरासुर वधासाठी भगवान शंकराची प्रार्थना, त्रिपुरासुर वध. पुढे ब्रह्मदेवांकडून विभिन्न लिंग निर्माण आणि पूजन, शिव मंदिर निर्माण महात्म्य तदनंतर कैलासपुरीला जाऊन देवतांनी केलेले शिवपूजन, शिवव्रत आणि पंचाक्षरी मंत्रमहिमा लिंगपुराणात आहे. वाराणसी क्षेत्र महिमा, जालंधर वध, भगवान शिवाच्या अष्टमूर्ती शर्व, भव इत्यादींचे वर्णन. शिवलिंगासमोर अघोरार्चन इत्यादी बाबी या पुराणात आहेत. लिंगपुराणात ज्योतिर्लिंग उत्पत्तीची गोड कथा दिली आहे. भगवान विष्णू आणि भगवान ब्रह्मदेव यांच्यात श्रेष्ठतेवरून वाद विकोपाला गेला तेव्हा दोघांचाही कलह दूर करण्यासाठी आणि त्यांना ज्ञान प्रदान करण्यासाठी भगवान शिवांनी एक दीप्तिमान अग्निस्तंभ निर्माण केला, ज्याला ज्योतिर्लिंग म्हणतात.

‘ज्वालामालासहस्राढ्यम् कालानलशतोपमम् ।
क्षयवृद्धिंविनिर्मुक्तमादीमध्यान्तवर्जितम् ॥’

भगवान विष्णू आणि भगवान ब्रह्मदेवांनी अचंबित होऊन या ज्योतिर्लिंगाच्या टोकापर्यंत जाण्याची आपसात चर्चा केली. भगवान विष्णू वराह रूप घेऊन खालच्या टोकापर्यंत निघाले. ब्रह्मदेव हंस रूपाने वरच्या टोकापर्यंत निघाले. दोघांनाही ज्योतिर्लिंगाचा थाग लागला नाही. भगवान विष्णूंनी ते प्रामाणिक सांगितले. पण ब्रह्मदेवांनी मला ज्योतिर्लिंगाचे टोक सापडल्याचे मिथ्या विधान केले. त्यामुळे भगवान शिवमहादेव ज्योतिर्लिंगातून प्रकट झाले. भगवान विष्णूंच्या प्रामाणिक वर्तनावर प्रसन्न होऊन भगवान शिवांनी त्यांना सर्वपूजेचा मान दिला. मात्र, ब्रह्मदेवाच्या मिथ्या विधानाने नाराज होऊन ब्रह्मदेवाची पूजा कुठेच होणार नाही, असा शाप दिला. ज्योतिर्लिंगातून ओंकार ध्वनी येत होता. ते ज्योतिर्लिंग म्हणजे महादेवाची पिंड होय. तेव्हापासून भगवान महादेवाचे रूप म्हणून ज्योतिर्लिंग पूजनाला सुरुवात झाली.

‘ईशानमीशमुकुटं पुरुषास्यं पुरातनम् ।
अघोरहृदयं हृद्यं वामगुह्यं सदाशिवम् ।
सद्यः पादं महादेवं महाभोगीन्द्रभूषणम् ॥’

लिंगपुराणातील हा श्लोक भगवान शिवाचे स्वरूप मंत्र महात्म्य सांगतो. रुद्राध्यायीतील १) ईशान : सर्व विद्यानाम २) तत्पुरुषाय विद्महे ३) अघोरभ्यों थ घोरेभ्य ४) सद्योजातं प्रपद्यामि ५) वामदेवाय नमो हे मंत्र विदित आहेत. भगवान विष्णूंनी या मंत्रांचा जप केला आहे तेव्हापासून हे मंत्र सिद्धमंत्र झालेत.

‘त्रियम्बकं यजामहे त्रैलोक्यपितरं प्रभुम ।
त्रिदेवस्य महादेवं सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ॥’

लिंगपुराणातील हा श्लोक महामृत्युंजय मंत्राचे महात्म्य सांगतो. लिंगपुराणात इतर पुराणांप्रमाणेच सृष्टीची उत्पत्ती, कालगणना, दशावतार, शैव वैष्णव समन्वय आहेच; पण ज्योतिर्लिंग, ज्योतिर्लिंगाची उपासना याबाबत अद्‍भुत आणि अलौकिक बाबींचा उलगडा आहे.

थोडक्यात लिंगपुराण भगवान शिवाची महती सांगतानाच त्याचे सामान्य शिवउपासकांना परिणामकारक आणि सकारात्मक फायदे कसे मिळतील, याचे प्रासादिक कथन करते. शिवशक्ती ऐक्यरूप म्हणजे अद्‍भुत श्रीलिंगपुराण आहे. ▌

९८२२२६२७३५

## रोखठोक विचार

‘प्रस्तावनेचे नवे पान’ हा ‘रोखठोक’मधील लेख विरोधकांचे कर्तव्य व त्यांचे विपरीत वर्तन याचा योग्य समाचार घेतो. सदन कुठलेही असो; लोकसभा वा विधानसभा; अधिवेशनाच्या आधीच्या चहापानात विरोधकांनी सहभाग घेण्याचा शिष्टाचार आहे आणि त्यातूनच सत्ताधारी व विरोधक एकमेकांना जोडत असतात. पण गेली अनेक वर्षे विरोधकांनी अधिवेशनाच्या आधीच्या चहापानावर बहिष्कार टाकण्याची परंपरा निर्माण केली आहे आणि सर्वांमध्ये गोंधळ घालून कामकाजावर बहिष्कार तरी टाकायचा वा कामकाज बंद करायला भाग पाडायचे, हेच चालले आहे. यामुळे कुठल्याही विषयावर सदनात चर्चा होत नाही. नंतर सरकारने कुठलाही निर्णय घेतला की, त्यावर रान उठवायला विरोधक तयार असतात. लोकशाहीत सत्ताधारी व विरोधक दोघांनीही समतोल साधत राज्याचा विकास करायचा असतो, पण ती जाण आताच्या विरोधकांना नाही हे दुर्दैव आहे.

**माया हेमंत भाटकर** /९८६९०७४४९९

## स्वराज्याच्या अस्मितेवर हल्ला



आज महाराष्ट्र पाहतोय की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत छत्रपती शिवरायांच्या ‘हिंदवी स्वराज्याचा’ प्रखर विचार घेऊन लढणाऱ्या मावळ्यांनी विजय मिळविला आहे. हा विजय केवळ सत्तेचा नाही, तर तो हिंदू अस्मितेचा आणि त्या रक्ताचा विजय आहे, ज्या रक्तात आजही शिवरायांची निष्ठा वाहतेय. पण... हा विजयाचा गुलाल डोळ्यांत जाता कामा नये, कारण याच महाराष्ट्राच्या मातीत आजही ‘मोगलांच्या औलादी’ जिवंत आहेत! सावधान! ‘धर्मनिरपेक्षतेचे’ पाकधार्जिने तुमचे रक्त शोषत आहे! आज काही राजकीय शक्ती ‘सर्वधर्मसमभाव’ आणि ‘धर्मनिरपेक्षतेचा’ मुखवटा घालून हिंदू समाजाच्या मुळावर उठल्या आहेत. हे लोक तोंडाने समतेच्या गप्पा मारतात, पण प्रत्यक्षात केसाने हिंदूंचा गळा कापण्याचे नीच कारस्थान रचत आहेत. सावध व्हा, ही आधुनिक मोगलाई अत्यंत घातक आहे. ज्या मालेगावच्या सत्ताकेंद्रावर बसताच हजारो हिंदूंची कत्तल करणाऱ्या, मंदिरे उद्ध्वस्त करणाऱ्या आणि सक्तीने धर्मांतर घडवणाऱ्या क्रूरकर्मा टिपू सुलतानची प्रतिमा महापौरांच्या भिंतीवर लागते, तिथे महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान झाला आहे. छत्रपतींच्या महाराष्ट्रात अशा नराधमांचे उदात्तीकरण होणे, हे आपल्या अध:पतनाचे लक्षण आहे. सत्तेची ऊब मिळताच या प्रवृत्ती आपली खरी ‘मोगली’ रूपे दाखवू लागल्या आहेत. हा धोका आता आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. जगाचे वंदनीय दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांची तुलना त्या धर्मांध आणि क्रूर टिपूशी करणाऱ्या नेत्यांची आणि पक्षांची वैचारिक दिवाळखोरी चव्हाट्यावर आली आहे. सूर्याची तुलना काजव्याशी करण्याचे हे धाडस येते कुठून? अशा नेत्यांना आणि त्यांच्या पक्षाला त्यांची लायकी दाखवून देण्याची वेळ आता आली आहे. अशांना सत्तेच्या गादीवरून खाली खेचणे, हीच खरी शिवभक्ती ठरेल. नवनियुक्त मावळ्यांनो, लक्षात ठेवा... हा विजय केवळ खुर्चीवर बसण्यासाठी मिळालेला नाही. तुमच्या खांद्यावर आता हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची मोठी जबाबदारी आहे. जिथे जिथे ही मोगली प्रवृत्ती डोके वर काढेल, तिथे तिथे तिला ठेचून काढा. सत्तेचा वापर करून हिंदूंच्या अस्मितेचे रक्षण करा. सर्वधर्मसमभावाच्या अफूच्या गोळ्या देणाऱ्यांना ओळखा, कारण त्यांच्या हातातील सुरा आपल्याच गळ्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्र आता फक्त निवडणुका जिंकणारे नेते शोधत नाहीये, तर महाराष्ट्राला आता गरज आहे ती वाघाच्या काळजाच्या धर्मरक्षक, राष्ट्ररक्षक मावळ्यांची!

**अमोल तपासे**/नागपूर

## वाचक पत्रे

## परीक्षा अन् स्पर्धा

सध्या बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. रोज बातम्या वाचून खंत वाटते. विद्यार्थी म्हणजे ग्रहण करणे, मनन-चिंतन करणे, मन एकाग्र करून अभ्यास करणे. नंतर परीक्षा देणे. त्यात



गैरप्रकार करणे चुकीचेच आहे. इतर राज्यातही पाच मिनिटे उशीर झाला म्हणून गेट बंद केले. परीक्षा देता आली नाही. अशीही शिक्षा नको. एखाद्याची कॉपी पकडली जाते. पेपर फुटतात. आम्ही शिकत होतो, तेव्हा पेपर फुटल्याची केवळ अफवा पसरायची. आता मात्र खरंच पेपर फुटतात, हे ऐकून वाईट वाटते. शिक्षण क्षेत्राशी संबंधित नोकरी असल्याने अशा बातम्यांनी अधिक त्रास होतो. मान्य आहे, स्पर्धा आहे. प्रामाणिकपणेच परीक्षा द्या. यशही वाट पाहते आहे, हे लक्षात असू द्या विद्यार्थी मित्रांनो! ▌

**अंजली पळणीटकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# महाराष्ट्र-झारखंड सामना अनिर्णित

## पहिल्या डावाच्या आघाडीवर महाराष्ट्र उपांत्य फेरीत, सचिन धस सामनावीर

## विकी ओस्तवालचे शानदार शतक, सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीची धमाकेदार खेळी






सोलापूर : महाराष्ट्र विरुद्ध झारखंड या सामन्यातील क्षण. दुसऱ्या छायाचित्रात सामनावीर कर्णधार सचिन धस याच्यासमवेत सामनाधिकारी.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर चालू असलेल्या कर्नल सी के नायुडू चषकातील एलिट उपांत्यपूर्व फेरीचा सामना चौथ्या दिवशी चहापानाच्या काही वेळ आधी अनिर्णित संपला. पहिल्या डावातील आघाडीच्या आधारे महाराष्ट्र संघ उपान्त्य फेरीसाठी पात्र ठरला असून १ मार्च पासून पुण्यात पुढील सामना होणार आहे.

महाराष्ट्राचा दुसरा डाव कालच्या धावसंख्येवरून पुढे सुरू झाल्यावर सकाळच्या सत्रात प्रथम विकी ओस्तवाल ने त्याचे शानदार शतक पूर्ण केले आणि दिग्विजय सोबत ९१ धावांची भागीदारी रचली. शुभ शर्मा ने दिग्विजय पाटील (१८) याला झेल बाद करत जोडी फोडली. त्यानंतर आलेल्या सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीने आल्यापासून फटकेबाजीला सुरुवात केली आणि संघाची धावसंख्या २०० पार नेली. चौथ्या विकेटसाठी १३ षटकात ७३ धावांची भागीदारी करताना ४८ चेंडूत ५ चौकार, १ षटकार लगावत ४७ धावा करून आर्शिन मनिषीच्या फिरकीच्या जाळ्यात फसला. त्यानंतर आलेला हर्ष मोगावीरा सोबत विकी ओस्तवाल ने दुसऱ्या बाजूने फटकेबाजी करत ५० धावांची भागीदारी पूर्ण केली. कौनैन कुरेशी ने आधी हर्ष मोगावीरा (२६) आणि विकी ओस्तवाल (१४१ धावा, १७७ चेंडू, १२ चौकार, ६ षटकार) यांना १७ धावांच्या फरकाने बाद केले. २३ धावांची भर पडल्यावर जेवणाला खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्राने ६४ षटके खेळून काढत ६ बाद ३३६ धावा केल्या होत्या तेव्हा किरण चोरमले (२३) आणि साहिल औताडे (१०) खेळपट्टीवर नाबाद होते व महाराष्ट्राने तब्बल ५२१ धावांची आघाडी घेतली होती त्यामुळे सामना अनिर्णित अवस्थेत झुकला होता.

दुपारच्या सत्रात मात्र पुढील महत्वपूर्ण साम न्याच्या आधी कसून फलंदाजी म्हणून महाराष्ट्राने डाव पुढे सुरू ठेवला. ७ व्या विकेट साठी ६८ धावांची भागीदारी रचल्यावर मनिषी याला उंच फटका मारण्याच्या नादात साहिल औताडे (३८) आणि ६ चेंडू नंतर कुरेशी याला षटकार मारण्याच्या नादात किरण चोरमले (४०) झेलबाद झाले.

त्यानंतर मात्र पुढील ९ षटके अत्यंत संथ फलंदाजी करत केवळ ८ धावा करत अजय बोरुडे आणि वैभव दारकुंडे यांनी खेळपट्टीवर टिकून रहाण्याची भूमिका स्वीकारली. दुसऱ्या डावात ८४ षटके खेळून काढत ८ बाद ३८९ धावा झाल्या असताना चहापानाला काही वेळ शिल्लक असताना पंचांनी दोन्ही संघाच्या कर्णधारांना पुढे खेळ चालू ठेवायचा की कसे याबाबत विचारणा केली असता सामना थांबविण्याबाबत निर्णय घेतला आणि सामना अनिर्णित अवस्थेत संपला. झारखंड कडून कौनैन कुरेशी ८८/४, मनिषी १२३/२, शुभ शर्मा आणि अमित कुमार यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

स्पर्धेच्या नियमानुसार पहिल्या डावात आघाडी घेतल्याने महाराष्ट्र संघ पुढील फेरीसाठी पात्र ठरला. सामना संपल्यावर लगेच सामनाधिकारी यांनी साम नावीर पुरस्कार महाराष्ट्र कर्णधार सचिन धस याला त्याच्या २२२ व ३३ धावांच्या खेळाबद्दल जाहीर करत तर्फे २५,००० चा धनादेश देत पुरस्कृत केले तेंव्हा दोन्ही संघाच्या खेळाडूंनी टाळ्या वाजवत त्याचे अभिनंदन केले.

### सोलापूरचे पार्क मैदान लकी

बीसीसीआयच्या च्या २०२५-२६ ह्या देशांतर्गत स्थानिक क्रिकेट स्पर्धातील कूच बिहार मधील हिमाचल प्रदेश सोबतचा सामना आणि कर्नल सी के नायुडू चषकातील ३ सामने सोलापुरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर (त्रिपुरा, पाँडिचेरी, झारखंड विरुद्ध) झाले आणि सर्व सामन्यात महाराष्ट्राने विजय मिळवले असून, येथील उत्तम खेळपट्टी आणि आयोजन नियोजन मुळे खेळाडू, सपोर्ट स्टाफ यांची प्रथम पसंती मुळे सोलापूरचे मैदान हे राज्य क्रिकेट संघटने साठी लकी ठरले असल्याचे दिसून येते.



## सांगोला महाविद्यालयात क्रीडा महोत्सवास सुरुवात

**सांगोला, दि.२४ फेब्रुवारी-**

सांगोला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त क्रीडा विभाग व समितीच्यावतीने क्रीडा महोत्सवास सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे, क्रीडा समिती सदस्य डॉ.मालोजी जगताप, डॉ.अमोल पवार, प्रा.वासुदेव वलेकर, प्रा.विधीन कांबळे, प्रा.प्रसाद लोखंडे, प्रा.विजय यादव, प्रा.भाग्यश्री पाटील, प्रा.सोनल भुंजे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना क्रीडेमधील सहभागाचे महत्त्व पटवून देत निरोगी जीवनशैलीसाठी क्रीडा आवश्यक असल्याचे डॉ.सुरेश भोसले यांनी सांगितले. यंदाच्या क्रीडा स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, खो-खो, बुद्धिबळ, कबड्डी, बॅडमिंटन, रस्सीखेच तसेच थलेटिक्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेता संघांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.

## सोलापूरच्या गार्गी ओकचा तिसऱ्या फेरीत प्रवेश

### राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली १२ वर्षाखालील मुलांन व मुलींन साठी (सुपर सिरीझ) आयोजित केलेल्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत सोलापूरच्या



द्वितीय मानांकित गार्गी ओकने पुण्याच्या बिगर मानांकित कायरा गोहिल चा ६-४,६-० असा पराभव करून उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला.

# श्रेयस कुदळे, सान्वी गोरे अव्वल

### जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा : नियान कंदीकटला व संस्कृती जाधव अजिंक्य



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणे संचलित देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापुर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर पी. एम. उषा योजना अंतर्गत आयोजित जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेत १३ वर्षांखालील गटात सोलापूरच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त श्रेयस कुदळे याने उत्कृष्ट खेळ करत सात पैकी साडेसहा गुणांसह व मुलींच्या गटात बार्शीच्या सान्वी गोरे हिने उल्लेखनीय कामगीरी करत पाच पैकी पाच गुण प्राप्त करत विजेतेपद व आकर्षक चषक पटकाविला.

९ वर्षाखालील मुलांच्या गटात नियान कंदीकटला सहापैकी सहा व मंगळवेढ्याची संस्कृती जाधव हिने चार पैकी चार गुणांसह अव्वल स्थान पटकाविले. सिद्धांत कोठारी, आदिती इनानी, अथर्व दनाने, ज्ञानदा सांगुळे यांनी देखील सुरेख खेळ करत द्वितीय क्रमांक मिळविला व जिल्हा संघातील आपले स्थान निश्चित केले. विविध वयोगटात श्लोक चौधरी, पृथा ठोंबरे, आरुष माने व मेदिनी जगताप यांनी सरस खेळ अव्वल स्थान प्राप्त केले. डी. एच. बी. सोनी कॉलेज येथे येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण संस्थेचे विश्वस्त व नामवंत डॉ. गिरीश हरकुट यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्राचार्या डॉ. आशा रोकडे, नवनाथ भंडारी, संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, प्रा. प्रीती कुलकर्णी, प्रा. सुवर्णा कांबळे, सचिन खंडेलवाल, आबासाहेब भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. विजेत्या खेळाडूंना आकर्षक चषक, मेडल्स तसेच सर्व सहभागी खेळाडूंना देखील प्रशस्तीपत्र व उत्तेजनार्थ मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत प्रमुख पंच म्हणुन वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा-राठी, प्रशांत पिसे, विजय पंगुडवाले, यश इंगळे यांनी यशस्वीरित्या काम पाहिले.

### अन्य वयोगटात श्लोक, पृथा, आरूष व मेदिनी अव्वल

**अंतिम निकाल (अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह):**

(गट, अनुक्रमे १ ते १० क्रमांक, खेळाडूंचे नाव, गुण)

**१३ वर्षे मुले:** श्रेयस कुदळे - ६.५, सिद्धांत कोठारी- ६(३२), सार्थक राऊत- ६(३१.५), आयुष जानगवळी- ६ (२९.५), वेदांत मुसळे- ५(३१), जय तुम्मा- ५(२६.५), विनय रणसुबे- ५(२६), शौर्य चंदनशिवे- ५(२३.५), हर्ष जाधव- ४.५(२७.५), वेदांत पवार- ४.५(२६.५). **मुली:** सान्वी गोरे- ५, अदिती इनानी- ४(१९), प्रतीक्षा चाबुकस्वार-४(१७), सिद्धी देशमुख - ४(१३), श्रेया शिंदे - ४(११), खुशी तोंडले - ३(१४), आरोही दलाल-३(११.५), संस्कृती लव्हाळे - ३(१०), तेजश्री उदगीरी - ३(९.५), श्रद्धा हाके - २(१३)

**११ वर्षे मुले:** श्लोक चौधरी - ५.५, नैतिक होटकर- ५(२९), ओम राऊत - ५(२७.५), नचिकेत तोंडले- ५(२६.५), मयूर स्वामी - ५(२६.५). **मुली:** पृथा ठोंबरे ४, आर्वी सदाफुले - ३(१४), समृद्धी कसबे - ३(१३.५), तेजस्विनी कांबळे - ३(१३), सान्वी होर्तीकर- ३(११)

**९ वर्षे मुले:** नियान कंदीकटला ६, अथर्व दनाने - ५(२१.५), मितांश शिंगवी - ५(२१), नमन रंगरेज - ५(१८), आर्यन गांधी - ४.५(२१.५), कृष्णराज पटाले - ४.५(२०.५), प्रज्ञांश काबरा - ४(२२.५), श्लोक सुरवसे - ४(२२), अजिंक्य कांबळे - ४(२१), विवेक स्वामी - ४(१८.५). **मुली:** संस्कृती जाधव ४, ज्ञानदा सांगुळे - ३(८.५), श्रीशा हरसुर - ३(८), हर्षा क्षीरसागर - ३(७), इशा पटवर्धन - २.५(८.५), समिधा चंदनशिवे - २.५(७.५), वेदिका माडगुंडी - २(८.५), सानिका चंदनशिवे - २(८), काव्या चंदनशिवे - २(७), आसरा शेख - २(६.५)

**७ वर्षे मुले:** आरुष माने - ४(१६.५), लखित काबरा - ४(१५.५), विराज शेंडगे - ३(२१), ओजस पवार - ३(१५.५), मिथिलेश होर्टिकर- २(१६). **मुली:** मेदिनी जगताप - १(७), श्रीजा जांभळे - १(६.५)

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**कलबुरगी येथील एमपीएस स्टॉल**

सोलापूर विभागातील कलबुरागी आणि बार्शी टाउन स्टेशनवरील एमपीएस स्टॉलसाठी ई-लिलाव (सामान्य लिलाव-सिग्नल स्टेज). लिलाव कॅटलॉग क्रमांक: (1) MPS-SUR-KLBG-MPS-4-25-1. लिलाव सुरू बंद, तारीख आणि वेळ: सुरू - 10.00 सकाळी 09.03.2026 बंद - 10.30 सकाळी 09.03.2026. (2) MPS-SUR-BTW-MPS-6-24-1. लिलाव सुरू बंद, तारीख आणि वेळ: सुरू - 10.00 सकाळी 09.03.2026 बंद - 10.40 सकाळी 09.03.2026. स्थानकांचे नाव: कलबुरगी आणि बार्शी टाउन स्टेशनवरील MPS स्टॉलचा ई-लिलाव. पद्धत : आयरेप्स-ई-लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज-मॉड्यूल). निविदेचा कालावधी : वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता :- सर्व ई-लिलाव मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत.

Akar/Sur-11 एसीएम/गुड्स/सोलापूर
तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर पत्ता :- गुरुनानक चौक, उजनी नगर, सोलापूर**
**ई-निवीदा सुचना क्र. 12 सन 2025-26**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृत व जलसंधारण विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १ | मौजे किणी व मौजे पालापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर पाझर तलाव दुरूस्त करणे | ५२७.४६ |

ई-निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक : २५/०२/२०२६ ते ११/०३/२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : १३/०३/२०२६
जा.क्र./निविदा/४९३/२०२५-२६
दिनांक : २३/०२/२०२६

सही/-
(रा.दि. क्षीरसागर)
जिल्हा जलसंधारण अधिकरी,
मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दि.क्रि.अर्ज नं. ११/२०२६
नि.नं. ०५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्या. सो. यांचे कोर्टात**

१) **वृषाली लक्ष्मण भुसारे**
वय - १३ वर्ष, धंदा - शिक्षण
अर्जदार क्र १ हि अज्ञान असून तिची
अ.पा.क. आई ज्योती लक्ष्मण भुसारे
वय - ४१ वर्ष, धंदा - शेती व घरकाम
रा. पिंपळगाव (पान) ता. बार्शी, जि. सोलापूर
ह.मु. वडगाव (सि) ता. जि. उस्मानाबाद.
२) **हर्षदा लक्ष्मण भुसारे**
वय - १९ वर्ष, धंदा - शिक्षण
रा. पिंपळगाव (पान) ता. बार्शी. जि सोलापूर — **अर्जदार**

विरुद्ध

१) **महाराष्ट्र शासन तर्फे शासकीय उपभोक्ता बार्शी.**
२) **विशाखा लक्ष्मण भुसारे**
वय - २१ वर्ष, धंदा - घरकाम
रा. पिंपळगाव (पान) ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **उर्मिला अप्पासाहेब ढाळे**
वय - ४८ वर्ष, धंदा - शेती
रा. पिंपळगाव (पान) ता. बार्शी, जि. सोलापूर. — **सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं १ वृषाली लक्ष्मण भुसारे हि अज्ञान असल्याने तिची पालनकर्ता जनक आई ज्योती लक्ष्मण भुसारे. हिने डी सोलापूर सब डी व ता बार्शी पैकी पिंपळगाव येथील शेत जमीन याचा गट नं २४६/१ व २४८/१ पैकी अर्जदार व सामनेवाला याचे एकूण क्षेत्र ०० हे ९१ आर, पैकी अर्जाचा मुख्य विषय मिळकत गट नं २४६/१ पैकी ०० हे १२.५० आर आणि गट नं २४८/१ पैकी ०० हे ३३ आर याचे खरेदीखतास में कोर्टाची परवानगी मिळणेबाबत हा अर्ज दाखल केलेला आहे. यातील अर्जदार वृषाली हि अज्ञान असल्याने व तिचे वडील दिनांक २१/०७/२०२० रोजी मयत झाल्याने अर्जदार नं १ वृषाली हिचे पालनपोषणाची जबाबदारी आई ज्योती यांचेवर होती व आहे. अर्जदार यांची मौजे पिंपळगाव (पान) येथील मिळकतीवर वारसाहक्काने नावे लागलेली आहेत. अर्जदार नं १ वृषाली हिचे पुढील शिक्षणाकरिता व इतर खर्चासाठी अर्जदार नं १ हिस तिचे दावा मिळकतीतील कायदेशीर हक्क हिस्सा विक्री करण्याचा आहे. अर्जदार नं १ वृषाली हि अज्ञान असल्याने तीची आई ज्योती यांची तिचे वतीने पालकत्वाची नेमणूक होऊन तिचे वतीने खरेदी खतास मे कोर्टाची परवानगी अधिकार अर्जदार नं १ च्या वतीने आई ज्योती हिस मिळणेबाबत सदरचा अर्ज आणलेला आहे. अर्जदार नं १ हिचे येणाऱ्या हिश्यातील काही रक्कम तीचे शिक्षणासाठी व इतर खर्चासाठी वापरून, तसेच काही रक्कम वृषाली हिचे भविष्याचे उदरनिर्वाहासाठी तिचे नावे बँकेत ठेवण्यास तयार आहे. त्यामुळे तिचे हिताचा विचार करून सदर जमीन अर्जदार यांनी गणेश शंकर गुंड यांना विक्री करण्याचे ठरवून त्यापोटी इसार रक्कम घेतलेली आहे. सदर अर्जदार नं १ हिचे वतीने आई ज्योती यांना प्रस्तुत अर्जातील मिळकत यातील खरेदी घेणार गणेश शंकर गुंड यांचे हक्कात करून देण्यास में कोर्टाची परवानगी मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे

त्याअर्थी अर्जदार नं १ च्या वतीने तीची आई ज्योती यांना सदर मिळकत गणेश शंकर गुंड यांना विक्री करणेस परवानगी मिळणेकामी कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास सदर जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत अथवा नेमलेली तारीख २०/०४/२०२६ चे रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणचीही तक्रार न आल्यास मे, कोर्ट पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिद्धीकरण में कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले. ता. २१/०२/२०२६.

सही
कनिष्ठ लिपिक

कोर्टाचा शिक्का

हुकमावरून
सही/-
अधीक्षक
अति जिल्हा व सत्र न्या. सो. बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर.

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दि.क्रि.अर्ज नं. ११/२०२६
नि.नं. ०५

**बार्शी येथील मे. सि.ज. ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**

१) **नागेश दिलीप व्हटकर,**
वय - ३५ वर्षे, धंदा - शेती,
रा. श्रीराम पेठ, पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **संतोष दिलीप व्हटकर,**
वय - ४५ वर्षे, धंदा - शेती,
रा. श्रीराम पेठ, पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **सौ. सुनिता अशोक शिंदे,**
वय - ३७ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. नारी, ता. बार्शी जि. सोलापूर
४) **कमल दिलीप व्हटकर,**
वय - ६५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. श्रीराम पेठ, पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरूध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ४ हे सर्वजण अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर कायमस्वरूपी राहणेस आहेत. यातील अर्जदार नं. १ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत तर अर्जदार नं. ३ ही अर्जदार नं. १ व २ यांची सख्खी बहिण आहे. तसेच अर्जदार नं. ४ व दिलीप कोंडीबा व्हटकर हे यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे आई वडिल आहेत. यात मुळ पुरूष मयत दिलीप कोंडीबा व्हटकर हे पांगरी येथे राहत्या घरी दि. ०९/०५/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. यातील अर्जदार यांना शासकीय / निमशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी तसेच षीरश्र ‍िशलेसपळींळेप करीता वारस दाखल्याची गरज आहे. यातील अर्जदार नं. १ ते ४ यांना दि. १२/०२/२०२६ रोजी शासकीय कार्यालयातील अधिकारी यांनी मयत दिलीप कोंडीबा व्हटकर यांचे वारस असलेबाबत मे. कोर्टाचे वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले, त्यामुळे यातील अर्जदार यांनी त्यांना वारस दाखला मिळणेबद्दल हा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त मयत दिलीप कोंडीबा व्हटकर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता ३०/०३/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही, असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारसा दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्यानिशी दिले असे. ता. २४/०२/२०२६.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय
कनिष्ठ स्तर बार्शी

**यूनियन बैंक ऑफ इंडिया / Union Bank of India**
क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला – सोलापूर क्रॉस रोड शाखा , ता. सोलापूर, जि. सोलापूर शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर १७०० स्क्वे फुट (+ – १०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/०३/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २५/०२/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर
ARL

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**भाडेतत्त्वावर वाहन मिळणेबाबत**

अउदा पॅक विभाग–३, सोलापूर अंतर्गत चाचणी कक्ष बारामती येथे भाडेतत्वावर टाटा सुमो/महिंद्रा बोलेरो प्लस/मराझो/मारुती इरटिगा/किआ कारेन्स किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ११८ दि. २०/०२/२०२६ (2nd Call) असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. ०४/०३/२०२६ संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दुरध्वनी क्र. ८८०५९३९९४७

सही/–
कार्यकारी अभियंता
पॅक विभाग–३, सोलापूर

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038975 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 17/2025-2026, Particulars :-** Work of replacement of existing old type faulty yard lighting system along with various spares by new yard lighting system at various substations under EHV O&M Division Solapur. **Estimated cost:** Rs. 62,73,187/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 62,731/- **Tender Fee cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 24.02.2026 to 11.03.2026 **Last Date of Submission:** 11.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 12.03.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person :** Executive Engineer 7447440852/ Dy. Executive Engineer 7447440605 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**.

**Meeting: 27.02.2026 @ 12:30 pm at EHV O&M Circle, Office Solapur.**

**Subsequent call intimations (2nd / 3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

1) **https://srmetender.mahatransco.in.**
2) **https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सहकर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सहकर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड **(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 153036618 | मालमत्तेवर कर्ज | 1.अभिजित चांगदेव शिंदे 2. अनिता बंडू शिंदे | 06/12/2025 | INR 7,72,424.53/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ८६४ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण क्षेत्रफळ २८९६ चौरस फूट (क्षेत्रफळ ८९६ चौ.फूट दगडी विटांचे सिमेंट बांधकाम आणि २००० चौ.फूट खुली जागा), गाव : रांझणी येथे, ग्रामपंचायतीच्या हद्दीत : रांझणी, तालुका - पंढरपूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र -४१३३०४, आणि सीमा :- पूर्व - बाबासो दिगंबर शिंदे, पश्चिम - रस्ता, उत्तर - कोंडिबा शिंदे, दक्षिण - पिंटू शिंदे.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 164996559 | मालमत्तेवर कर्ज | 1. प्रविण हणमंत मोरे 2. हणमंत ज्ञानेश्वर मोरे | 05/12/2025 | INR 8,71,351.37/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३८१/१, एकूण क्षेत्रफळ २२४० चौ.फूट, विभाग सोलापूर, उपविभाग सांगोला येथे, हळदहीवाडीच्या हद्दीत स्थित आणि सीमा :- उत्तरेस - दत्ता मोरे, दक्षिण - गोरख इंगळे, पूर्वेस - रस्ता, पश्चिम - अमोल चव्हाण.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
दिनांक : 25/02/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)





## महत्त्वाचे

### माझ्या विवाहाचा 'तो' व्हिडीओ बनावट : धवन

**नवी दिल्ली** : गर्लफ्रेंड सोफी शाइनसोबतच्या विवाहाचा व्हायरल झालेला व्हिडीओ बनावट असल्याचे स्पष्ट करताना भारताचा माजी क्रिकेटपटू शिखर धवन याने आपल्या वैयक्तिक आयुष्याचा गैरफायदा घेणाऱ्या गॉसिपर्सना फटकारले. त्याने व्हायरल सोशल मीडिया पोस्टच्या विरोधात भूमिका घेतली धवनने वापरकर्त्यांना डिजिटल ट्रेक्शन मिळवण्यासाठी बनावट व्हिडीओ तयार करणे थांबवण्याचे आवाहन केले तसेच खोट्या विधानांना आव्हान देत त्याने लोकांना 'प्रेम आणि सकारात्मकता' पसरवण्याचे आवाहन केले. मी गेल्यानंतर कोणतीही मुलगी तुझ्याशी लग्न करणार नाही, असे शिखरची माजी पत्नी आयशाने म्हटले होते. तोच धागा पकडत वापरकर्त्यांना हा व्हिडीओ तयार करून व्हायरल केला असावा, असा अंदाज आहे. ■

### तिलकच्या जागी सॅमसनला संधी द्या : पार्थिव

**नवी दिल्ली** : गुरुवारी झिम्बाब्वेविरुद्ध होणाऱ्या टी-२० विश्वचषक सुपर एट सामन्यासाठी उपकर्णधार अक्षर पटेलला भारताच्या अंतिम एकादशमध्ये परतताना पाहावेसे वाटते. तिलक वर्माच्या जागी संजू सॅमसनचा समावेश करून भारत आपल्या डावखुऱ्या प्रभावी संघात बदल करू शकतो, असे मत माजी यष्टीरक्षक-फलंदाज पार्थिव पटेलने मंगळवारी व्यक्त केले. अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी झालेल्या पराभवानंतर, भारतीय संघाला आपले उर्वरित दोन सामने- झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडीजविरुद्ध - चांगल्या फरकाने जिंकावे लागतील. दक्षिण आफ्रिका अपराजित राहून उपांत्य फेरीत प्रवेश करेल अशी आशा आहे. उपकर्णधार असूनही, स्पर्धेत आतापर्यंत सहा बळी घेणाऱ्या अक्षर पटेलला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यासाठी निवडण्यात आले नाही. संजू सॅमसनचा प्रश्न आहे. आता चेन्नईमध्ये त्याचे घरवापसी देखील होऊ शकते. फिरकी गोलंदाजांविरुद्ध भारतीय डावखुऱ्या फलंदाजांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्येचा विचार करता भारतीय संघ व्यवस्थापन निश्चितच यावर विचार करेल, असेही तो म्हणाला. संघ व्यवस्थापन अभिषेक आणि इशानला पाठिंबा देत राहील, मात्र सॅमसनला संघर्ष करणाऱ्या तिलकच्या जागी आणावे, असा त्याने पुनरूच्चार केला.

### आयपीएलपूर्वी रोहितचा तंदुरुस्ती प्रशिक्षणावर भर

**मुंबई** : मुंबई इंडियन्सच्या ३८ वर्षीय रोहित शर्माने आयपीएल २०२६ साठी आधीच तयारी सुरू केली आहे. मी अजून पूर्ण तयार झालेलो नाही. सध्या मी तंदुरुस्ती प्रशिक्षणावर आपले लक्ष केंद्रित केले आहे, असा स्पष्ट



संदेश रोहितने दिला आहे. या अनुभवी खेळाडूने आपले फिटनेस प्रशिक्षण वाढवले आहे. माजी कर्णधार रोहितने नवीन हंगामापूर्वी मुंबई इंडियन्स व्यवस्थापनाकडे आपली भूमिका स्पष्ट केली आहे की, मी केवळ इम्पॅक्ट खेळाडू म्हणून खेळण्याऐवजी अंतिम एकादशमध्ये पूर्ण भूमिका बजावू इच्छितो. आयपीएल २०२५ दरम्यान, रोहितचा वापर अनेकदा केवळ फलंदाज म्हणून केला जात असे, फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरण्यापूर्वी त्याची जागा इम्पॅक्ट खेळाडूने घेतली. रोहितने मर्यादित भूमिका बजावण्याऐवजी आयपीएल २०२६ मध्ये संपूर्ण सामन्यात योगदान देऊ इच्छित असल्याचे सांगितले आहे. रोहित आयपीएलच्या आधी आपली तंदुरुस्ती व फलंदाजी दोन्ही सामन्यांसाठी तयार असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते.

### उपांत्य फेरी, अंतिम फेरीची तिकिटे थेट प्रसारित

**नवी दिल्ली** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) प्रसिद्धीपत्रकात जाहीर केल्यानुसार टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीची तिकिटे मंगळवारी भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७ वाजता थेट प्रसारित होतील. क्रिकेट चाहते ४ मार्च रोजी होणाऱ्या पहिल्या उपांत्य फेरीसाठी, ५ मार्च रोजी होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य फेरीसाठी आणि ८ मार्च रोजी होणाऱ्या बहुप्रतिक्षित अंतिम फेरीसाठी अधिकृत बुकिंग साइट्सवरून जागा बुक करू शकतात. तथापि, उपांत्य फेरी १ चे ठिकाण फ्लोटिंग व्यवस्थेच्या अधीन आहे. हा सामना कोलंबोमधील आर. प्रेमदासा स्टेडियम किंवा कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होईल. तर उपांत्य फेरी २ मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार असल्याचे निश्चित झाले आहे. स्पर्धेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, जर पाकिस्तान क्रिकेट संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला, तर ते ४ मार्च रोजी कोलंबो येथे उपांत्य फेरीचा पहिला सामना खेळतील. जर पाकिस्तान पात्र ठरू शकला नाही परंतु श्रीलंकेचा संघ सुपर ४ मध्ये पोहोचला आणि भारताविरुद्ध बरोबरी झाली नाही, तर सामना कोलंबो येथे खेळवला जाईल. जर दोन्ही अटी लागू न झाल्यास किंवा भारत श्रीलंकेविरुद्ध बरोबरी झाली तर उपांत्य फेरीचा पहिला सामना त्याच तारखेला ईडन गार्डन्स येथे खेळवला जाईल. ■

# श्रीलंका, न्यूझीलंडला विजयच हवा

◆ **कोलंबो, २४ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुधवारी गट दोनमधील श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान सुपर एट साखळी सामना खेळला जाणार आहे. उपांत्य फेरीच्या शर्यतीत आपले आव्हान कायम राखायचे असेल, तर श्रीलंकेप्रमाणे न्यूझीलंडलाही हा सामना जिंकणे आवश्यक आहे.

न्यूझीलंड सध्या सुपर ८ गट २ च्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे, त्यापैकी एका सामन्याचा निकाल लागला नाही. त्यामुळे त्यांना सुपर एटमध्ये सुरुवात करण्याची संधी मिळालेली नाही. पावसामुळे न्यूझीलंड व पाकिस्तानदरम्यानचा सुपर एट सामना रद्द करण्यात आला, तर श्रीलंका सध्या या गटाच्या गुणतालिकेत सर्वात तळाच्या स्थानावर आहे, त्यांच्या खात्यात १ पराभव आहे.



दासून शनाका



मिचेल सॅण्टनर

या टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडसाठी सर्वाधिक धावा करणारा टिम सेफर्ट असून त्याने १७३ धावा केल्या आहे, तसेच सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज मॅट हेनरी असून त्याने ४ बळी घेतले आहेत. गत सामन्यात न्यूझीलंडने कॅनडाविरुद्ध ८ गड्यांनी आरामात विजय मिळवला. कॅनडाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ बाद १७३ धावा केल्या. न्यूझीलंडच्या गोलंदाजांकडे त्यांच्यासाठी कोणतेही उत्तर नव्हते. लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडला आदर्श सुरुवात करता आली नाही. त्यांनी डावाच्या प्रारंभीच टिम सेफर्टसारखा महत्त्वाचा फलंदाज गमावला. पॉवरप्लेच्या षटकांमध्ये रचिन रवींद्र व फिन अॅलनने काही जलद धावा केल्या. चौथ्या क्रमांकावर असलेल्या ग्लेन फिलिप्सनेही फलंदाजीत खळबळजनक कामगिरी केली. त्यामुळे १६ व्या षटकात ८ गडी शिल्लक असताना न्यूझीलंडला विजय मिळाला.

तिकडे, श्रीलंकेची भिस्त पाथुम निसंका व महेश थिक्षनावर आहे. पाथुम हा श्रीलंकेचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज असून त्याने २०८ धावा केल्या आहेत, तर महेशने श्रीलंकेसाठी सर्वाधिक ८ बळी घेतले आहेत.

श्रीलंकेला पहिल्या सुपर ८ सामन्यात इंग्लंडविरुद्ध ५१ धावांनी पराभव पत्करावा लागला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद १४६ धावा केल्या. फलंदाजीसाठी हा खेळपट्टी खूपच कठीण होती. चेंडू खरोखरच बॅटवर आला नाही. जोस बटलर, जेकब बेथेल आणि हॅरी ब्रूक या सर्वांनाच संघर्ष करावा लागला. पाठलाग करताना श्रीलंकेने सुरुवातीपासूनच आपला मार्ग गमावला. सहाव्या षटकात श्रीलंकेची ५ बाद ३४ धावा अशीअवस्था झाली. जोफ्रा आर्चरने २ बळी घेतले तर जॅक्सने ३ बळी घेत संघाची घसरगुंडी उडवली. त्यामुळे आता श्रीलंकेला न्यूझीलंडविरुद्ध सावधगिरीने खेळावे लागेल. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**श्रीलंका वि. न्यूझीलंड**

**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो

**वेळ** : **सायं.** ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# पहिल्या वन-डेमध्ये ऑस्ट्रेलियाचा विजय

**भारतावर ६ गड्यांनी मात**

◆ **ब्रिस्बेन, २४ फेब्रुवारी**

मंगळवारी येथे झालेल्या पहिल्या महिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने सर्व विभागांमध्ये गतविजेत्या भारताला हरवून ६ गड्यांनी आरामदायी विजय मिळवला. ७९ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ७६ धावांची खेळी करणारी बेथ मुनी सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

स्मृती मंधाना (६८ चेंडूत ५८) व कर्णधार हरमनप्रीत कौर (८४ चेंडूत ५३) यांच्या दमदार अर्धशतकांनंतरही भारताने ४८.३ षटकांत सर्वबाद २१४ धावा काढल्या. कर्णधार एलिसा हिली (७० चेंडूत ५०) व बेथ मुनीच्या (७९ चेंडूत ७६) अर्धशतकांच्या बळावर ऑस्ट्रेलियाने माफक धावसंख्येचे लक्ष्य ३८.२ षटकांत ४ गडी गमावित सहज गाठले.

ऑस्ट्रेलियाची फिरकी गोलंदाज अॅशले गार्डनरने उत्कृष्ट गोलंदाजी केली व ७ षटकांत ३३ धावांत ३ बळी घेतले.

भारताने मागील टी-२० मालिका २-१ अशी जिंकल्याने बहु-स्वरूपातील मालिका आता २-२ अशी बरोबरीत आहे. तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेनंतर, पर्थमध्ये एक कसोटी सामना खेळला जाईल. या कसोटी सामन्यानंतर एलिसा हिली आपल्या कारकिर्दीला विश्रांती देणार आहे. आता वन-डे मालिकेतील दुसरा सामना २७ फेब्रुवारी रोजी होबार्ट येथे खेळविला जाणार आहे.

नोव्हेंबरमध्ये दुष्काळ संपल्यानंतरही हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ अजूनही प्रगतीपथावर आहे व त्यांच्याकडे सर्व विजयी ऑस्ट्रेलियन संघासारखे आभास नाही.



फटकेबाजी करताना सामनावीर बेथ मूनी

भारतासाठी गोलंदाजीत सकारात्मक बाब म्हणजे डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणीची कामगिरी आहे, श्रीचरणीला ११ व्या षटकात सलग चेंडूंवर फोबी लिचफिल्ड व जॉर्जिया वोल यांना बाद करण्यात यश मिळाले.

भारताने नाणेफेक जिंकली व अॅलन बॉर्डर मैदानावर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. किम गार्थ व एलिस पेरी दुखापतींमुळे तीन सामन्यांच्या मालिकेतून बाहेर झाल्यामुळे वेगवान गोलंदाज मेगन शट व लुसी हॅमिल्टन यांना अखेरच्या क्षणी ऑस्ट्रेलियन संघात बोलावण्यात आले.

मेगनने सामन्याच्या पहिल्याच षटकात प्रतिका रावलला धारदार इनस्विंगरने अडकवले. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना शेफाली वर्माला लय मिळाली नाही व शेवटी तिने डार्सी ब्राऊनकडे सरळ झेल सोपविला.

मंधानाने स्लिप कॉर्डन ओलांडून स्ट्रीकी बाउंड्रीज मारून सुरुवात केली आणि नंतर वेगवान गोलंदाजांना अनेक उत्कृष्ट ड्राईव्ह दिले.

तथापि, ऑस्ट्रेलियन फिरकीपटूंनी मधल्या षटकांमध्ये दबाव कायम ठेवला व गार्डनरने जेमिमाह रॉड्रिग्जला झेलबाद केले.

मंधाना व दीप्ती शर्मा स्वीप शॉटवर बाद झाल्यानंतर हरमनप्रीतने डाव स्थिर करण्यासाठी वेळ घेतला. तथापि, ती देखील गार्डनरच्या चेंडूवर स्वीप फटक्यावर बाद झाली. काश्वी गौतमने (४४ चेंडूत ४३) एकूण २०० धावा केल्या. तिने एकूण तीन षट्कार मारले. ◂(वृत्तसंस्था)

# जम्मू-काश्मीरची दमदार सुरुवात

**पुंडिरचे नाबाद शतक समदचे नाबाद अर्धशतक** ● **यावर हसनची ८८ धावांची खेळी** ● **जम्मू-काश्मीर २ बाद २८४**

◆ **हुबळी, २४ फेब्रुवारी**

मंगळवारी हुबळी येथे कर्नाटकविरुद्ध प्रतिष्ठेच्या रणजी करंडक अंतिम सामन्याच्या पहिल्या दिवशी सलामीवीर शुभम पुंडिरच्या शानदार नाबाद शतकामुळे जम्मू-काश्मीरने ८७ षटकांत २ बाद २८४ धावा उभारल्या. शुभम पुंडिरने १२ चौकार व २ षट्कारांसह २२१ चेंडूत नाबाद ११७ धावा केल्या तसेच अब्दुल समदने नाबाद ५२ धावांची अर्धशतकी खेळी करून जम्मू-काश्मीरचा पाया मजबूत केला. पुंडिरचे हे हंगामातील दुसरे शतक ठरले.



| शुभम पुंडिर | नाबाद | चेंडू | चौकार | षट्कार |
|---|---|---|---|---|
| | ११७ | २२१ | १२ | ०२ |

वास्तविक जम्मू-काश्मीरच्या वेगवान गोलंदाज आणि कर्नाटकच्या फॉर्मात असलेल्या फलंदाजांदरम्यानची ही लढत होती, पण हुबळी येथे पहिल्या दिवसाच्या खेळीनंतर परिस्थिती उलटी झाली. जम्मू-काश्मीरच्या फलंदाजांनी उच्च दर्जाचे गोलंदाज प्रसिध कृष्णा, श्रेयस गोपाल व विजयकुमार वैशाख यांच्यावर वर्चस्व गाजविले. कर्णधार पारस डोग्राने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर त्याने यवर हसन (८८) सोबत दुसऱ्या गड्यासाठी १३९ धावांची भागीदारी रचली व संघाचा पाया रचला. नंतर शुभमने अब्दुल समदसोबत चौथ्या गड्यासाठी आणखी एक नाबाद १०५ धावांची भागीदारी केली.

कामरान इक्बाल (६) व यावर हसनने जम्मू-काश्मीरसाठी जेमतेम १८ धावा केल्या असताना कर्नाटकच्या प्रसिध कृष्णाने इक्लाबला केएल राहुलकडे सोपा झेल सोपविण्यास भाग पाडले. मात्र त्यानंतर हसन व शुभम पुंडिरने कर्नाटकच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. कृष्णाने राहुलकडून झेलबाद करण्यापूर्वी यावर हसनने १५० चेंडूंत १३ चौकारांसह ८८ धावांची खेळी केली. पारस डोग्रा ९ धावांवर असताना जखमी निवृत्त झाला. पुंडिर व अब्दुल सामदने दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करत जम्मू-काश्मीरला २८४ धावांचा टप्पा गाठून दिला. कर्नाटककडून प्रसिध कृष्णाने ३६ धावांत २ बळी घेतले. ◂(वृत्तसंस्था)

### एलिस पेरी, किम गार्थ वन-डे मालिकेतून बाहेर

**ब्रिस्बेन** : ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू एलिस पेरी आणि वेगवान गोलंदाज किम गार्थला शनिवारी अॅडलेड येथे झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात झालेल्या दुखापतींमुळे भारताविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर काढण्यात आले आहे. कसोटी सामन्यासाठी त्यांची उपलब्धता त्यांच्या पुनर्वसन प्रगतीवर अवलंबून एकदिवसीय मालिकेनंतर निश्चित केली जाईल. सोमवारी गार्थचे स्कॅन करण्यात आले आणि मंगळवारी त्यांना अधिकृतपणे वगळण्यात आले, कर्णधार एलिसा हिलीने नाणेफेकीदरम्यान दोन्ही खेळाडूंना संघाच्या बाहेर करण्यात आल्याची पुष्टी केली. ■

# महिला टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर

## भारत-पाकिस्तान सामना १४ जून रोजी





◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याच्या तारखेसह महिला टी-२० विश्वचषकाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. आयसीसी महिला टी२० विश्वचषक १२ जून ते ५ जुलै दरम्यान होमार असून इंग्लंड आणि वेल्स संघादरम्यान १२ जून रोजी उद्घाटनीय सामना खेळला जाईल. यावेळी महिला विश्वचषकांत १२ संघ सहभागी होतील.

भारत व पाकिस्तान हे दोन पारंपरिक प्रतिस्पर्धी आयसीसी स्पर्धेत पुन्हा एकदा आमने-सामने उभे ठाकणार आहे. त्यावेळी हा सामना केवळ विजय किंवा पराभवाची नाही, तर प्रतिष्ठेची देखील असेल.

**भारत आणि पाकिस्तान एकाच गटात**

आस्ट्रेलिया, भारत, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश आणि नेदरलॅण्ड हे गट १ मध्ये आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज सामना लीग टप्प्यातच पाहायला मिळेल. भारत आणि पाकिस्तान १४ जून रोजी एजबॅस्टन येथे आमने-सामने येतील. महिला क्रिकेटमध्येही ही स्पर्धा नेहमीच रोमांचक असते. अलिकडच्या स्पर्धांमध्ये भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे, तर ऑस्ट्रेलिया सहा वेळा विजेता आहे. त्यामुळे या गटाला 'ग्रुप ऑफ डेथ' म्हटले जात आहे. पाकिस्तानमध्ये मोठ्या स्पर्धेत उलटफेर करण्याची क्षमता आहे, त्यामुळे भारत-पाकिस्तान सामना आणखी महत्त्वाचा बनतो.

**इंग्लंड-स्कॉटलंड सामन्याकडेही लक्ष**

नेपाळमधील पात्रता फेरीनंतर, बांगलादेश, आयर्लंड, नेदरलॅण्ड व स्कॉटलंडनेही आपले स्थान निश्चित केले आहे. हे संघ आता यजमान इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका आणि वेस्ट इंडीज यांच्यात जेतेपदाच्या शर्यतीत सहभागी होतील. २० जून रोजी हेडिंग्ले येथे इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्यातील गट साखळी सामना सुद्धा खास असेल. इंग्लंडच्या भूमीवर विश्वचषकात हे दोन्ही संघ पहिल्यांदाच आमने-सामने उभे ठाकणार आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना ५ जुलै रोजी ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला जाईल. ◂(वृत्तसंस्था)

**महिला टी-२० विश्वचषक २०२६ गट**

**गट १ : ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेदरलॅण्ड.**

**गट २ : वेस्ट इंडीज, इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका, आयर्लंड, स्कॉटलंड.**

**भारतीय संघाच्या टी-२० सामन्यांचे वेळापत्रक असे**

**१४ जून** : भारत वि. पाकिस्तान, एजबॅस्टन
**१७ जून** : भारत वि. नेदरलॅण्ड, हेडिंग्ली
**२१ जून** : दक्षिण आफ्रिका वि. भारत, ओल्ड ट्रॅफर्ड
**२५ जून** : भारत विरुद्ध बांगलादेश, ओल्ड ट्रॅफर्ड
**२७ जून** : भारत विरुद्ध न्यूझीलंड, द ओव्हल
**२८ जून** : ऑस्ट्रेलिया वि. भारत, लॉर्ड्स मैदान

**बाद फेरीचे सामने**

**३० जून २०२६**: उपांत्यपूर्व १, द ओव्हल
**२ जुलै २०२६**: उपांत्यपूर्व २, द ओव्हल
**५ जुलै २०२६**: अंतिम सामना, लॉर्ड्स क्रिकेट मैदान

# भारतीय संघाचा स्पेनकडून पराभव

## एफआयएच हॉकी प्रो-लीग

◆ **होबार्ट, २४ फेब्रुवारी**

मंगळवारी येथे झालेल्या एफआयएच पुरुष प्रो-लीग हॉकी सामन्यात निर्धारित वेळेत १-१ अशा बरोबरीनंतर स्पेनविरुद्ध पेनॉल्टी शूटआऊटमध्ये भारताचा ३-४ असा पराभव झाला.

मणिंदर सिंग्च्या शानदार गोलमुळे ५९ व्या मिनिटापर्यंत भारताने १-० अशी आघाडी होती, मात्र सामन्याच्या अखेरीस स्पेनच्या ब्रुनो फोंटने गोल करून सामना १-१ ने बरोबरीत राखण्यास मदत केली. मात्र पेनॉल्टी शूटआऊटमध्ये स्पेनने बाजी मारली. शूटआऊटमध्ये भारताचे अभिषेक व हार्दिक सिंग यांचे चुकणे महागात पडले आणि भारताचा सामना ३-४ असा झाला आणि कठीण सामन्यातून त्यांना केवळ एक गुण मिळाला. भारताचा पुढील चौथा प्रो-लीग हॉकी सामना बुधवार, २५ फेब्रुवारी रोजी होबार्ट येथे ऑस्ट्रेलियाशी होईल. ◂(वृत्तसंस्था)



### सुनील जोशी पॅव्हेलियनचे उद्घाटन

**हुबळी** : कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने (केएससीए) मंगळवारी हुबळी येथील केएससीए स्टेडियममध्ये सुनील जोशी पॅव्हेलियनचे उद्घाटन केले. हे माजी डावखुरा फिरकी गोलंदाज सुनील जोशी यांनी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट संघांमध्ये दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल आहे. बीसीसीआय अध्यक्ष मिथुन मनहास आणि केएससीए प्रमुख वेंकटेश प्रसाद यांनी जम्मू आणि काश्मीर आणि आठ वेळा विजेता कर्नाटक यांच्यातील रणजी करंडक अंतिम सामन्यादरम्यान सुनील जोशी यांच्या नावावर असलेल्या पॅव्हेलियनचे अधिकृत उद्घाटन केले. यावेळी जोशी यांच्या पत्नी रवनीत उपस्थित होत्या. ■

### टी-२० गोलंदाजी क्रमवारीत अरुंधती, चरणीची मोठी झेप

**दुबई** : यावर्षीच्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलिया आणि भारतातील अनेक प्रमुख खेळाडू, विशेषतः अरुंधती रेड्डी, श्री चरणी आणि जॉर्जिया वोल यांनी आयसीसी महिला टी-२० खेळाडूंच्या ताज्या क्रमवारीत लक्षणीय स्थान मिळवले आहे. दोन्ही संघांमधील नुकत्याच संपलेल्या टी-२० मालिकेत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भारताने अलिकडेच ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एका चुरशीच्या मालिकेत २-१ असा विजय मिळवला. वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डीने कारकिर्दीतील सर्वोच्च रँकिंग मिळवले आहे, ती टी-२० गोलंदाजांमध्ये पाच स्थानांनी झेप घेत एकूण ११ व्या स्थानावर पोहोचली आहे.

मालिकेत आठ बळी टिपून सर्वोत्तम गोलंदाज राहिलेल्या रेड्डीला तिच्या उत्कृष्ट कामगिरीचे बक्षीस मिळाले आहे. तिच्यासोबत, श्री चरणीनेही प्रभावी प्रगती केली आहे, ११ स्थानांनी झेप घेत टी-२० गोलंदाजांच्या क्रमवारीत २६ वे स्थान मिळवले आहे. ■

# २२ वर्षांनंतर बकनर यांनी मान्य केली तेंडुलकरविरुद्धच्या निर्णयाची चूक

◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

भारतीय क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरविरुद्ध घेतलेल्या 'त्या' निर्णयाबद्दल दोन दशकांहून अधिक काळानंतर महान पंच स्टीव्ह बकनर यांनी अखेर पश्चात्ताप व्यक्त केला आहे व 'ती चूक होती' हे मान्य केले आहे. २००९ मध्ये निवृत्त झालेले बकनर हे दोन दशकांहून अधिक काळ जागतिक क्रिकेटमधील सर्वात आदरणीय पंचांपैकी एक होते.

तथापि, त्यांनी तेंडुलकरशी संबंधित काही वादग्रस्त निर्णय घेतले होते, त्यापैकी सर्वात धक्कादायक म्हणजे २२ वर्षांपूर्वी ब्रिस्बेनच्या गाब्बा येथे भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यादरम्यान पायचीत बाद होणे.

वेस्ट इंडीज क्रिकेट पंच संघटनेला दिलेल्या मुलाखतीत बकनर यांना पंच म्हणून कारकीर्दीत सर्वात कठीण निर्णयांपैकी एकाबद्दल विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, 'सचिन तेंडुलकरला लेग बिफोर विकेट बाद देणे व ही चूक होती. आजपर्यंत दररोज लोक त्याबद्दल बोलतात.





'मी त्याला का बाद दिले?' तो बाहेर होता का वगैरे? पण मग आयुष्यात चुका होतात. मी स्वीकारले आहे की, ती चूक होती आणि आयुष्य पुढेही चालू राहते. २००३-०४ च्या मालिकेतील गाब्बा येथे झालेल्या त्या सामन्यात, ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जेसन गिलेस्पी व त्याच्या सहकाऱ्यांनी केलेल्या जोरदार अपीलनंतर तेंडुलकरला बकनरने एलबीडब्ल्यू दिला. ३ धावांवर फलंदाजी करताना तेंडुलकरने चेंडू सोडण्याचा प्रयत्न केला व तो चेंडू त्याच्या पॅडवर वरच्या दिशेने लागला, परंतु बकनरला ऑस्ट्रेलियन अपीलने खात्री पटली.टेलिव्हिजन रिप्लेनंतर असे दिसून आले की चेंडू स्टम्पवरून जात होता. कमेंट्री बॉक्समध्ये, दिवंगत टोनी ग्रेगने याला 'भयानक' निर्णय म्हणून संबोधले होते व त्यावेळी असा विचार करणारे ते एकटेच नव्हते.

चार सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना व यात भारताचा कर्णधार सौरव गांगुलीने १४४ धावा केल्या होत्य व सामना अनिर्णीत राहिला. बकनरने तेंडुलकरला चुकीच्या पद्धतीने बाद केल्याची ही एकमेव घटना नव्हती. २००५ मध्ये ईडन गार्डन्सवर पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात बकनर यांनी जोरदार अपीलनंतर तेंडुलकरला अब्दुल रझाकच्या गोलंदाजीवर झेलबाद ठरवले. तथापि, रिप्लेमध्ये दाखवण्यात आले की बॅट आणि बॉलमध्ये खूप अंतर आहे. २०२४ मध्ये चाहत्यांसोबतच्या एका संवादात्मक सत्रादरम्यान, सचिनला बकनरशी असलेल्या त्याच्या नात्याबद्दल विचारण्यात आले आणि तो हलक्या शब्दात म्हणाला होता, 'मी फलंदाजी करत असताना त्याला बॉक्सिंग ग्लोव्हज घालायला द्या (जेणेकरून ते बोट वर करू शकणार नाही). ७९ वर्षीय बकनर यांनी १९८९ ते २००९ दरम्यान १२८ कसोटी सामन्यांमध्ये पंच म्हणून काम केले आणि १९९२ ते २००७ पर्यंत सलग पाच विश्वचषक फायनलमध्ये उभे राहण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. ◂(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विठ्ठल मंदिर विकास आराखडा भविष्यवेधी अन् व्यापक करा

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्याचे नियोजन हे येत्या तीस-चाळीस वर्षातील वाढीव लोकसंख्या आणि बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर भविष्यकाळाचा विचार करुन व्यापक स्वरुपात करण्याच्या सूचना ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी येथे दिल्या. मंत्रालयात आयोजित श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा व जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधितांना सूचित केले. बैठकीस आमदार समाधान औताडे,सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच संबंधित यंत्रणाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. खासदार प्रणिती शिंदे दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी होत्या.



विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराचा विकास करताना पुढील तीस चाळीस वर्षात शहराचा होणारा विस्तार, लोकसंख्या वाढ,वाहनांची वाढती संख्या, मंदिरास भेट देणा-या भाविकांची, देशापरदेशातून येणा-या पर्यटकांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन नियोजन करावे. पाण्याची व्यवस्था, रस्त्यांची लांबी रुंदी, वारी काळात होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन, मंदिर परिसर विकासाचे नियोजन , कामाचा दर्जा या सर्व बाबी या येत्या भविष्याचा विचार करुन दर्जदार व व्यापक स्वरुपात कराव्यात. मंदिर विकासाबाबत सविस्तर आढावा घेऊन ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधितांना सूचना दिल्या.

## महत्वाचे...



### श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा वर्धापन दिन सोहळा

**पंढरपूर, दि.२४ फेब्रुवारी-**

येथील श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पंढरपूर या संस्थेचा द्वितीय वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संस्थेच्या कार्यालयात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. संस्थेचे चेअरमन नागेश फाटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या दोन वर्षांत संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेत, सभासदांच्या विश्वासार्हतेमुळेच हे यश साध्य झाल्याचे फाटे यांनी यावेळी नमूद केले. याप्रसंगी व्हा. चेअरमन अण्णा यशवंत नागटिळक, डॉ. रमेश फाटे, हणमंत काळे, उमेश फाटे, अर्जुन सावंत, बाळासाहेब बागल, अभिमन्यू पवार, ओंकार फाटे, औदुंबर कांबळे, औदुंबर माने, संजय पवार, शिवाजी रणदिवे गोरख बागल, श्रीराम तांदळे, शशिकांत बागल, शांतीनाथ बागल, संजय बागल, समाधान सुभाष फाटे, बाळासो फाटे, मॅनेजर संग्राम कापसे, विनय शिंदे, स्वप्नाली घोडके, हर्षा सुतार, सुमित बागल, योगेश फाटे, निवृत्ती भटकर, ज्ञानेश्वर पवार, श्रीधर पिसे आणि शरद थिटे उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे नेटके नियोजन मॅनेजर संग्राम कापसे व कर्मचारी वृंदाने केले होते.



### संत गाडगे महाराजांचा आदर्श घेऊन शहर विकासात योगदान द्यावे : स्वामी

**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

संत गाडगे बाबा महाराजांच्या कार्यातून आदर्श घेऊन नागरिकांनी रस्ते, मंदिरे आणि विहिरी स्वच्छ बाबत स्वच्छतेचा आदर्श घालून दिला आहे. समाजाने त्यांच्या सर्वंकष कार्यापासून आदर्श घेऊन शहर स्वच्छता व विकासामध्ये योगदान द्यावे असे प्रतिपादन अक्कलकोट नगरपालिका शिक्षण मंडळ, प्रशासनाधिकारी सोमशंकर स्वामी यांनी केले. मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक म लकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, समुपदेशक सिद्धू विटकर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ. शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड, सौरभ भस्मे, ऐश्वर्या तारापुरे, भीम सोनकांबळे उपस्थित होते.

### तुला लई मस्ती आली आहे का? असे म्हणत लाथा बुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

तुला लई मस्ती आली आहे का असे म्हणून शिवीगाळ करत एकाला देगाव परिसरात लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली आहे. त्यांनतर अंधारात नेऊन चाकूने मारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या हकीकत अशी की, दि. २१ फेब्रुवारी रोजी नागेश कुंडलिक आयवळे रा. २ हब्बू वस्ती, देगाव नाका हे पायी चालत घरी जात असताना देगाव नाका येथे आले असता आरोपी विशाल मल्लिनाथ कोरे याने आयवळेस तुला लय मस्ती आली आहे का असे म्हणून शिवीगाळ करत असताना आयवळे समजून सांगत असताना, आरोपीने त्याच्या मित्रास आयवळेला धरण्यास सांगून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी त्याचा मोठा भाऊ यातील आरोपी सिद्धार्थ कोरे हा आला व त्याने पडलेला दगड भिरकावून पाठीला मारला पाठीत मारला. त्यांनतर ढकलत अंधारात नेऊन चाकूने फिर्यादीच्या पाठीत व उजव्या हातावर मारून जखमी केले असल्याची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली आहे पुढील तपास घुगे करीत आहेत.

## नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे व्हा

### उद्योगपती गौतम कांकरिया; सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये उद्योजकतेचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

व्यवसाय म्हणजे फक्त नफा नाही; तो धैर्य, सातत्य आणि अपयशाला सामोरे जाण्याची तयारी आहे. 'मोडेन पण वाकणार नाही' ही वृत्ती व्यवसायात चालत नाही; परिस्थितीनुसार लवचिकता ठेवून सातत्याने प्रयत्न केल्यासच यश प्राप्त होते, नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे व्हा, असे आवाहन बार्शीतील नामवंत उद्योगपत गौतम कांकरिया यांनी केले.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयामध्ये एक आठवड्याच्या उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण उद्घाटन संपन्न झाले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. २३ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे बना हा आत्मविश्वास जागवण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न महाविद्यालयामार्फत करण्यात



येत आहे. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे होते. व्यासपीठावर उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. बी. डी. लांडे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. के.बी.चपटे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा एम. ए. ढगे, प्रा. एन. आर. सरफळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी म हाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ. बी. डी. लांडे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये सॉफ्ट स्किल्स, ताण-तणाव व्यवस्थापन, व्यवसाय कायदे, करप्रणाली, उद्योजकतेतील संधी व आव्हाने इ. विविध विषयांवर तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. प्रत्येक सत्र विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वाशी जोडणारे आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारे ठरणार आहे. सूत्रसंचालन विद्यार्थीनी शिवानी पवार हिने केले, प्रमुख पाहुण्यांची ओळख यश रणसुभे याने करुन दिली तर प्रा. एन. आर. सारफळे यांनी आभार मानले.



### वन्यजीवरक्षक अण्णासाहेब सुळ यांचा विशेष गौरव

**पिलीव, दि. २४ फेब्रुवारी-**

किरकसाल (ता. माण, जि. सातारा) येथे किरकसाल संवर्धन प्रकल्प (२०२३-२०२४) अंतर्गत आयोजित अहवाल प्रकाशन व वन्यजीवरक्षक सन्मान सोहळ्यात माळशिरस तालुक्यातील जळभावी येथील कर्तव्यदक्ष वन्यजीवरक्षक अण्णासाहेब सुळ यांचा विशेष सन्म ान करण्यात आला. त्यांच्या निसर्गसंवर्धनातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले. माळशिरस वन विभागात कार्यरत असलेल्या अण्णासाहेब सुळ यांनी वनक्षेत्रातील पशुपक्ष्यांसाठी अनेक वेळा पाणपोई व खाद्यभांडार उभारून वन्यजीवांचे प्राण वाचविण्याचे कार्य केले आहे. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री नाथ मंदिर, आदर्शगाव किरकसाल येथे हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य मा. श्री. सुनील लिमये उपस्थित होते. तसेच उपवनसंरक्षक सातारा अमोल सातपुते, सहाय्यक वनसंरक्षक दिगंबर जाधव, वनक्षेत्रपाल अमित मुजिक व नितीन आटपाडकर यांची उपस्थिती लाभली.

### मोडनिंब बसस्थानकातील सुविधा व बससेवा वाढवण्याची मागणी

**मोडनिंब, दि. २४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कुर्डूवाडी-पंढरपूर बससेवा मोडनिंब मार्गे सुरू करा तसेच बसस्थानकातील मूलभूत सुविधा वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सोलापूर विभागीय नियंत्रण अधिकारी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर यांना मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांनी निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष गिड्डे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कुर्डूवाडी-शेटफळ-म ोडनिंब बसस्थानक-पालखीमार्ग-कल्पतरू हॉटेल मार्गे पंढरपूर तसेच परतीच्या मार्गावर किमान दिवसातून तीन फेऱ्या सुरू करण्यात याव्यात. तसेच मराठवाड्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या काही बस मोडनिंब मार्गे वळवाव्यात.याशिवाय पटवर्धन कुरवली (ता. पंढरपूर) ते सोलापूर दरम्यान पूर्वी सुरू असलेली 'डबागाडी' पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या कान्हापुरी (करोळे) ते सोलापूर बससेवा सुरू असून त्याच धर्तीवर ही सेवा पुन्हा सुरू करावी, असे निवेदनात म्हटले आहे.मोडनिंब बसस्थानकात सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत दोन कंट्रोलर आणि रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत एक वॉचमन कायमस्वरूपी नेमावा. तसेच बोअरवेलचे पाणी उपलब्ध करून देणे, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र नवे शौचालय बांधणे आणि बसस्टँडच्या पाठीमागील भिंत पाडून बस थांबण्यासाठी अतिरिक्त जागेची व्यवस्था करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. सदर मागण्या लवकरात लवकर पूर्ण न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मनसे जिलाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांच्या निवेदनातून देण्यात आला आहे.

### २७ व २८ फेब्रुवारीला मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबीर

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय बालस्वास्थ्य व जिल्हा अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाइट आणि रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर यांच्या सहकार्याने मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर दिनांक २७ व २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५.०० या वेळेत जिल्हा रुग्णालय, गुरुनानक चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. शिबिरासाठी नाव नोंदणी सुरू असून इच्छुक रुग्णांनी ८४२१२ २४२४३ या नंबरवर संपर्क साधावा. या उपक्रमासाठी अजय डोईजोडे, बालमुकुंद राठी, रोशन भुतडा, विक्रम लरपवशुरी व प्रमोद देशपांडे आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ चंद्रकांत क्षीरसागर व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. भगवान पवार व मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे मार्गदर्शन लाभत आहे.




## सह्याद्री मधील रक्तदान शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २४ फेब्रुवारी-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता. सांगोला) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रक्तदान शिबिराचे उदघाटन संस्था अध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजित इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील, रेवणील ब्लड बँक सांगोलाचे अध्यक्ष सोमेश यावलकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी रक्तदान करणाऱ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. हे रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.एस. पी.जोकार, प्रा.ए.व्ही.सपाटे, सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रेवणील ब्लड बँकचे सर्व कर्मचारी यांचे योगदान लाभले.

### घर बांधण्यासाठी पैसे घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

घर बांधण्यासाठी माहेरून पैसे घेऊन ये म्हणून एका विवाहितेस शिवीगाळ, दमदाटी करत हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. तिच्या चरित्रावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक आर्थिक त्रास दिला असल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात झाली आहे.

दि. २ मार्च २०२५ रोजी राहिला वजायफ काझी रा. सध्या विडी घरकुल या सासरी असताना, धाराशिव येथे घर बांधण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून शिवीगाळ, दमदाटी करून हाताने व लाथा भुक्क्याने मारहाण केली. तसेच राहिलाच्या चरित्रावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक आर्थिक त्रास दिला असल्याची नोंद पोलिस ठाण्यात झाली आहे. पुढील तपास नवले करीत आहेत.

### वहिवाट रस्त्याच्या कारणावरुन कारची तोडफोड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

बेगमपेठ पोलिस चौकीच्या बाजूला असलेल्या वहिवाट रस्त्याच्या कारणावरुन एका कारची तोडफोड करण्यात आल्याची घटना घडली. यावेळी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित व्यक्तीविरोधात कारवाईची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

## 'स्वामी हो' भक्तीगीत ध्वनीमुद्रण संचचे लोकार्पण

### सोलापूर जिल्ह्यात प्रथमच स्थानिक गायकाचा मान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२४ फेब्रुवारी-**

श्री स्वामी समर्थांची अनेक भक्तीगीते आजपर्यंत बाहेरील कलाकारांनी गायलेली आहेत. यंदा अक्कलकोटच्या भूमिपुत्राने स्वतः स्वामींचे गायलेले भक्तीगीतांना स्वामी भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे,

ही बाब सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच घडल्याने हा विषय अक्कलकोट करांसाठी व आम्हा देवस्थान विश्वस्त पदाधिकाऱ्यांसाठी विशेष अभिम ानाचा क्षण असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

आज नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले अक्कलकोटचे सुपूत्र रोहित राठोड यांनी गायलेल्या 'स्वामी हो' या भक्तीगीतांचा ध्वनीमुद्रणे संच लोकार्पण सोहळा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरातील कै. कल्याणराव इंगळे सभामंडपात भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे, उपनगराध्यक्ष ऋतुराज बंटी राठोड, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून निशिकांत सदाफुले, नेहरिका सदाफुले, योगेश राठोड, नेताजी खंडागळे, भीमराव राठोड, रमेश राठोड, खेमु राठोड उपस्थित होते.

यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, वि'येस्त महेश गोगी, नगरसेवक नन्नू कोरबू, तम्मा शेळके, शिवू स्वामी, बाळा शिंदे, मनोज इंगुले, अंकूश केत, सुनिल पवार, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गवंडी, व्यंकटेश पुजारी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, शिवाजी गुजर, विपूल जाधव आदींसह राठोड, चव्हाण, पवार परिवार उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शुभांगी घनचेकर



**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

येथील शुभांगी प्रभाकर घनचेकर (वय ५८) यांचे मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती व एक मुलगा असा परिवार आहे.

### पद्मिनी शिंदे



**कुर्डूवाडी, दि. २४ फेब्रुवारी-**

निमगाव टें येथील माजी आमदार बबनराव शिंदे व संजयमामा शिंदे यांच्या चुलती व नितिन दत्तात्रय शिंदे व राजेंद्र दत्तात्रय शिंदे यांच्या मातोश्री पद्मिनी दत्तात्रय शिंदे यांचे सोमवार दि. २२ फेब्रूवारी २०२६ रोजी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना नातवंडे, मुलगी, जावई असा परिवार आहे.

### काशीबाई भरडे



**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

किणीवाडी (ता. अक्कलकोट) येथील रहिवाशी काशीबाई महारुद्रप्पा भरडे (वय १०१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच नातू, परतवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर किणीवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर भरडे यांच्या त्या मातोश्री होत.

## आपत्कालीन परिस्थितीला कणखर मनोधैर्याने सामोरे जावे

### संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांचे प्रतिपादन; आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

सध्या मानव निर्मित आपत्तीचे प्रमाण वाढले असून आपत्ती काळात आपण कणखर मनोधैर्याने आपत्ती व्यवस्थापनाचे कार्ये केले पाहिजे. त्याच बरोबर आपत्तीला सामोरे जाताना सजगतेने आपली सकारात्म क भूमिका घेतली पाहिजे, असे प्रतिपादन पुअहो सोलापूर विद्यापीठातील रासेयो संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात संचालक डॉ. राजेंद्र वडजे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रकाश पाटील होते.



यावेळी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे, डॉ. गुणवंत सरवदे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज चिकराम, कार्यक्रम अधिकारी प्रा. समाधान लोंढे उपस्थित होते.

प्रथम सत्रात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय करंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकासाची संकल्पना याविषयावर उदाहरणासह मार्गदर्शन केले. तर व्दितीय सत्रात प्रसिध्द डॉ. धीरज जाधव यांनी प्रथमोपचार सीपीआर याविषयावर प्रात्यक्षिकांच्या सहाय्याने अनमोल असे विचार व्यक्त केले. प्रस्तावना प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आसावरी फरताडे यांनी तर आभार प्रा. समाधान लोंढे यांनी मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### आमदार समाधान आवताडे, राजू खरे विधानसभा तालिका अध्यक्ष

**मोहोळ, दि. २४ फेब्रुवारी-**



मोहोळचे आमदार राजू खरे व मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांची विधानसभा तालिका अध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली आहे. मुंबई येथे सुरू असलेल्या या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मंगळवारी केली. याचबरोबर आमदार संजय केळकर, आमदार अमित झनक, आमदार दिलीप लांडे, आमदार योगेश सागर, आमदार सुनील प्रभू, आमदार चंद्रकांत नवघरे यांचीही निवड करण्यात आली आहे.

### सोलापुरात एस.टी. स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासात डिजिटल क्रांती घडविणाऱ्या 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' आधारित एस.टी. स्मार्ट कार्ड सेवेचा शुभारंभ महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आला. रोख रकमेविना, सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा देणारा हा उपक्रम प्रवाशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. कार्यक्रमास नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक प्रशांत पल्ली, विभागीय यंत्र अभियंता शितल बिराजदार, विभागीय वाहतूक अधिकारी परशुराम नकाते, आगार व्यवस्थापक नागेश जाधव, सांख्यिकी अधिकारी कोलगे, स्थानक प्रमुख मल्लिनाथ अंजोटगी, वाहतूक निरीक्षक अक्षय वाघमारे, विनोद भोसले, एबिक्स कॅश चे सर्वेश घाडगे, महेश कस्तुरकर आदी उपस्थित होते. हे स्मार्ट कार्ड प्लॅटिनम स्वरुपात उपलब्ध असून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग प्रवासी व पत्रकार यांना या सुविधेचा लाभ होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन अभिश्री एंटरप्रायझेस अँड ट्रेडर्सचे श्रीकांत सड्डू, संतोष चव्हाण, आदम बागवान यांच्या वतीने करण्यात आले.

### रस्त्यावर तेल सांडल्याने ५ दुचाकी घसरल्या, ७ जण जखमी झाले

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

रस्त्यावर तेल सांडल्याने दुचाकी घसरुन झालेल्या अपघातात ७ जण जखमी झाल्याची घटना सात रस्ता परिसरातील नियोजन भवनसमोर सोमवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. ही घटना कळताच सदर बझार पोलिस ठाण्याचे पथक आणि सोलापूर महापालिकेच्या अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाच्या जवानांनी पाण्याने रस्ता धुवुन घेत रस्ता स्वच्छ करुन घेतले. अपघातातील जखमींना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये नेले. तोपर्यंत याठिकाणी एकेरी वाहतुक सुरु करण्यात आली होती. दरम्यान ऑईल नेमके कोणत्या गाडीतून सांडले किंवा कुणी मुद्दामून ते रस्त्यावर टाकून दिले का? याचा पोलिस शोध घेत आहेत.

# कांदा निर्यात सवलतीत कपात;
## बाजारपेठेत खळबळ, शेतकऱ्यांमध्ये चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

केंद्र शासनाने निर्यातदारांना दिल्या जाणाऱ्या 'निर्यातीत वस्तूंवरील कर व शुल्क परतावा' योजनेत तात्काळ प्रभावाने ५० टक्क्यांची कपात केली आहे. (परकी व्यापार महासंचालनालय) यांनी जारी केलेल्या नव्या अधिसूचनेनुसार हा निर्णय लागू करण्यात आला. या निर्णयामुळे निर्यात क्षेत्रात, विशेषतः कृषी व प्रक्रिया उद्योगाशी संबंधित घटकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

निर्यात घटल्यास देशांतर्गत बाजारात कांद्याची आवक वाढण्याची शक्यता आहे. राज्यातील प्रमुख कांदा बाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दर घसरण्याचा धोका वाढू शकतो. हंगामाच्या पार्श्वभूमीवर आधीच मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध असल्याने दरांवर अतिरिक्त दबाव येण्याची भीती व्यक्त होत आहे. परिणामी शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.



**नफा कमी झाल्यास निर्यात कमी करण्याचा निर्णय**
नफा कमी झाल्यास काही व्यापारी निर्यात कमी करण्याचा निर्णय घेऊ शकतात. निर्यात सवलतीत कपात झाल्याने खर्च वाढणार असून शासनाने फेरविचार करावा अन्यथा शेतकरी, निर्यातदार यांना फटका बसेल, अशी प्रतिक्रिया कांदा निर्यातदार व्यक्त करत आहेत. पुढील काही आठवड्यांत बाजारातील स्थितीवर यानिर्णयाचे परिणाम स्पष्टपणे दिसू लागतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या योजनेअंतर्गत निर्यातदारांना विविध कर व शुल्कांवर परतावा मिळत होता. सवलतीचा दर अर्ध्यावर आल्याने निर्यात खर्च वाढणार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय कांदा तुलनेने महाग होऊ शकतो. स्पर्धात्मकतेवर परिणामभारतीय कांदा आधीच पाकिस्तान, तुर्की आणि इजिप्त यांसारख्या देशांशी तीव्र स्पर्धा करत आहे. सवलतीत कपात झाल्यास परदेशी खरेदीदार पर्यायी देशांकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पोलिसांच्या संरक्षणाखाली चालतो अवैध डान्सबार
### आ. सुभाष देशमुख यांचा खळबळजनक आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरात काही ठिकाणी स्थानिक पोलिसांच्या संरक्षणाखाली अवैधरित्या डान्सबार चालत असल्याचा खळबळजनक आरोप आमदार सुभाष देशमुख यांनी विधानसभेत केला. या डान्सबारमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत असून सामाजिक वातावरण बिघडण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले.



दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही भाग आणि सोलापूर शहरात अवैधरित्या सुरु असलेल्या डान्सबार संदर्भातील व्हिडीओ क्लिप्स पोलिस आयुक्त कार्यालयाकडे दिले. काही पोलिस अधिकाऱ्यांनी डान्सबारमध्ये जाऊन पाहणी केली. अधिकारी बाहेर येताना दिसत असले तरी ठोस कारवाई झालेली नाही, असेही ते म्हणाले.

आमदार सुभाष देशमुख यांनी वेधलेल्या या प्रश्नांविषयी सखोल चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सभागृहाला आश्वस्त केले.

दरम्यान, सोलापुरात डान्सबारचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढले आहे; हे आमदार सुभाष देशमुख यांनी विधानसभेत मांडलेल्या या प्रश्नावरुन अधोरेखित होते.

## बालाजी अमाईन्सच्यावतीने मोफत नेत्र तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सोलापूर - बालाजी अमाईन्स लि कंपनीच्या आर्थिक सहाय्याने, एच व्ही देसाई आय हॉस्पीटल (संचलित शंकरशेठ साबळे आय हॉस्पीटल) व रोटरी क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने गरजू नागरिकांकरीता मोफत नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंन्दू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन बुधवारी ११ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या शिबीराचे आयोजन सकाळी ९.३० ते २ वाजेपर्यंत सोलापूर इंडस्ट्रियल असोसिएशन जयकुमार पाटील उदयोग भवन पी ७ एम आय डी सी चिंचोली सोलापूर येथे करण्यात झाले आहे. शिबीरामध्ये ४० वर्षापुढिल वयोगटातील व्यक्तीची मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार असून जवळच्या नंबरचा चष्मा मोफत देण्यात येईल व मोतीबिन्दू असलेल्या व्यक्तींची मोफत शस्त्रकिया करण्यात येईल. शस्त्रकिया करण्यात येणा-या रुग्णांची जेवणाची व राहण्याची म ोफत सोय करण्यात येईल शस्त्रकिये करिता रुग्णांना मोफत ने-आण करण्याची सुविधाही देण्यात येईल. रुग्णांनी शिबीरास येताना व शस्त्रक्रियेस येताना आधारकार्ड झेरॉक्स व फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. असे संयोजकांतर्फे काळविण्यात आले आहे. या शिबीरास चिंचोली एम आय डी सी परिसरातील कोंडी, चिंचोली काटी, बीबीदारफळ, सावळेश्वर, पाकणी या गावातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी राम रेडडी यांनी केले आहे.

# पासपोर्ट धारकांना जलद सेवा द्या : गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

भारतीय परराष्ट्र सेवेचे, पुण्याचे प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी दि. २३ व २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर आणि पंढरपूर येथील पासपोर्ट सेवा केंद्रांना भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या दौऱ्यात नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता यांचे मूल्यांकन केले.

सोलापूर येथील पासपोर्ट सेवा केंद्र तसेच पंढरपूर येथील पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र येथे भेट देताना डॉ. गायकवाड यांनी नियुक्ती व्यवस्थापन, कागदपत्र पडताळणी प्रक्रिया, अर्जदारांसाठी उपलब्ध सुविधा आणि पायाभूत सोयी यांची तपासणी केली. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी सोलापूर व आसपासच्या जिल्ह्यांतील नागरिकांना वेळेवर आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

दौऱ्यादरम्यान डॉ. गायकवाड यांनी अनेक अर्जदारांशी प्रत्यक्ष संवाद साधून अर्ज प्रक्रियेबाबत त्यांचे अनुभव जाणून घेतले. सेवा अधिक नागरिकाभिमुख आणि अडथळा मुक्त ठेवण्यासाठी कार्यसंघाने उच्च दर्जाची व्यावसायिकता जपावी, असे त्यांनी सुचवले.




**पोलिस प्रशासनाशी समन्वय :** पासपोर्ट प्रक्रिया जलद करण्यासाठी पोलिस पडताळणी अहवाल प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर देण्यात आला.तसेच, पासपोर्ट सेवा केंद्र परिसरातील सुरक्षा व्यवस्था बळकट करणे आणि अनधिकृत दलालांविरुद्ध समन्वित कारवाई करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम पडताळणी प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी दोन्ही यंत्रणांनी वचनबद्धता व्यक्त केली. पुणे प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाच्या वतीने संपूर्ण विभागात जलद पासपोर्ट सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

सोलापूर आणि माढा येथील पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्रांमुळे ग्रामीण व लहान शहरांतील नागरिकांना पासपोर्टसाठी पुण्याला जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होत असून सेवा अधिक सुलभ झाल्या आहेत. प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करून वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी सुविधा अधिक सक्षम केल्या जात असल्याची माहिती देण्यात आली.

# कोनापुरे चाळ येथील आरोग्यवर्धिनी केंद्राची तोडफोड

**आरोग्याधिकारी डॉ.माने, नगरसेविका फुलारे यांनी केली केंद्राची पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

प्रभाग क्रमांक १५ मधील कोनापुरे चाळ येथील महापालिकेच्या आरोग्यवर्धिनी केंद्रात तोडफोड केल्याची घटना घडली. आरोग्याधिकारी डॉ.राखी माने, नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी या केंद्राची पाहणी केली. याप्रकरणी अज्ञाताविरुध्द सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

याठिकाणी यापूर्वी येथे एका समाजासाठी समाज मंदिर होते. हे समाज मंदिर पूर्ववत उपलब्ध करण्याची मागणी एका गटाकडून होत होती. दरम्यान, या आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये काही अज्ञात व्यक्तींनी शटर उचकटून या आरोग्यवर्धिनी केंद्रातील काचा व इतर वस्तूंची



तोडफोड केली. यामध्ये सुमारे ५० हजार रुपयाचे नुकसान झाले. सोलापूर महापालिका सभेत रितसर ठराव करुन हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. यामुळे पूर्ववत याठिकाणी हे केंद्र सुरूच राहावे अशी मागणी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी केली. यावेळी नियंत्रण अधिकारी तथा उपायुक्त आशिष लोकरे उपस्थित होते. या प्रकरणी यापूर्वीच अज्ञात व्यक्तींविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा अशी घटना काल रात्री घडली. पदाधिकाऱ्यांनी याबाबत सूचना दिल्या. त्यानंतर संबंधितांना समज देण्यात आली.

अज्ञात व्यक्तींकडून महापालिकेच्या आरोग्यवर्धिनी केंद्राची तोडफोड झाली आहे. यामध्ये सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. काचा तसेच शटर याचे नुकसान करण्यात आले आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत येथील डॉ. पल्लोलू यांनी फिर्याद दिली. हे आरोग्यवर्धिनी केंद्र पूर्ववत सुरू राहणार आहे, अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी दिली.




## मराठा क्रांती मोर्चाच्या युवकांचे मुंडन आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मराठा क्रांती मोर्चाचे सम न्वयक राम जाधव यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर निवडीवर तीव्र नाराजी व्यक्त करत छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मुंडन आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध घोषणा देत सरकारच्या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यात आला.

मराठा समाजाला न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. गेल्या तीस वर्षांत मराठा समाजातील प्रतिनिधीला महापौरपदाची संधी मिळालेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

सत्ताधारी भारतीय जनता पार्टी सरकारने सर्वसाधारण प्रवर्गातील जागेवरही ओबीसी समाजातील उमेदवाराला महापौरपदी संधी दिली. त्यामुळे मराठा समाजावर अन्याय होत असल्याची भावना समाजामध्ये तीव्र झाली आहे. 'महापौरपदावर मराठा समाजाचा प्रतिनिधी बसवला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.




### 'चलबट' या आत्मचरित्रास दया पवार पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. अर्जुन व्हटकर यांच्या "चलबट" या आत्मकथनास आंबेडकर राईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचर, नागपूर या संस्थेतर्फे दिला जाणारा दया पवार आत्मकथन राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नागपूर येथे माजी चेअरमन सुखदेव थोरात यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. डॉ. व्हटकर यांच्या तुंबण कथासंग्रहास यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा कै. ग.ल.ठोकळ हा पुरस्कार, "मुक्या जंगलाची गर्जना" या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा कै. पंजाबराव देशमुख पर्यावरण पुरस्कार, तसेच म ध्यप्रदेश शासनाचा भोपाळ साहित्य अकादमीचा कवी कै. भा.रा. तांबे हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.




# विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांचे जीवन समृध्द : डॉ.सुहासिनी शहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

शिक्षकांच्या सुसंस्कारित, वैज्ञानिक आणि संवेदनशील दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांचा जीवनाचा अनुभव अधिक समृध्द होईल, असे प्रतिपादन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले.

प्रिसिजन फाउंडेशन, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेडक्रॉस सोसायटी सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांकरिता आयोजित केलेल्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. डॉ.नभा काकडे ह्या अध्यक्षस्थानी होत्या. सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समाजासाठी गरजेचे शिक्षण आहे. यामध्ये शिक्षकांची भूमिका केवळ शालेय पाठ्यक्रमापुरतीच नाही, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात आणि त्यांच्या सुरक्षित भविष्यात महत्त्वाची आहे. यंदा युथ पार्लिमेंट या संकल्पनेनुसार युवकांना संघटित करुन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रेरित केले जाईल. पूरग्रस्त ग्रामीण भागातील युवक व युवतींना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन आपदा मित्र व अपदा सखींची टीम तयार करणार आहोत, असेही त्या म्हणाल्या. डॉ. नभा काकडे यांनी सर्वंकष लैंगिक शिक्षण व शिक्षकांची भूमिका, शक्तिसागर ढोले यांनी आपत्ती व्यवस्थापन व युवक, रामचंद्र वाघमारे यांनी युवा वर्गातील वाढते कॅन्सरचे प्रमाण व उपाय, वीरेंद्र परदेशी यांनी युथ पार्लमेंट या विषयावर मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर वैशाली बनसोडे, प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, सुगतरत्न गायकवाड, प्रांजली काळे, अच्युत दुधाळ, रामचंद्र वाघमारे हे होते. वीरेंद्र परदेशी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेत एकूण ६० शिक्षक व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी सामील झाले होते.

# अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने घेतला अल्पवयीन बालिकेचा शोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने विजापूर नाका पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यातील अल्पवयीन बालिका व आरोपी यांना आंबेठाण रोड, बिरवडी, चाकण, पूणे येथून ताब्यात घेतले. पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत विजापूर नाका पोलीस ठाणे येथे दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी नामे सच्चुकुमार कृष्णा चंद्रबन्सी याने कशाचे तरी अमिष दाखवून पळवून नेले असल्याचा गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिका व आरोपी यांचा ६ महिन्यापासून तत्कालीन तपासीक अंमलदार यांनी प्रयत्न करुन देखील आरोपी व पिडीत बालिका यांचा शोध घेवूनही ते मिळून न आल्याने सदरचा गुन्हा दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, सोलापूर शहर येथे वर्ग करण्यात आला होता. हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे गुन्हा वर्ग होताच अवघ्या १८ दिवसात तपासीक अधिकारी व त्याचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी कौशल्यपुर्वक तपास करून व तांत्रिक माहिती प्राप्त करुन घेवून आरोपी



सच्चुकुमार कृष्णा चंद्रबन्सी व अपह्रत मुलगी यांना दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी आंबेठाण रोड, बिरवडी, चाकण, पूणे येथून ताब्यात घेवून पुढील कार्यवाही करीता दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे हजर केले आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरिक्षक धनाजी शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील म पोसई/अश्विनी काळे, मसफौ. अलका शहापुरे, पोह महादेव बंडगर, पोना अ. सत्तार पटेल, चालक पोशि दादा गोरे तसेच सायबर पोलीस ठाणे कडील पोह गायकवाड, मच्छिद्र राठोड यांनी उत्कृष्ट व शिताफिने कामगीरी करून सदरची कार्यवाही केली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## अधिकारी म्हणतात, उन्हाळा तोंडावर असल्याने थोडा वेळ द्या!



- पाण्याचे दिवस कमी करण्याच्या नियोजनाचे महापौरांचे आदेश
- प्रत्यक्ष जागेवर पाहणी केल्यानंतर पुढील बैठकीत निर्णय घेणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

पाणीपुरवठ्यासाठी अधिकाऱ्यांनी जे मागितले त्या सर्व सुविधा आणि भरघोस निधी यापूर्वीच देण्यात आला आहे. सोलापूर शहराला सुरळीत, वेळेत पाणीपुरवठा करावा. त्याचबरोबर आठवड्यातून एकदा ऐवजी शहरासाठी पाणीपुरवठ्याचे दिवस कमी करावेत यासाठी आवश्यक ते नियोजन करा, असे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

दरम्यान, प्रत्यक्ष जाऊन पाहणी केल्यानंतर पुढील बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी पत्रकारांना दिली. तर वर्षेनुवर्षे आठवड्याला पाणीपुरवठा होत असतानाही त्यात सुधारणा करण्याचे शून्य नियोजन करणारे पालिका प्रशासन आता पुन्हा उन्हाळ्याचे कारण सांगून पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी वेळ मागत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

महापालिकेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात मंगळवारी सकाळी शहर पाणीपुरवठा संदर्भात महापौर कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक बैठक पार पडली. या बैठकीला उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर, महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, उपअभियंता सतीश एकबोटे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर महापौर कोंड्याल म्हणाले, प्राथमिक स्तरावरील ही बैठक झाली आहे शहराला सुरळीत वेळेत पाणीपुरवठा कसा करता येईल? याबाबत चर्चा झाली. पाणीपुरवठ्याचे दिवस कमी करणे आवश्यक आहे या संदर्भात सूचना केली आहे. अधिकाऱ्यांनी वेळ मागितली आहे. उन्हाळा तोंडावर आहे. आम्ही निश्चितच पाणीपुरवठा सुधारून दाखवू वेळ द्या. शहरातील वितरण व्यवस्था वाढविण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर दिवस कमी केले तर गोंधळ होऊन पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो, स्काडा सिस्टीमचा फायदा झालेला आहे. मेन लाईन वरील वॉलसाठी याची मोठी मदत झाली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. पाणीपुरवठा संदर्भात स्काडा सिस्टीम तसेच इतर संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. त्यानंतर आवश्यक अडचणी आणि उपाययोजना सुचविण्यात येतील. शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होणे गरजेचे आहे. या सिस्टीमचेही प्रात्यक्षिक थेट पाहण्यात येणार आहे. त्यानंतर काय करायचे आणि काय नाही यावरही चर्चा होईल, असे महापौरांनी स्पष्ट केले. महापौरांनी यापुढे सर्वपक्षीय गटनेत्यांना बैठकांना बोलावले नाही तर अखेर आयुक्तांसोबत आम्हालाही स्वतंत्र बैठका घ्याव्या लागतील असे सांगतानाच इथे श्रेयवाद महत्त्वाचा नाही. चांगले काम झाले अथवा नसेल तर भाजपाची सत्ता असल्याने त्यांना श्रेय अथवा अपयश स्वीकारावे लागणार आहे.

### सात वर्षांत ३० हजार नवे नळ कनेक्शन वाढले

शहरात गेल्या सात वर्षात तीस हजार नवे नळ कनेक्शन वाढले आहेत. त्यामुळे पाण्याचा वापर वाढला आहे. परिणामी शहरासाठी पाणीपुरवठ्याचे दिवस वाढले. उन्हाळा तोंडावर असल्याने पाण्याचे दिवस कमी करण्यात अडचणी येणार आहेत. पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, असेही महापौर विनायक कोंडाल यांनी यावेळी सांगितले. यापूर्वी पाणीपुरवठा सुधारण्यासाठी अधिकाऱ्यांनी जे - जे मागितले ते - ते देण्यात आले आहे. दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. त्यानंतर आता १४०० कोटीची योजनाही मार्गी लागत आहे, असेही महापौर कोंड्याल यांनी सांगितले.

### एकवट मानधनावर निवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत घेणार

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत, वेळेवर आणि पाण्याचे दिवस कमी करण्यासाठी पाणीपुरवठा विभागासंदर्भातील निवृत्त अधिकाऱ्यांनाही एकवट मानधनावर सेवत घेण्याचे आदेश आयुक्तांना दिले आहेत. त्या अनुषंगाने काही निवृत्त अधिकाऱ्यांशीही चर्चा केली आहे, असेही महापौर कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

### सर्वपक्षीय गटनेत्यांना बैठकीला बोलवावे

शिवसेना शिंदे गटाचे गटनेते अमोल शिंदे म्हणाले, पाणीपुरवठा संदर्भात झालेल्या बैठकीला महापौर यांनी सर्वपक्षीय गटनेत्यांना निमंत्रित केले नाही. अशा बैठकींना सर्वांना निमंत्रित करणे गरजेचे आहे. केवळ भाजप पदाधिकाऱ्यांना घेऊन ही बैठक झाली.पाणीपुरवठा हा महत्त्वाचा विषय आहे. लोकांमध्ये या संदर्भात तीव्र भावना आहेत. सोलापूरकरांना या नियोजनाचे कळाले पाहिजे. दुहेरी जलवाहिनीचे काम झाले तरीही शहराचा पाणीपुरवठा सुधारला नाही. निवृत्त अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

## 'बी २ सत्ता प्रकार' उठविण्याचा ठराव शासनाकडे पाठविणार

- मालमत्ता व्यवहारांना चालना
- महापालिकेच्या उत्पन्नात वाढ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

शहरातील विविध भागांमध्ये लागू असलेल्या 'बी-२ (सत्ता प्रकार)' या नोंदीमुळे मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहारांवर निर्बंध आणि बांधकाम परवानगी मिळण्यात अडथळे निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर हा प्रकार उठविण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मनपा सभेत २० फेब्रुवारी रोजी झाला असून अंमलबजावणीसाठी तो ठराव शासनाकडे पाठवला जाणार आहे.

बी'-२ सत्ता प्रकार' रद्द झाल्यास मालमत्तांचे व्यवहार सुरळीत सुरू होतील. संबंधित चाळीतील रहिवाशांना मालकी हक्क मिळण्यास मदत होईल आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले व्यवहार मार्गी लागतील. शहरातील जीर्ण व धोकादायक चाळींच्या पुनर्विकास प्रक्रियेलाही यामुळे गती मिळणार असून सुरक्षित व नियोजित विकासाला चालना मिळेल.

या निर्णयामुळे शासनाच्या महसुलात वाढ होण्यासोबतच महापालिकेलाही कर व विविध शुल्कांच्या माध्यमातून उत्पन्नवाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्यामुळे प्रशासन आणि नागरिक या दोघांसाठीही हा निर्णय दिलासादायक ठरणार आहे. या निर्णयासाठी राज्याचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सभेत नमूद करण्यात आले. तसेच शहर मध्यचे आ. देवेन्द्र कोठे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांनी या ठरावास मंजुरी देत सकारात्मक भूमिका बजावली. या ऐतिहासिक निर्णयामुळे शहरातील अनेक कुटुंबांना दिलासा मिळणार असून, मालमत्ता व्यवहार आणि पुनर्विकास प्रक्रियेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास महापौर कोंड्याल यांनी व्यक्त केला आहे.

## केदार दाम्पत्याचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी न्यायालयात याचिका



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा सांगोला तालुक्यातील चोपडी जिल्हा परिषद गटाचे सदस्य चेतनसिंह केदार यांचे जिल्हा परिषद सदस्यत्व तसेच त्यांची पत्नी सुजाता केदार यांचे नगरपालिकेचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, यासाठी पंढरपूर येथील जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रा. आर. वाय. घुटुकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही याचिका दाखल करत निवडणूक प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचा आरोप प्रा. आर. वाय. घुटुकडे यांनी केला आहे. प्रा.घुटुकडे यांनी लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० मधील कलम ३१चा उल्लेख करत, जर एखाद्या व्यक्तीने दोन ठिकाणी नाव नोंदवून मतदान केले किंवा चुकीची माहिती दिली, तर त्यास कारावास व दंडाची तरतूद आहे, असे स्पष्ट केले. २०१६ मध्ये केदार हे सांगोला नगरपरिषद हद्दीतून नगरसेवक म्हणून निवडून आले होते, तर नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुक २०२६ मध्ये चौपडी जिल्हा परिषद गटातून निवडून येताना निवडणूक आयोगाला दिलेल्या माहितीत विसंगती असल्याचा संशय आहे.त्यामुळे ही निवडणूक बेकायदेशीर ठरते, असा दावा करत घुटुकडे यांनी न्यायालयाकडून निष्पक्ष सुनावणीची अपेक्षा व्यक्त केली. याचिकेत नगरपालिकेतील प्रतिज्ञापत्र आणि जिल्हा परिषद निवडणुकीतील प्रतिज्ञापत्र यामध्ये तफावत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. तसेच निवडणूक आयोगाला चुकीची माहिती देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

चेतनसिंह केदार हे सांगोला तालुक्यातील चोपडी जिल्हा परिषद गटातून निवडून आले आहेत. त्यांच्या पत्नी सुजाता केदार या शहरातील नगरपालिकेत बिनविरोध नगरसेविका आहेत. मात्र, दोघांचीही नावे शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही मतदार याद्यांमध्ये नोंद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. लोकप्रतिनिधी अधिनियमाच्या कलम ३१ नुसार एका व्यक्तीचे नाव दोन वेगवेगळ्या मतदार याद्यांमध्ये असू शकत नाही. या तरतुदीचे उल्लंघन झाल्याने चेतनसिंह केदार यांचे जिल्हा परिषद सदस्यत्व तसेच सुजाता केदार यांचे नगरसेवक पद रद्द करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस रामचंद्र घुटुकडे, मालोजी पाटील आदी उपस्थित होते.

### इदारे-ए-बेगम बाजारच्या अध्यक्षपदी नगरसेवक हत्तुरे

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

किडवाई चौक बेगम पेठ परिसरातील इदारे-ए-बेगम बाजार मर्कज वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्षपदी नगरसेवक हाजी तौफीक हत्तुरे यांची निवड केल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मोहम्मद हुसेन डोका यांनी पत्रकार परिषदेत दिली. असोसिएशनची बैठक संस्थाध्यक्ष मोहम्मद हुसेन डोका यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यात सन २०२६-२०२७ करीता पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक हत्तुरे, जाकीर पठाण आदी उपस्थित होते.



तौफीक हत्तुरे

**अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष- अ. रऊफ अ. करीम कल्याणी, जुबेर महिबुसाब कुरेशी, सचिव-हनिफ महमद सातखेड, सहसचिव - माजीद अ. वाहिद माही, खजिनदार- जाकीर अ. गनी पठाण, सदस्य- म. युसूफ म. हनिफ शेख, जाकीर हुसेन म. हुसेन पार्ट, इस्माईल ए. मजीद दलाल, सल्लागार-महिबुब दस्तगीर बेरीया, अहमदअली मोहोळकर.

## पोटहिश्शाची २०० रुपयांत मोजणी; ९० दिवसांत होणार हद्द निश्चिती

### ऑनलाइन अर्ज करावा लागणार; क्षेत्राची हद्द निश्चित करून मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या एकाच कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्या पोटहिश्शाची मोजणी अवघ्या २०० रुपयांत करून मिळणार आहे. नियमित मोजणीच्या निकषांनुसार अर्जदाराच्या क्षेत्राची मोजणी ९० दिवसांत पूर्ण करून संबंधित हद्द निश्चित करून दिली जाणार आहे. जमीन- जागांचे दर गगनाला भिडले असताना कुटुंबातील सदस्यांमध्ये सातबारा उताऱ्यावरून वाद वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती अधीक्षक दादासाहेब घोडके यांनी दिली.

दरम्यान, सध्या जमीन-जागांचे व्यवहार लाखो रुपयांत होत असल्याने रक्तनात्यातदेखील तणाव निर्माण होत आहेत. बांध पोखरणे, अतिक्रमण, सीमारेषांबाबत गैरसमज कारणांमुळे वाद विकोपाला जात आहेत. परिणामी, भूमिअभिलेख कार्यालय, सोलापूर येथे दररोज सरासरी २०० हून अधिक अर्ज मोजणीसाठी दाखल होत आहेत. काही प्रकरणांत मोजणीदरम्यान कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिस बंदोबस्ताचीही मदत घ्यावी लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय जाहीर केला आहे. निर्णयानुसार, सातबारा उताऱ्यावर एकत्र नोंद असलेल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला त्याच्या नावावर असलेल्या पोटहिश्शाची स्वतंत्र मोजणी केवळ २०० रुपयांत करून दिली जाणार आहे. मात्र, अर्ज ऑनलाइन पद्धतीने करणे बंधनकारक असेल. अर्जदाराने 'भूमिअभिलेख'च्या अधिकृत संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करायचा आहे. अर्जाची नोंद झाल्यानंतर नियमित प्रक्रियेनुसार तीन महिन्यांच्या आत संबंधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून सीमारेषा निश्चित केल्या जातील. मनुष्यबळाच्या मर्यादांमुळे काही ठिकाणी किरकोळ विलंब होऊ शकतो, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### पोटहिस्सा म्हणजे नेमकं काय?

सातबारा उताऱ्यावर एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांची नावे असतात. एकूण क्षेत्राची वाटणी कागदोपत्री नमूद असली, तरी कोणत्या सदस्याचे क्षेत्र नेमके कोणत्या दिशेला आहे, त्याची हद्द कुठून सुरू होऊन कुठपर्यंत जाते, याची स्पष्ट नोंद उताऱ्यावर नसते. त्यामुळे भविष्यात सीमावाद निर्माण होतात. पोटहिश्शाची अधिकृत मोजणी झाल्यास प्रत्येक सदस्याच्या क्षेत्राची भौगोलिक हद्द स्पष्ट होते आणि संभाव्य वाद टाळता येतात.या निर्णयामुळे शेतकऱ्यांना पारदर्शक आणि कमी खर्चात न्याय मिळणार असून, जमीनविषयक वाद कमी होण्यास मदत होणार आहे.

## सोलापूर विद्यापीठातील पायाभूत सुविधा दर्जेदार शिक्षणासाठी अनुकूल

- पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे प्रतिपादन
- करिअर मार्गदर्शन केंद्र, वाणिज्य-व्यवस्थापन संकुल इमारतींचे भूमिपूजन
- उद्योगपती यतीन शहा व पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

उच्च शिक्षण, संशोधन आणि कौशल्यविकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे अत्याधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. करिअर मार्गदर्शन केंद्र, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाची नवी इमारत, खेळाडूंसाठी सुसज्ज मल्टीपर्पज क्रीडा हॉल, तसेच व्यापक वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अनुकूल, हरित आणि प्रेरणादायी वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

मंगळवारी, विद्यापीठ परिसरात पीएम-उषा योजनेअंतर्गत मंजूर निधीतून उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक करिअर मार्गदर्शन केंद्राचे भूमिपूजन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते, तर वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन उद्योगपती यतीन शहा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा. देवानंद चिलवंत, अधिसभा सदस्य ॲड. मल्लिनाथ शहाबादे, डॉ. वीरभद्र दंडे, माधव देशपांडे, अजित संगवे, डॉ. जैनुद्दीन मुल्ला, वित्त व लेखा अधिकारी डॉ. महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, अभियंता गिरीश कुलकर्णी, प्रल्हाद कांबळे, डॉ. हनुमंत अवताडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पीएम-उषा विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी आभार मानले.

### गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार कामे करा : दत्तात्रय लोंढे

पीएम-उषा विभागाचे उपसंचालक दत्तात्रय लोंढे म्हणाले. या योजनेअंतर्गत राज्यातील केवळ चार विद्यापीठांना प्रत्येकी शंभर कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्यामध्ये सोलापूर विद्यापीठाचा समावेश आहे. या निधीतून शैक्षणिक, संशोधनात्मक आणि प्रशासकीय पायाभूत सुविधांचा व्यापक विकास करण्यात येत आहे. एवढा निधी कमी नाही आणि तो नेहमी मिळत नाही. त्यामुळे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार आणि वेळेत कामे पूर्ण करावीत. त्यासाठी विद्यापीठाच्या तांत्रिक विभागाने याकडे लक्ष दिले पाहिजे

### नव्या सुविधा उपयुक्त

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले, विद्यापीठाच्या प्रगतीसाठी शासन, उद्योगक्षेत्र, प्रशासन आणि समाजातील सर्व घटकांचे सहकार्य लाभत आहे. नव्याने उभारण्यात येणाऱ्या सुविधा विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत सक्षम बनविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. करिअर मार्गदर्शन केंद्रामुळे स्पर्धा परीक्षा व विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळेल, तर वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाची नवी इमारत आधुनिक अध्यापन पद्धतींसाठी सक्षम व्यासपीठ ठरेल.



## 'तरुण भारत'मध्ये जागतिक मुद्रण दिन उत्साहात

### दै.'तरुण भारत' व प्रिसिजन प्रिंटस्‌मधील कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मुद्रण कलेचे संशोधक जोहान्स गुटेनबर्ग यांचा २४ फेब्रुवारी हा जन्मदिवस जागतिक मुद्रण दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. दैनिक तरुण भारतमध्ये मंगळवारी जागतिक मुद्रण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी दैनिक तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे यांच्या हस्ते तरुण भारत व प्रिसिजन प्रिंट्समध्ये कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र असे सन्मानाचे स्वरूप होते. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना दिलीप पेठे यांनी मुद्रण दिनाचा इतिहास कथन केला. मुद्रणाच्या माध्यमातून दैनिकांसह संपूर्ण प्रिंटिंग क्षेत्रात झालेली प्रगती आणि समाजातील दैनिकांचे महत्त्व त्यांनी विशद केले. मुद्रण दिनानिमित्त सर्व उपस्थित त्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने मुद्रण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि या व्यवसायातील योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. काळानुसार मुद्रण क्षेत्रात झालेले बदल आणि 'तरुण भारत'ने स्वीकारलेले अद्ययावत तंत्रज्ञान याबद्दल चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाला 'तरुण भारत' परिवारातील वरिष्ठ पदाधिकारी, मुद्रण विभागाचे तंत्रज्ञ आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### या कर्मचाऱ्यांचा झाला सन्मान

विनायक पुला (तरूण भारतचे व्यवस्थापक), मनोहर बायनी (जाहिरात व्यवस्थापक), सिध्दाराम चिट्टे (प्रिसिजनचे विभाग प्रमुख), राजेंद्र महाले (वसुली प्रमुख), रविकांत गायकवाड (फोर कलर मशीन ऑपरेटर), सचिन कांबळे (सीटीपी मशीन ऑपरेट), जयभिम इंगळे (बायडींग प्रमुख), गोरख वाघमारे (सिंगल कलर मशीन ऑपरेटर), जाफर मनियार (कटिंग मशीन ऑपरेटर), मनिषा विभूते (डी.टी.पी. ऑपरेटर) कर्मचारी : शिवशरण नागसेन, महेश पाटील, राज बंडगर, मोहित माने, वामन बावडेकर, विक्रांत माळवदकर, सरिता सालीमठ, मल्लिकार्जुन हत्ती, रंजना घोडके.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १३६६

धर्माचे थोतांड करुनी भरी पोट ।
भार्यामुले मठ मजा करी ।।

महाभारतात युध्दभूमीवर राधेसुता, तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म? किंवा यदा यदा हि धर्मस्य... असे म्हणणाऱ्या श्रीकृष्णांनी धर्म म्हणजे निती नियमाचे पालन, अशी धर्माची परिभाषा केल्याचे अर्जुनास केलेल्या उपदेशातून दिसून येते. अगा स्वधर्मु हा आपुला । जरी का कठिणु जाहला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ।। असे श्री ज्ञानदेवांनी धर्माबद्दल म्हटले आहे. संत सेनाजींनी धर्माकडे नीती नियम आणि कर्माच्या दृष्टीकोणातून पाहिले आणि आयुष्यभर धर्माचा प्रसार केला. प्रत्येकजण धर्मानुसार वागू लागला तर समाजात मानवनिर्मित प्रश्न उद्धवणार नाहीत, इतरांना धर्म सांगणे सोपे असते. पण धर्म शिकवणाऱ्यांना धर्म समजावून सांगणे अवघड आणि विरोध पत्करण्याचे काम होय. धर्म सांगणाऱ्यांनाच धर्म माहिती नसेल किंवा स्वत: धर्माचे पालन न करता इतरांना कोणी धर्म सांगत असतील तर समाज चुकीच्या मार्गावर जाईल, म्हणून अशांना सेनाजींनी परखड वाणीत सुनावले आहे.



आपण धर्मभ्रष्ट दुजियासी करी । छिनाली ती चोरी उनाड तो ।। धर्म-उपदेशीं मागेल जो अर्थी । तयाचिया प्रती भजू नये ।।, धर्माचे थोतांड करुनी भरी पोट । भार्यामुले मठ मजा करी ।।

समाजात स्वत: धर्माचे (निती नियमाचे) पालन न करता, आधी केले मग सांगीतले, असे न करता इतरांना धर्म सांगणारे आहेत. धर्म सांगणाऱ्यांनी आपल्या वाटयाला असलेले काम श्रध्दापूर्वक करुन धर्माचा आदर्श समाजासमोर ठेवायला हवा, असे सेनाजींना वाटत असे. म्हणून त्यांनी स्वकर्तव्य अभिमानाने सांगून प्रत्येकांनी त्यांच्या वाटयाला आलेले कर्म निष्ठापूर्वक पार पाडण्याबददल मत व्यक्त केले. आम्ही वारीक वारीक । करु हजामत बारीक ।। सत्व पाळा रे स्वधर्मासी ।सेना म्हणे आज्ञा ऐसी ।।. सेनाजींच्या या शब्दांकडे पाहिले तर आपण कोणत्या जातीत जन्माला आलो यावरुन आपले श्रेष्ठत्व ठरत नाही तर आपले श्रेष्ठत्व आपल्या स्वधर्माचरणावरुन ठरते हे लक्षात येते. वाटयाला आलेले कार्य निष्ठापूर्वक व निती नियमपूर्वक पार पाडणे म्हणजे स्वधर्माचरण होय. स्वधर्माचरण करणाऱ्यास ईश्वर भक्ती म्हणून वेगळे कांही करावे लागत नाही. आई वडीलांची सेवा, देश प्रेम, कर्तव्यपूर्ती, सामाजिक ऋणांची जाण हे सर्व स्वधर्माचेच भाग आहेत. स्वधर्माचा अर्थही अनेकांना कळत नाही. यामागचे कारण म्हणजे मीपणा, ईर्षा, व्देष, मत्सर, अहंकार हे होय. आपल्या वाटयाला आलेले कार्य हिन आहे आणि समोरच्याचे श्रेष्ठ आहे, असे मानणे योग्य नसते. स्वधर्माला कमी लेखून परधर्माला महत्व देणे हितावह नसते, हे सांगतांना सेनाजीं म्हणतात,स्वधर्मे सांडुनि परधर्मी जाय । त्याचे गुण गाय वर्णी सदा ।। कुरुप ती आई मुलासी जीवन ।दुजी रंभा जाण व्यर्थ आहे ।।. आई कुरुप असली तरी ती मुलाला जीवन देते म्हणून कुरुप असली तरी मुलाच्या दृष्टीत ती सर्वस्व असते आणि अत्यंत सुंदर रंभा असली तरी मुलाच्या दृष्टीकोणातून व्यर्थ असते. याप्रमाणे परधर्म कितीही मोठा आणि आकर्षक दिसत असला तरी खऱ्या अर्थाने स्वधर्माचे पालन हेच श्रेष्ठ कर्तव्य होय. आपण हे लक्षात ठेवून वागतो तर आपल्या जीवनात आनंदलहरी वाढतील. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. २५ फेब्रुवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन शु. नवमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- रोहिणी (१३.३८)
योग - विष्कंभ (२५.२८)
करण - बालव (१५.४६)
राहू काल : बुधवार
स. ७.३० ते ९.००

दिनविशेष :
१५१०: पोर्तुगीज सरदार अल्बुकर्कने गोव्यातील पणजीचा किल्ला जिंकला.
१५९९: वारकरी संप्रदायातील महान संत, कवी आणि समाजसुधारक संत एकनाथ महाराज यांचा स्मृतिदिन.
२०१२: जागतिक आरोग्य संघटनेने भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले.


# मक्याच्या दरात घसरण; शेतकरी अडचणीत

- हमीभावापेक्षा ९०० रुपयांनी कमी दर
- उद्दिष्ट पूर्ण झाल्याने जिल्ह्यात खरेदी बंद
- ८० हजार क्विंटल वाढीचा प्रस्ताव प्रलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

जिल्ह्यात मक्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. केंद्र सरकारने यंदा मक्यासाठी प्रतिक्विंटल २,४०० रुपयांचा हमीभाव जाहीर केला असला तरी सध्या सोलापूर बाजारात मक्याला केवळ १,५०० ते १,९२६ रुपये दर मिळत आहे. म्हणजेच हमीभावापेक्षा प्रतिक्विंटल ५०० ते ९०० रुपयांनी कमी दराने विक्री करावी लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांनी सरकारी खरेदी केंद्रांकडे धाव घेतली; मात्र जिल्ह्यासाठी मंजूर २५ हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने खरेदी प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. वाढलेल्या उत्पादनाच्या तुलनेत हे उद्दिष्ट अत्यल्प असल्याची भावना शेतकऱ्यांत आहे. त्यामुळे पणन विभागाने ८० हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. आदेश मिळताच पुन्हा खरेदी सुरू केली जाईल, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी दिली.

दरम्यान, गेल्या काही हंगामांत मक्याला चांगला दर मिळाल्यामुळे यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लागवड वाढविली. खरीप हंगामात जिल्ह्याचे सरासरी क्षेत्र ४७ हजार ८६१ हेक्टर असताना प्रत्यक्षात ८८ हजार १२२ हेक्टर (१८४ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली. रब्बी हंगामात सरासरी ४७ हजार १२ हेक्टरच्या तुलनेत



तब्बल ९५ हजार २६४ हेक्टर (२०३ टक्के) क्षेत्रावर मक्याची लागवड करण्यात आली. म्हणजेच दोन्ही हंगामांत विक्रमी वाढ झाली.

राज्य पातळीवरही अशीच स्थिती आहे. खरीप हंगामात राज्याचे सरासरी क्षेत्र ९ लाख ३३ हजार ८१९ हेक्टर असताना प्रत्यक्षात १४ लाख ५२ हजार ४८२ हेक्टर (१५६ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली. रब्बीतही ६ लाख ५९ हजार ५२० हेक्टर (१७६ टक्के) क्षेत्रावर मका घेतला गेला. उत्पादन वाढल्याने बाजारात आवक मोठ्या प्रमाणावर झाली आहे. दर घसरण्यामागे काही महत्त्वाची कारणेही पुढे येत आहेत. इथेनॉल निर्मितीसाठी तांदळाचा वाढता वापर आणि उसाची उपलब्धता यामुळे मक्याची मागणी कमी झाली आहे. त्यातच अमेरिकेशी व्यापार करारांतर्गत डीडीजीएस आयातीला परवानगी मिळाल्याने स्थानिक बाजारावर दबाव वाढला आहे. परिणामी मक्याचे दर कोसळले आहेत. जिल्ह्यात सात हमीभाव खरेदी केंद्रांमार्फत २५ हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

दरम्यान, राज्यासाठी केवळ ४८ हजार ५०० टन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याने शेतकरी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. खरेदी केंद्रांवर वाढती गर्दी लक्षात घेऊन मार्केटिंग फेडरेशनने राज्य सरकारकडे १ लाख ७० हजार टन अतिरिक्त खरेदीचे उद्दिष्ट मंजूर करण्याची मागणी केली आहे.

सध्या शेतकरी शासनाच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले आहेत. उत्पादन वाढले, मात्र खरेदी मर्यादित राहिल्याने बाजारात दर कोसळले असून तातडीने उद्दिष्ट वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे. शासनाने लवकर निर्णय घेतला नाही तर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेसाठी हिंगुलांबिका शाळेची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनानिमित्त आयोजित एकांकिका स्पर्धेत हा तर कचरा नव्हे तर निसर्गाची संपत्ती या एकांकिकेचे उत्कृष्ठरित्या सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकाविला. विज्ञान दिनानिमित्त ग्रंथाली- प्रतिभांगण व ओंकार नाट्यमंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानधारा विज्ञान विकास स्पर्धेत हिंगुलांबिका प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला.

रोख ५ हजार रुपये व पुस्तके असे त्याचे स्वरूप आहे. या विद्यार्थ्यांची मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे, विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी, प्राथमिकचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे व उपस्थित पालकांच्या वतीने अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना सहशिक्षक श्री अश्विन संगवे व एलिझाबेथ एकादशी, कागर, इडक, दुसरी गोष्ट, चि. व चि. सौ. का. अशा अनेक चित्रपटात आपल्या अभिनयाची छाप सोडणारे सोलापूरचे कलाकार श्री अमोल राजमाने व श्री धनंजय गोडबोले यांचे मार्गदर्शन लाभले.



## 'मल्लिकार्जुन' व 'हत्तुरे' मध्ये फूड फेस्टिवल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व उद्योजकीय कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते.

या फेस्टिवलचे उद्घाटन माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे,प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे सर, प्राथ.मुख्याध्यापक सचिन जाधव,सुधाकर कामशेट्टी,अण्णाराया तुप्पद,विनायक हत्तुरे,भारत राऊत,पालक प्रतिनिधी मल्लिकार्जुन स्वामी, सिद्रामप्पा कलशेट्टी,कैलास करकंटी यांच्या उपस्थितीत सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी तयार केलेले पदार्थ खरेदी करून त्याचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या फूड फेस्टिवलमधून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री नफा-तोटा व व्यवहार ज्ञान याविषयी ज्ञान मिळाले.

या फूड फेस्टिवल मध्ये पाणीपुरी, वडापाव, पॅटीस, भेळ, पोहे, सुशिला, ढोकळा, कच्ची दाबेली, गुलाब जामुन, इडली वडा, पोहे, उपीट, दाल चावल, समोसा, खस्तापुरी, गोबी मंचुरियन, पुरी भाजी, मोमोज, दही वडा, पावभाजी, खीर, केक, मसाला पापड, चहा, मठ्ठा, सुगंधी दूध, इ.पदार्थ विद्यार्थ्यांनी तयार करून आणले होते.

हे फूड फेस्टिवल यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके, परमेश्वर चांदोडे, दत्तात्रय आगरखेड, अनिता हौदे, सुकेशनी गगोंडा, प्रा.लक्ष्मीकांत पनशेट्टी, प्रशांत हरके, श्रीनिवास कोलपॅक, संतोष स्वामी, अनिलकुमार गावडे, रमेश आगवणे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम व अन्नदान

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

आस्था रोटी बँकेतर्फे संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० वी जयंती निमित्त दत्त चौकामधील संत गाडगेबाबा महाराज यांच्या मूर्तीस पूजा करण्यात आली. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये स्वच्छता मोहीम करत तेथील गोरगरीब गरजू लोकांना, तसेच पेशंट व पेशंटच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. संत गाडगेबाबा महाराज यांनी समाजासाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून पंकज जाधव व सिद्धेश्वर कळकेरी व तसेच ब्लड बँकेचे विनायक कुलकर्णी आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष विजय छचुरे यांची होती. आस्था रोटी बँकेचे कार्यकर्ते विनोद भोसले दत्तात्रय दळवी अनिता तालीकोटी गीता दळवी विजय छचुरे इतर कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# नृत्याविष्कारातून उलगडली 'शेतकरी संघर्ष' गाथा





## 'ऑपरेशन सिंदूर'वरील कार्यक्रमाने प्रेक्षक मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात बाळे येथील ढेपे स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले शेतकरी गीत व नृत्याविष्कार तसेच राज मेमोरियल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'वरील कार्यक्रमाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

हुतात्मा स्मृती मंदिरात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई व भारत भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पुणे येथील अतुल दिवे प्रस्तुत स्वरसाक्षी या सांस्कृतिक कार्यक्रमाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. देशभक्ती, सामाजिक जाणीव आणि लोकसंस्कृतीचा सुरेल संगम साधणार्या या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनावर खोल ठसा उमटविला.

याचे उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते अशोक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हैदराबाद येथील मीनाक्षी गिरधारी, महाराष्ट्र प्रदेश प्रभारी अतुल शेवडे (पुणे), सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे अधिकारी सदाशिव खैरे, रा. स्व. संघाचे मदन मोरे, सुनील इंगळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादनाने झाली. त्यानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. 'ज्ञानातून उसळे', 'हे राष्ट्र देवतांचे', 'बलसागर भारत होवो', 'जयोस्तुते', 'नन्हा मुन्ना राही हूं', 'आओ बच्चो तुम्हे', 'सारे जहाँ से अच्छा', 'है प्रीत जहाँ की रित', 'मेरा कर्मा तू', 'ए मेरे वतन के लोगो', 'सागरा प्राण तळमळला', 'संदेसे आते है', 'वंदे मातरम' अशी देशभक्तिवरील विविध गीते सादर करण्यात आली. या सर्वच गीतांना रसिकांनी मनमुराद दाद दिली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

ही सर्व गीते स्वाती कुलकर्णी, अंजली भालेराव, वैशाली कुरतडीकर व धनंजय गोसावी यांनी गायली. महेश अचिंतलवार यांच्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. सिंथेसायझरवर विजय मिमरोट, ढोलकीवर अंकुश बोर्डे तर ऑक्टोपॅडवर विनोद वावळ यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. संपूर्ण व्यवस्थापनाची धुरा प्रीती दिवे यांनी सांभाळली.

या कार्यक्रमात राज मेमोरियल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूरवर नृत्याविष्कार सादर करून देशभक्ती जागविली. यावेळी अभिनेते अशोक शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना एकी, प्रेम भावना, आरोग्य आणि तंदुरुस्त जीवनशैली जपण्याचा सल्ला दिला. यावेळी प्राचार्य गजानन धरणे, अमोल धाबळे, चिदानंद मुस्तारे उपस्थित होते.



## बेकायदेशीर कृत्ये थांबवा; पोलिस आयुक्तांकडे मागणी

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सत्यसाई नगर व गीता मंदिर परिसरात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक कोंडी, बेकायदेशीर कृत्ये तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या इतर महत्त्वाच्या समस्यांबाबत सोडवाव्यात व संबंधित बाबींवर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. नगरसेवक प्रशांत पल्ली यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १८ मधील विविध अडचणी व नागरी समस्यांबाबत सविस्तर निवेदन देण्यात आले. पोलीस आयुक्त यांनी निवेदनाची दखल घेऊन संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन दिले. यावेळी रविकिरण कोडमूर, नागेश कल्पवृक्ष, शंकर कल्पवृक्ष, सिद्राम कल्पवृक्ष, नागनाथ काकेरला, मार्कंडेय डम, व्यंकटेश नराल, नागनाथ कोंकत्ती, दीपक गायकवाड उपस्थित होते.

## मोबाईलच्या प्रकाशात कीर्ती स्तंभाचे दर्शन ; महापालिकेचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

जगाला अहिंसेचा मार्ग दाखवणारे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना अनेक दिवसापासून आचार्य शांतीसागर चौकातील जैन धर्माचे श्रद्धास्थान कीर्ती स्तंभ अंधारात असून याकडे महापालिका सतत दुर्लक्ष करीत असल्याची खंत भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील यांनी व्यक्त केले.

कुठलेही मुलं येतात वाढदिवस साजरी करतात तसेच कायम स्वरूपी घाणीचे साम्राज्य असते कीर्ती स्तंभावरील ग्रॅनाईट उघडले असून तेही लवकर बसवले जात नाही वारंवार पाठपुरावा करूनही महापालिका हे काम करत नाही शहरातील थोर पुरुषांचे पुतळे सर्व प्रकाशमय असून कीर्तीस्तंभ अंधारात आहे याकडे आयुक्तांनी लक्ष घालून ठेकेदाराला तसे आदेश द्यावेत अशी मागणी ही असता रोटीचे आनंद तालीकोटी यांनी केली.



या कीर्ती स्तंभाच्या जवळ सेक्युरिटी गार्ड नाही सीसी कॅमेरे चालू नाहीत अशी या कीर्ती स्तंभाची परिस्थिती झाली असून लवकरात लवकर येथील सुविधा द्याव्यात अशी मागणी भारतीय जैन संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते यांनी केली आहे यावेळी भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील, अभिनंदन विभूते, आस्था रोटीचे अनंद तालीकोटी सुहास चंचुरे, विक्रांत बशेट्टी, हिराचंद कासार, ओम पाटील आदींनी केली आहे.

# जिल्ह्यातील ६७० शाळांतील मुलींना मिळणार स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

'राष्ट्र प्रथम' अभियानांतर्गत राज्यातील २१ हजार २७९ शाळांमध्ये मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. या मुलींना १० हजार माजी सैनिकांमार्फत सैनिकी शिक्षणही देण्यात येणार असून, १० हजार प्रबोधनकारांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय विचार आणि व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. तर जिल्ह्यातील ६७० शाळांमधील चौथी ते आठवीपर्यंतच्या मुलींना स्वसंरक्षणाचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून राज्य शासनाने हा मोठा निर्णय घेतला आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या संकल्पनेतून हे अभियान १५ जानेवारी २०२६ पासून सुरू झाले असून, २० मार्च २०२६ पर्यंत हे प्रशिक्षण चालणार आहे. यामध्ये विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

मुलींना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम न करता त्यांना मानसिकदृष्ट्याही कणखर बनविण्यावर भर दिला आहे. यात तायक्वांदो, कराटे, ज्यूदो, क्राव मागा, बॉक्सिंग यांसारख्या मार्शल आर्ट्सचा समावेश आहे. तसेच योगासने आणि प्राणायामाद्वारे मानसिक स्वास्थ्यावर काम केले जाईल.

### या प्रशिक्षणाचा मुलींना आयुष्यभर होणार फायदा

मुली मोठ्या होवून लग्न झाल्यानंतर समाजात वावरत असताना बऱ्याचदा स्त्री अत्याचाराच्या घटना घडतात. छेडछाड, मंगळसूत्र हिसकावण्याच्या, विनयभंग किंवा अतिप्रसंगाचे प्रकार घडतात. एखादा प्रसंग आलाच तर महिला, मुलींना स्वत:चे संरक्षण करता आले पाहिजे. न घाबरता त्या घटनेचा सामना करत समोरच्या आरोपीला धडा शिकवावा यासाठी काय करायला हवे, हे या प्रशिक्षण वर्गात शिकवले जाणार आहे. हे प्रशिक्षण या शालेय मुलांना आयुष्यभर फायदेशीर ठरणार आहे.

### शासनमान्य एजन्सीकडून मिळणार मार्गदर्शन

जिल्ह्यातील ६७० शाळांमध्ये मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत. याबाबत माजी सैनिकांसह शासनाने नियुक्त केलेल्या एजन्सीकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शाळेतील समित्यांनीही प्रशिक्षणाची वेळ निश्चित करावी. प्रशिक्षणादरम्यान शाळेतील महिला शिक्षकांनी हजर असावे. आजारी असलेल्या मुलींना यातून सूट राहील.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...


निनाद शिंदे


स्नेहल असबे


समर्थ इंगोले

### सिंहगड ॲकॅडमीचे जेईई मेन्समध्ये यश

**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**
जेईई मेन्स परीक्षेत कोर्टी (ता.पंढरपूर) येथील सिंहगड ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केल्याची माहिती कॅम्पस डायरेक्टर डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. यामध्ये निनाद निशिकांत शिंदे (९२.०९%), स्नेहल योगेश असबे (९१.२५%) व समर्थ संतोश इंगोले (८२.७७%) यांनी चांगले यश प्राप्त केले. अकॅडमी मधील नियमित सराव परीक्षा, प्रत्येक सराव परीक्षेनंतर सविस्तर अँनेलेसीस व वैयक्तिक लक्ष याचा फायदा झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. सर्व विद्यार्थ्यांना अकॅडमीचे प्रा. रूपेश बावलेकर (फिजीक्स), डॉ. एम. एम. आवताडे (केमिस्ट्री), प्रा. विठ्ठल बोचरे (मॅथेमॅटिक्स) व प्रा. सायली जाधव (बायोलॉजी) यांच्यासह प्राचार्या स्मिता नवले, विभागप्रमुख डॉ. संपत देशमुख व डॉ. अनिल निकम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



### नवीन मराठी शाळेत संत गाडगेबाबा जयंती साजरी

**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**
येथील नवीन मराठी शाळेत थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आशा घल्लाळ यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमात आशा घल्लाळ यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर आधारित मार्गदर्शनपर भाषण केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन आरती पाटील यांनी केले तर आभार उमेश नायकुडे यांनी मानले.



### सांगोल्यात संत गाडगेबाबा जयंती साजरी

**सांगोला, दि. २४ फेब्रुवारी-**
सांगोल्यातील परीट समाज सेवा मंडळाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात करून शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर वाढेगाव येथील भजनी मंडळाचे भजन झाले. दु. १२.३० वा. गाडगेबाबांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, बांधकाम सभापती गोदा बनसोडे, नगरसेवक विवेक पाटील, प्रशांत धनवजीर, माऊली तेली, नगरसेविका तनुजा एरंडे, वैशाली झपके, माजी नगरसेवक सतीश सावंत, गजानन बनकर, सोमेश यावलकर, तानाजी पाटील, सुभाष इंगोले, वैजिनाथ घोंगडे, बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे, खंडू सातपुते, उल्हास धायगुडे, महादेव वाघमारे, समीर पाटील, संजय देशमुख, संजय बाबर, सचिन भुसे, शंभु माने, विष्णुपंत केदार, फिरोज खतीब, सौदागर केदार, दादा वाघमोडे, सुरेश चौगुले, ॲड.महादेव कांबळे, माजी सैनिक मराळ, लकी कांबळे, सुनिल गायकवाड, सतीश गायकवाड,प्रभाकर बिचकले, बाळू चौगुले, अपर्णा गुरव उपस्थित होता.



### संत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त पंढरपुरात स्वच्छता अभियान

**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**
ग्रामस्वच्छता व सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते थोर समाजसुधारक संत गाडगेमहाराज यांच्या जयंती निमित्ताने पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियाना मध्ये नगराध्यक्ष, पालिका कर्मचारी व नागरिकांनी सहभाग नोंदविला. स्वच्छता अभियाना मध्ये जिजामाता उद्यान, गाडगेबाबा चौक आदी शहरातील भागाची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियाना मध्ये पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, पालिकेचे आजी,माजी नगरसेवक, स्विकृत सदस्य तसेच पालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. विशेष म्हणजे पालिकेच्या वतीने या स्वच्छता अभियाना मध्ये नागरिकांनी देखील सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आलेले होते. पालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील विविध स्तरातील नागरिक देखील मोठ्या संख्येने या अभियाना सहभागी झालेले दिसत होते. यावेळी पालिकेच्या वतीने नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके तसेच उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी सहभागी सर्व नागरिकांचे आभार मानले. या पुढील काळात देखील अशाच प्रकारे स्वच्छता अभियान राबवुन कायम पंढरपूर शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल असे अभिवचन पालिकेच्या नगराध्यक्षा आणि उपनगराध्यक्ष यांनी यावेळी बोलताना दिले.

# मंगळवेढ्यात पाऊस; रब्बी पिकांचे नुकसान

## पंचनामे करण्याची शेतकरी वर्गातून होतेय मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२४ फेब्रुवारी-**
मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात दिवसभर ढग व ऊन असा नैसर्गिक पाठशिवणीचा खेळ सुरु असताना सायंकाळी अचानक ढगांचा गडगडाट करीत अनेक ठिकाणी पाऊस पडल्याचे वृत्त आहे. दरम्यान सध्या सुगीचे दिवस असल्यामुळे हरभरा पिके शेतात काढून ठेवल्याने पिकांची हाणी झाल्याचे शेतकर्यांच्या तक्रारी आहेत. भोसे येथे वीज पडून एका शेतकर्याची देशी गाय मृत पावल्याची घटना घडली आहे.

मुंबई येथील हवामान खात्याने बीड, धाराशीव, हिंगोली, लातूर, नांदेड, परभणी येथे ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहून वीजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस



पडण्याचा अंदाज वर्तविला होता. त्या प्रमाणे सोमवार रोजी दिवसभर ऊन व ढग असा निसर्गाचा पाठशिवणीचा खेळ सुरु होता. या दरम्यान सायंकाळी मंगळवेढा शहरावर ढगांचा गडगडाट करीत पावसाने हजेरी लावली. भाळवणी,मरवडे,अरळी, येड्राव, शिरनांदगी आदी ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या तसेच भोसे येथे वीज कडाडल्याने ती वीज एका शेतकर्याच्या देशी गाभण गायीच्या अंगावर पडल्याने ती जागीच मृत पावली. या घटनेचे वृत्त समजताच महसूल विभागाचे तलाठी सदर घटनास्थळी दाखल होवून पंचनामा प्रक्रिया सुरु होती.

सध्या सुगीचे दिवस असल्यामुळे मंगळवेढ्याच्या काळ्या शिवारात सर्वत्र हरभरा काढणीला वेग आला असून शेतामध्ये हरभरा काढल्याचे चित्र आहे. ज्वारी पिके काढणीला आल्याने या पावसामुळे ज्वारीची पिके ही धोक्यात सापडली आहेत. कणसामधील ज्वारीचा फुलोरा धुवून जाण्याची शक्यता शेतकरी वर्गातून वर्तविली जात आहे. मराठी म्हणी प्रमाणे आई जेवू देईना बाप भिक मागू देईना अशी निसर्गाने अवस्था सध्या शेतकऱ्यांची केली असल्याच्या तिखट प्रतिक्रीया व्यक्त होत आहेत. द्राक्षबागा, डाळिंब, आंबा, गव्हू, करडई याही पिकाचे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. शासनाने या नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करुन शेतकर्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# मोहोळमध्ये मागास वस्तींसाठी दोन कोटींचा निधी मंजूर

## आ. राजू खरे यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२४ फेब्रुवारी-**
मोहोळ विधानसभा मतदारसंघात मागासवर्गीय वस्तीसाठी समाज कल्याण विभागाच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष सहकार्याने समाज कल्याण मंत्री संजय शिरसाठ यांच्या प्रयत्नाने २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती मोहोळचे विद्यमान आमदार राजू खरे यांनी दिली. याबाबत आमदार राजू खरे यांनी समाज विभाग कल्याण विभागाचे मंजुरीचे पत्रच प्रसार माध्यमाकडे सादर केले आहे.



या पत्रानुसार कोन्हेरी येथे मागासवर्गीय वस्तीत संविधान सभागृह बांधणे साठी १० लाख, आंबे (ता पंढरपूर ) येथे दलित वस्तीत पेव्हर ब्लॉक बसविणे १० लाख, पोहरगाव येथे नवबौद्ध घटकाच्या स्मशान भूमी कॉक्रीट रस्ता करणे साठी दहा लाख ढोक बाभूळगाव आंबेडकर नगर येथे समाज मंदीर बांधणे दहा लाख डिकसळ येथे दलित स्मशान भूमीत वॉल कंपाऊंड साठी दहा लाख कोरवली भिम नगर भूमीगत गटार बांधणे साठी दहा लाख, डिकसळ येथे मागास वर्गीय स्मशान भूमीत वॉल कंपाऊंड, पाटकूल आंबेडकर नगर येथे संविधान सभागृह साठी दहा लाख, खंडाळी समाज मंदीर वॉल कंपाऊंड, सय्यद वरवडे दलित वस्तीत संविधान सभागृह, फुल चिंचोली (ता पंढरपूर ) नागनाथ प्रक्षाळे ते वसंत बनसोडे घर रस्ता कॉंक्रेटीकरण, जामगाव बुद्रुक स्मशान भूमी वॉल कंपाऊंड ,टाकळी सिकंदर येथे बौद्ध विहार बांधणे, चळे ता पंढरपूर येथे भीमराव मोरे घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे चळे (ता. पंढरपूर) येथे कल्याण अंकुर शाळा ते कोयना नगर रोड येथे कॉंक्रीट रस्ता करणे, औढी आंबेडकर नगर येथे कॉंक्रिट रस्ता करणे, नजीक पिंपरी दलित वस्तीमध्ये सभागृह बांधणे, चिखली जयद्रत गवळी घर ते बोद्ध विहार येथे कॉंक्रीट रस्ता करणे, आढेगाव भीम नगर येथे भूमिगत गटार बांधणे अशा कामासाठी प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्या सहकार्याने सामाजिक न्याय सहाय्य विभाग यांच्यावतीने २ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे अशी माहिती विद्यमान आमदार राजू खरे यांनी दिली.



# बार्शी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी सचिन अपसिंगकर यांची निवड

## उपाध्यक्ष करडे, सचिव गोडसे, खजिनदार पवार तर सहसचिवपदी घोलप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**
येथील दैनिक वृत्तपत्र पत्रकारांची संघटना असलेल्या बार्शी 'प्रेस क्लबच्या' अध्यक्षपदी सुराज्यचे सचिन अपसिंगकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी चंद्रकांत करडे सचिवपदी गणेश गोडसे, खजिनदारपदी उमेश पवार तर सहसचिवपदी गणेश घोलप यांची निवड करण्यात आली.

समर्थ व्यायाम शाळा (तरुण भारत कार्यालय) येथे रविवारी (दि. २२) सायंकाळी झालेल्या बैठकीत वृत्तपत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी तरुण भारतचे अरुण बळप होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार एन. आर. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. पुढील २ वर्षासाठी निवडलेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे अध्यक्ष सचिन अपसिंगकर, उपाध्यक्ष चंद्रकांत करडे, सचिव गणेश गोडसे, खजिनदार उमेश पवार, सहसचिव गणेश घोलप यांची निवड करण्यात आली.

प्रेस क्लबचे मार्गदर्शक म्हणून एन. आर. कुलकर्णी, भ. के. गव्हाणे, अरुण बळप, अजित कुंकूलोळ यांची तर सदस्यपदी सचिन वायकुळे, शहाजी फुरडे-पाटील, गणेश भोळे, कदीर बागवान, विजय निलाखे, प्रशांत खराडे, नंदकुमार माढेकर,, गणेश शिंदे, प्रशांत काळे, सुनील अवघडे, धीरज शेळके, प्रशांत गायकवाड आणि उमेश काळे यांची निवड करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार एन.आर. कुलकर्णी आणि अरुण बळप यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पंढरपूर सिंहगड महाविद्यालयामध्ये शिवजंयती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत एस.के.एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी, पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. शिवाजी महाराज जंयतीच्या उदघाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.चंद्रकांत देशमुख, समन्वयक प्रा. सुमित इंगाले, प्रा. शिवाजी पवार, डॉ. नामदेव सावंत, प्रा. समाधान माळी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजाच्या प्रतिमेला हार घालून दिपप्रज्वलन करण्यात आले.

तसेच शिवजंयतीचे औचित्य साधून महाविद्यालयातील संकेत घुटूकडे यांनी शिवाजी महाराजांची वेशभूषा व सृष्टी जगदाळे हिने राजमाता जीजाऊची वेशभूषा केली. यावेळी पालवीच्या संस्थापिका मंगल शहा यांनी भाषण केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी अविराज साळुंखे, गणेश पवार, आकाश पवार, संकेत खडतरे, हर्षद शिंदे, हषवर्धन गायकवाड, प्रणव शिवारकर, संकेत घुटकूडे, सानीया मुल्ला, सृष्टी जगदाळे, स्नेहा कदम, वैष्णवी देवकर, रेष्मा पठाण, पुर्वा वाखारकर, मयुरी झुरे, राधिका निकम व श्रावणी पवार यांनी परिश्रम घेतले.



# अक्कलकोटमध्ये संत गाडगेबाबांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**
येथील उपलप विठ्ठल मंदिर येथे श्री संत गाडगे बाबा महाराज जंयती उत्सव परीट समाज बांधव कडून मोठया जल्लोषात साजरी करण्यात आला.

संत गाडगे बाबा महाराज यांच्या जयंती निमित्त परीट समाज बांधवाकडून प्रतिमा पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीट समाज अध्यक्ष राजू सोनटक्के, उपाध्यक्ष अविनाश माडकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समरसता गतिविधीचे संदीप कटकधोंड, सुनील सोनटक्के उपस्थित होते.

# 'रत्नाई' च्या गुणवंत कृषीरत्नांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ फेब्रुवारी-**
रत्नाई कृषी महाविद्यालयामध्ये एम पीएससीद्वारे निवड झालेल्या गुणवंत कृषीरत्नांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी जयसिंह शंकरराव मोहिते- पाटील आणि प्रमुख अतिथी म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे उपस्थित होते.

यावेळी कृषीरत्न पवन मंगरूळे (उपजिल्हाधिकारी), श्रेयश यादव (उपविभागीय कृषी अधिकारी), अमृता शिर्के (सहाय्यक आयुक्त), ललित गायकवाड (सहाय्यक आयुक्त-अन्न व प्रशासन), मानसी गोडसे (सहाय्यक वनसंरक्षक), मोहसीन शेख (सहाय्यक वनसंरक्षक), शिवकुमार सदाफुले (जिल्हा कृषी अधीक्षक), भाग्यश्री भोसले (तालुका कृषी अधिकारी), बाळासाहेब कवडे (तालुका कृषी अधिकारी), पल्लवी कोळी (तालुका कृषी अधिकारी), ओंकार गायकवाड (गटविकास अधिकारी) यांचा सत्कार शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील आणि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे यांच्या हस्ते



करण्यात आला.

या सर्व कृषीरत्नांबरोबर शैक्षणिक वर्ष २०२२- २३ पासून विविध क्षेत्रांमध्ये निवड झालेल्या ११३ गुणवंतांचा सत्कार शाल, बुके आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. कृषी रत्नांनी विविध पदावर काम करीत असताना आपल्या मातीला विसरता कामा नये. शिक्षण चालू असताना शेतावर अनुभव घेणे तेवढेच नितांत गरजेचे आहे, असे मत अध्यक्षीय भाषणात मोहिते-पाटील उर्फ बाळदादा यांनी व्यक्त केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात नुकतीच उपजिल्हाधिकारी पदावर निवड झालेल्या पवन मंगरुळे, गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड आणि तालुका कृषी अधिकारी पदावर निवड झालेली पल्लवी कोळी यांनी आलेल्या अनुभवावर आधारित मनोगते व्यक्त केली. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सुभाष दळवी, पांडुरंग एकतपुरे, नारायण फुले, उत्कर्ष शेटे, बाळासाहेब सणस, रामचंद्र गायकवाड तसेच सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील उपस्थित होते. प्रा. ए. बी. तमनर, प्रा.एस. एस. भोसले, डॉ. बी.ए. शिंदे, प्रा. एस. आर. कांबळे, प्रा. सचिन एकतपुरे यांनी परिश्रम घेतले. प्राचार्य प्रा. आर.जी.नलावडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मेरा मुल्क, मेरा देश या देशभक्तीपर गीताने सांगता झाली.



# मंद्रूप हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यास प्राधान्य : पोनि. पटवारी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. २४ फेब्रुवारी-**
मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास प्राधान्य देण्यात येणार असून तक्रारदारांना योग्य न्याय देण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध राहील, अशी ग्वाही नवनियुक्त पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी दिली.

आगामी सण-उत्सव व निवडणुका शांततेत पार पडाव्यात यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला व मुलींच्या सुरक्षेला प्राधान्य देत अवैध व्यवसाय, रोडरोमिओ प्रकार तसेच अल्पवयीनांकडून होणारे वाहतूक नियमभंग यावर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. गुन्हेगारी रोखण्यासाठी रात्रीची गस्त वाढविणे तसेच ग्राम सुरक्षा दल सक्रिय करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.

# अक्कलकोटमध्ये शिवजयंती मिरवणुकीनिमित्त अवतरली शिवशाही

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**
राजा छत्रपती शिवाजी महाराज बहु समाज सेवी संस्था संस्थापक अध्यक्ष नगरसेवक तम्मा शेळके यांच्या नेतृत्वाखाली इजि. वरुण शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती देखावा मिरवणूक संपन्न झाली. हालगी पारंपारिक वाद्य ढोल आकर्षक अफजल खान वध लक्षवेधी विविध सजीव देखावे 'भवानी तोफ' यामुळे ही मिरवणूक लक्षवेधी ठरली.

प्रारंभी राजा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील मध्यवर्ती शिवजन्मोत्सव मंडळाची मिरवणूक आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी



महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष मिलनकल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, प्रदिप पाटील, नन्नू कोरबू, नगरसेवक नविंद डांगे, सद्दाम शेरीकर, देवीदास कवटगी, अशोक जाधव सुनिल खवळे यांची उपस्थिती होती.

यावेळी सरपंच नितिन मोरे, रोहित खोबरे, मनोज गंगणे, शितल फुटाणे,सतिश जाधव, सचिन शिंदे, मंडळाचे अध्यक्ष अनिल मोरे, उपाध्यक्ष राजू मद्रीकर, रुद्रा पाटोळे, सचिव शब्बीर शेख , सहसचिव मनोज गंगणे, कोषाध्यक्ष प्रविण डोके, उपकोषाध्यक्ष शंकर माळी, मिरवणूक प्रमुख जाकीर तांबोळी, संजय जमादार, स्वामीराव लोणारी, विलास धोत्रे, बाळू खैराटकर, सल्लागार अतुल जाधव, स्वामीनाथ बेद्रे, दादा शिंदे, बंडू इंगळे, प्रशांत विरकर, धनु गंवडी, सिध्दू पाकणीकर, अप्पू किणगी, अनिल लोणारी, भीमा कोळी, रफिक पालंडे, रमेश शंभेवाड, अनिल सोनटक्के, कुमार भिसे, स्वामी, चव्हाण, विकास जाधव, श्रीशैल गवंडी, सचिन गडकरी, विरू गवंडी, वैजूनाथ मुकडे संघटक प्रशांत धोत्रे ओंकार जाधव सोनू सुरवशे समर्थ जामदार सुरज जाधव अमोल कोरे, रवी कोरे, प्रज्वल पाटोळे, सोनू कांबळे, युवराज जोशी, पप्पू अवघडे, बंटी फुटाणे, निलेश कलशेट्टी, संतोष कामाटी, बंदेनवाज बडेखा, अमोल धोत्रे, तम्मा आळवीकर, तम्मा मुत्तगी, स्वरूप जाधव, सतीश जगताप, राहुल कोरे, गोस मोकाशी, पत्रकार नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, राजेशकुमार जगताप, प्रशांत भगरे, मारूती बावडे, चेतन जाधव, रमेश भंडारी उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल जाधव यांनी तर आभार सुहास सुरवसे यांनी मानले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बाहुल्यांच्या नृत्यातून गीतरामायणाचे सादरीकरण

**लोकमान्य टिळक सभागृहात सोहम येमूलचा १ मार्चला होणार प्रयोग**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने रविवारी (ता.१) कळसूत्री बाहुल्याच्या नृत्यातून गीत रामायणाचे सादरीकरण होणार आहे. लोकमान्य टिळक सभागृहात सोहम येमूल हा प्रयोग सादर करणार आहे.

दमाणी शाळेत प्रयोग सादर केल्यानंतर माढा येथे हा प्रयोग सोहमने सादर केला. त्यांनतर थायलंडमधील ३ यशस्वी आंतरराष्ट्रीय प्रयोगानंतर आता प्रथमच सोलापुरात १ तासाचे बाहुली नाट्य सादर करत आहे. असा प्रयोग पाहण्याची सोलापूरकरांना संधी मिळत आहे. प्रयोग सर्वांसाठी खुला असून रसिकांनी आवर्जून प्रयोग पाहावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### महत्त्वाचे



### 'संत निरंकारी'च्या वतीने जल स्वच्छता अभियान

**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**
संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन शाखा बार्शी व वैराग यांच्यावतीने अमृत प्रोजेक्ट अभियान राबविण्यात आले. बार्शी येथील गणेश तलाव या ठिकाणी मंडळाच्यावतीने जलस्वच्छ म्हणजेच तलावातील असलेला कचरा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. संपूर्ण भारतभर संत निरंकारी मंडळाच्यावतीने हे अभियान सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या आदेशाने बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त अभियान राबविण्यात आले. या अभियानासाठी बार्शी ब्रांच मुखी शशिकांत शिंदे, वैराग ब्रांच मुखी अंगत अंबुरे, बार्शी युनिटची सेवादल अधिकारी किशोर ढोले व ऋषिकेश शेळके वैराग युनिटचे सेवदल अधिकारी चंद्रकांत उंबरे, नागनाथ अंकुश, राजेंद्र चव्हाण, विक्रम क्षीरसागर यांचे सहकार्य लाभले.



### पिलीव परिसरात अवकाळी पाऊस

**पिलीव, दि. २४ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात गेल्या दोन दिवसांपासून हवामानात प्रचंड बदल जाणवत असुन ढगाळ वातावरण तसेच वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यामुळे खरेतर बहरात असणाऱ्या द्राक्ष बागायतदार, आंबा उत्पादक शेतकरी तसेच गहु, हरभरा व इतर अनेक पिके शेतकऱ्यांच्या शेतात बहरात आहेत. महिनाभरात गहू, हरभरा, कांदा, मका काढणीला वेग येणार आहे. सध्या ही पिके पूर्ण बहरात आहेत. यंदा गहू व हरभरा पिकांसाठी हवामान अतिशय पोषक असल्यामुळे पिक अतिशय जोमदार आले आहेत यंदा गहु व हरभरा पिकाचे विक्रमी उत्पादन होईल अशी शेतकऱ्यांनी अपेक्षा आहे. पण या अवकाळी पावसाची शेतकऱ्यांना प्रचंड धास्ती लागली आहे. सध्या गहू, हरभरा, कांदा, मका पिके तर द्राक्ष, आंबे, शेवगा, चिंच, केळी या फळबागा पूर्णपणे बहरात आहेत. पण अवकाळी पावसाच्या सावटामुळे शेतकरी अक्षरशः देव पाण्यात घालून बसले असून अवकाळी पावसाचे सावट ताबडतोब जावे असे देवाकडे साकडे घालत आहेत.

### अक्कलकोटमध्ये २८ फेब्रुवारीला जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**
छत्रपती शिवाजी महाराज, मातोश्री रमाई रमाबाई भीमराव आंबेडकर, संत गाडगेबाबा संत यांच्या संयुक्त जयंती उत्सव निमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत पहिला गट १४ ते १८ वर्ष विषय आई मला शिवबा व्हायचं, गोष्ट भीमाला साथ देणाऱ्या रमाईची, आपल्या अस्तित्वाची काया फक्त बा भीमा, भारताचं वैश्विक स्वाभिमानी म्हणजे भारतीय संविधान, महाराष्ट्र आम्हाला समजलाच नाही, संस्काराचा पाया माझा शिवराय. दुसरा गट १८ ते ५० व विषय सावधान कार्यकर्त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षाच्या राजकीय राज्य शिष्टाचार, उत्सवाचे बाजारीकरण, महाराष्ट्राची राजकारणाची बदलती दिशा, आधुनिक विचाराच्या लोककल्याणकारी महापुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर, सर्वधर्म त्याचा अभिमान म्हणजे शिवबा, ढासळती कुटुंब व्यवस्था एक आव्हान हे विषय आहेत. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकास प्रमाणपत्र व ट्रॉफी व योग्य ते बक्षीस दिले जाईल प्रत्येक सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र संपूर्ण प्रमाणपत्र व बक्षीस अक्कलकोटचे सुपुत्र दिनेश गायकवाड यांच्याकडून देण्यात येईल. स्पर्धेचे ठिकाण सर्जेराव जाधव सभागृह मेन रोड अक्कलकोट वक्तृत्व स्पर्धेचा आयोजक आरोग्य दूत विकीबाबा चौधरी व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी नावनोंदणीसाठी संपर्क ९९२३२३२३५४ ७६६६२९९०६०

### चेक बाऊन्सप्रकरणी मोहोळच्या बांधकाम व्यावसायिकाला दणका

**मोहोळ, दि. २४ फेब्रुवारी-**
चेक बाऊन्स झाल्याने मोहोळ येथील एका बांधकाम व्यवसाईकास न्यायालयाने दोषी ठरवून मोहोळ न्यायालयाने ६ महिन्याची शिक्षा व ७ लाख रुपयेचा दंड सुनावण्यात आला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की मोहोळ येथील हरिदास चंद्रकांत आलकुंटे यांनी ४ लाख रुपये हरिदास देशमाने यांचेकडून चार ऑगस्ट २०१७ रोजी हात उसने घेतले होते. ती रक्कम दीड वर्षाने परत करण्याचे ठरले होते. वारंवार मागूनही त्यांनी ती परत केली नाही. परंतु नंतर त्यांनी त्या रक्कमेचा चेक देशमाने यांना दिला. देशमाने यांचा तो चेक वटला नाही परत माघारी आला. त्यानंतर चेक देणारे संतोष अलकुंटे यांना नोटीस पाठविली. नोटीस मिळूनही चेकची रक्कम दिली नाही. त्यांनी याबाबत मोहोळ येथील न्यायालयात धाव घेतली. याबाबत मोहोळ येथील प्रथम वर्ग न्यायालयाने ॲड. अमोल देशपांडे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून संतोष हरीशचंद्र अलकुंटे यास सहा महिने कारावासाची व रक्कम ७०१८०८ रुपये चा दंड सुनावला रक्कम न भरल्यास पंधरा दिवसाची साधी शिक्षा भोगण्याचे आदेश दिले.

## माजी आ.स्व. गणपतराव देशमुख यांचे स्मारक उभारणी कामास मंजुरी


**सांगोला नगरपालिकेची सर्वसाधारण सभा**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२४ फेब्रुवारी-**
सांगोला नगरपालिकेच्या निवडणुकीत माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी मतदारांना दिलेल्या शब्द पूर्ण करण्यासाठी सांगोला नगरपालिकेच्या सोमवार दि.२३ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत शहरात माजी आ.स्व.गणपतरावजी देशमुख यांचे स्मारक उभारणे कामास मंजुरी घेण्यात आल्याची माहिती शिवसेना (शिंदे गट) प्रवक्ते नगरसेवक अरुण पाटील यांनी पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, नगरसेवक काशिलिंग गावडे, माऊली तेली उपस्थित होते.

वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून वासुद रोड येथे नमो उद्यान व पाण्याच्या टाकी समोर योगा केंद्र उभारण्यास मंजुरी, थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी अभय योजना राबवण्यासाठी मंजुरी, वंदे मातरम चौकातील उद्यानाला व नवीन होत असलेल्या भाजी मंडईला उमाजीराजे नाईक यांचे नाव देण्यास मंजुरी, दि.८ मार्च रोजी असलेल्या महिला दिनानिमित्त घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांना मंजुरी तसेच शहरातील मोकाट जनावरे यांना गोशाळेत सोडण्यासाठी होणाऱ्या खर्चाला या सर्वसाधारण सभेत मंजुरी घेण्यात आल्याची माहिती अरुण पाटील यांनी दिली.

> छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसृष्टी उभा करण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून सर्व शिवप्रेमींचे मत विचारात घेऊन पुढील काम करण्यात येईल. तसेच विविध समाजांचे सभागृह बांधण्यासाठी २० कोटी रुपये निधी मंजूर असून जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे ते काम पूर्ण केले जाईल. आयोध्या नगरी येथे बांधण्यात आलेल्या सभागृहास माजी आ.शहाजीबापू पाटील यांचे नाव देण्यास मंजुरी घेण्यात आली आहे.
> **- आनंदा माने, नगराध्यक्ष**



## अवकाळी पावसाचा द्राक्षे, आंबा पिकांना फटका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**
पंढरपूर शहर व परिसरात सोमवारी दुपारनंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागांना मोठा फटका बसणार आहे. तर गहू, हरभरा, ज्वारी, मका पिकांचेदेखील मोठे नुकसान होत आहे.

आंब्याच्या कैऱ्या गळून पडल्या असून मोहोराचे देखील मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पंढरपूर तालुक्याच्या पश्चिम भागातील कासेगाव, खर्डी, बोहाळी, उंबरगाव, तिसंगी, टाकळी, कोर्टी, गादेगाव, भाळवणी आदी भागात सोमवारी दुपारी ४ वाजता अवकाळी पाऊस झाला तर सायंकाळी ६.३० वाजता पंढरपूर शहरासह संपूर्ण तालुक्यात अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे द्राक्षे बागांवर परिणाम होत आहे.

पावसामुळे द्राक्ष बागांचे मोठे नुकसान होत आहे. तर गहू, हरभरा, ज्वारी, मका पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. सर्वात जास्त नुकसान आंब्याच्या पिकाचे झाले आहे. आंब्याचा मोहोर गळती झाला असून तयार झालेल्या कैऱ्यांचा झाडाखाली सडा पडला.

## लाचखोर वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळकला २६ तारखेपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २४ फेब्रुवारी-**
माळशिरस लाच प्रकरणी ताब्यात घेतलेल्या सुंदरराव नागटिळक यास पोलीसांनी न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने त्यास २६ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



याबाबत माहिती अशी की तक्रारदार यांनी धर्मपुरी येथे सभा मंडपाचे काम घेतले होते ते पूर्ण केले होते. काम पूर्ण झाल्याचा दाखला गटविकास अधिकारी यांच्याकडून मिळवून देण्यासाठी वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक यांनी तक्रार दाराकडे दहा हजार रुपयाची मागणी केली होती या बाबत तक्रारदार यांनी पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती त्यानुसार पंचायत समिती कार्यालयात दुपारी दोनच्या सुमारास तडजोडी अंती दाखला देण्यासाठी पाच हजारांची रक्कम स्वीकारताना नागटिळक यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते. पोलिसांनी आज सुंदरराव नागटिळक यास माळशिरस न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयाने २६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे या खटल्यात सरकारी वकील म्हणून ॲड. पी.एस. मेंढेगिरी यांनी काम पाहिले

## मर्यादेपेक्षा जास्त आवाजात डीजे वाजवल्यास कारवाई अटळ

**उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२४ फेब्रुवारी-**
नुकतेच अकलुज येथील शिवजयंती मिरवणुकीत नियमापेक्षा अधिक प्रमाणात आवाजात डिजे वाजवुन सार्वजनिंक शांतता भंग करुन ध्वनीप्रदुषण नियमांचे उल्लंघन केल्या बद्दल ११ जयंती मंडळे व डिजे मालकावर कारवाई केल्या नंतर,यापुढे कोणत्याही सण उत्सवात कर्कश आवाजात डिजे वाजवुन ध्वनीप्रदुषण नियमांचे उल्लंघन केल्यास पोलीस कारवाईस सामोरे जावे लागेल असा कडक इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांनी दिला आहे.





डिजे मुळे होणारी शांतता भंग व ध्वनीप्रदुषण यामुळे नागरीकांना होणाऱ्या त्रासामुळे संबधित आयोजकांच्या विरुद्ध पोलीसांनकडे तक्रारी येत आहेत.या अनुषंगाने पत्रकारांशी वार्तालाप करताना माळशिरस विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके म्हणाले,

आवाजात डिजे वाजवण्यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्बंध लावले आसतानाही महामानवांची जयंती,अन्य समारंभ व लग्नात कर्कश आवाजात डिजे वाजवले जात आहेत. नुकतेच शिवजयंती मिरवणुकीत नियमापेक्षा अधिक प्रमाणात आवाजात डिजे वाजवुन सार्वजनिंक शांतता भंग करुन ध्वनीप्रदुषण नियमांचे उल्लंघन केल्या बद्दल अकलूज पोलीसांनी ११ जयंती मंडळे व डिजे मालकावर गुन्हे दाखल करुन कारवाई केली आहे.सद्या पोलीसांनी मंडळाचे अध्यक्ष व डिजे मालक यांचेवर जरी गुन्हे दाखल केले असले तरी,पोलीसांनी घटनास्थळाच्या केलेल्या चित्रीकरणाचा तपास करुन सहभागी कार्यकर्त्यांनवरही गुन्हे दाखल केले जातील. तसेच डिजेच्या वाहनावरही परीवहन कार्यालाशी पत्रव्यवहार करुन जास्तीत जास्त दंड आकरला जाणार आहे. कोणत्याही सण उत्सवाच्या पुर्वी सर्व मंडळांना बोलवुन आवाजाच्या मर्यादे संदर्भात पोलीसांन कडून नोटीस दिली जाते. तरी सुद्धा पोलिसांच्या सुचनेचं उल्लंघन होतं आहे,यापुढे ज्याही ठिकाणी ७५ डिसेबल पेक्षा जास्त आवाजात कोणतेही वाद्य वाजवल्यास पोलीस कारवाई अटळ आहे असा कडक इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांनी दिला.

## भारत-संयुक्त अरब अमिराती संसदीय मैत्री समितीवर खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ फेब्रुवारी-**
८व्या लोकसभेच्या कालावधीसाठी भारताच्या संसदेत स्थापन करण्यात आलेल्या भारत-संयुक्त अरब अमिराती (णए) संसदीय मैत्री समितीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा अध्यक्षांनी ही नियुक्ती जाहीर केली असून,अधिकृत पत्राद्वारे माहिती देण्यात आली.भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील संसदीय व राजनैतिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा मैत्री गट महत्त्वपूर्ण मानला जातो.



भारत आणि णपळींशव ीरल एाळीरींशी यांच्यात व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संरक्षण, शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या विविध क्षेत्रांत घनिष्ठ संबंध आहेत. संसदीय मैत्री गटाच्या माध्यमातून दोन्ही देशांच्या संवाद, अनुभवांची देवाणघेवाण आणि सहकार्य अधिक बळकट होणार आहे. या नियुक्तीबद्दल समाधान व्यक्त करत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले की, भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्यासाठी संसदीय स्तरावर सकारात्मक भूमिका बजावण्याचा मी प्रयत्न करेन. मला संधी दिल्याबद्दल मी भारत सरकारचे देखील धन्यवाद व्यक्त करतो..

### माजी महापौर स्व. जनार्दन कारमपुरी यांची आज शोकसभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**
सोलापूरचे माजी महापौर, शारदा सहकारी सूत गिरणीचे संस्थापक, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक व माजी अध्यक्ष, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे माजी अध्यक्ष व ट्रस्टी जनार्दन कारमपुरी यांचे नुकतेच निधन झाले. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने विणकर सभागृहात बुधवार २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शोकसभेचे आयोजन केले आहे. या शोकसभेस वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांनी केले आहे

## सेवानिवृत्त शिक्षकाच्या घरातून दोन लाखांच्या रोख रकमेसह दागिने चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २४ फेब्रुवारी-**
बार्शी तालुक्यातील गौडगाव येथे भरदिवसा एका सेवानिवृत्त मुख्याध्यापकाचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे १३ तोळे सोन्याचे दागिने आणि २ लाख रुपये रोख, असा ४ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून वैराग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी गुलाब भीमराव रोहिले (वय ६६ वर्षे), हे गौडगाव येथील रहिवासी असून ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहेत. रविवारी (दि. २३) सकाळी पावणे अकराच्या सुमारास रोहिले हे आपल्या कुटुंबासह मुलगी शिल्पा हिच्याकडे उंडेगाव (ता. बार्शी) येथे द्राक्षे खाण्यासाठी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी ही चोरी केली.

सायंकाळी सहाच्या सुमारास रोहिले कुटुंब घरी परतले असता त्यांना गेटचे कुलूप उघडून आत गेल्यावर घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला दिसला. त्यांनी दरवाजा आत ढकलण्याचा प्रयत्न केला असता तो उघडला नाही, कारण तो आतून लावलेला होता. त्यानंतर त्यांनी मागच्या बाजूला असलेल्या किचनच्या दरवाजाकडे धाव घेतली. तिथे त्यांना किचनचा दरवाजा आणि सेफ्टी डोअर उघडा असल्याचे दिसून आले. घरात प्रवेश केल्यावर मास्टर बेडमधील लोखंडी कपाटाचे लॉकर आणि ड्राव्हर उघडे होते. सोन्याच्या दागिन्यांचे रिकामे बॉक्स बेडवर विखुरलेले होते, तर रोख रक्कम असलेली लेदर बॅग गायब होती.

दागिन्यांमध्ये ५० हजारांचा २५ ग्रॅमचा राणीहार १ लाख रुपये किमतीचे ५० ग्रॅमचे मोठे गंठण ३२ हजार रुपये किमतीचे १६ ग्रॅमचे दुसरे गंठण ३४ हजार रुपये किमतीचे १७ ग्रॅमचे लॉकेट. २० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅमचे लॉकेट ११ हजार रुपये किमतीचे साडेपाच ग्रॅमचे लॉकेट. ९ ते १० हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या अंगठ्या. अशा प्रकारे १३ तोळे सोने आणि रोख २ लाख असा मिळून एकूण ४ लाख ६६ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे.

## पंढरपुरात शनिवारपासून पद्मश्री पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव

**पं. शौनक अभिषेकी, पं.रामदास पळसुले, सारंग कुलकर्णी, अनुजा झोकरकर यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**
अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी प्रचारासाठी सदैव कार्यरत असलेल्या तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे, आरती साऊंड सिस्टीम मनमाडकर परिवार आणि नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत येत्या शनिवार (दि.२८) आणि रविवारी (दि.१ मार्च) सायंकाळी ५:३० वाजता आरती मंडप प्रांगण भक्तीमार्ग श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे नादब्रह्मचे ज्ञानेश्वर दुधाणे यांनी सांगितले.

या महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार प्रशांत परिचारक, राणा महाराज वासकर, पं.शौनक अभिषेकी, भगवान मनमाडकर शुभांगी मनमाडकर, ज्ञानेश्वर दुधाणे यांचे हस्ते होणार आहे. महोत्सवात पहिल्या दिवशी उदयोन्मुख गायक राज शहा, अनुजा झोकरकर यांचे गायन तर पं.पद्मश्री तालयोगी सुरेश तळवलकर यांचे शिष्य पं.रामदास पळसुले यांचे एकल तबलावादन संपन्न होणार असून दुसऱ्या दिवशी करणं देवगावकर गायन, सारंग कुलकर्णी यांचे सरोदवादन तर संगीत महोत्सवाची सांगता पं.शौनक अभिषेकी यांच्या गायनाने होणार असून



या महोत्सवात अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी प्रचारासाठी सदैव प्रयत्नशील असणाऱ्या कलासाधकास कै.नारायण पंढरीनाथ दुधाणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संगीत सेवा सन्मान पुरस्कार दिला जातो तो पुरस्कार यंदा रामदास नाना रोंगे यांना दिला आहे. दरम्यान संगीत मैफलीत सर्व दिग्गज कलाकारांना तबला अजिंक्य जोशी,कार्तिक स्वामी, माऊली खरात, हार्मोनियम यश खडके, सारंग कुलकर्णी, ओंकार पाठक, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे तर टाळ माऊली पिसे सुदर्शन कुंभार आदी साथसंगत करणार असून ध्वनी व्यवस्था आरती साऊंड सिस्टीम यांची असणार आहे. तरी पंढरपूर आणि पंचक्रोशीतील कलासाधक आणि कलारसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भगवान मनमाडकर, ज्ञानेश्वर दुधाणे, यांनी केले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी अभेद अभिषेकी, धनंजय मनमाडकर, संकेत कुलकर्णी, वैभव केंगार, माऊली खरात, सुदर्शन कुंभार आदी परिश्रम घेत आहेत.